नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी
१९५५-७८

१९७७ - जा, फे/मा, एप्रि/मे, जू/जु, ऑ/स, डि
६ अंक


१९७८, फे/मा, एप्रि/मे, जू/जु, ऑ/स, डि/जा —

कै. सौ. उषाताई कोलते

जन्म २५-१-१९१३
निधन १-१-१९७७



दि. २३-१-७७ गडकरी दिन



आणि इंदिराबाई खरे शालेय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. सौ. कुसुमताई वानकर ह्यांच्या हस्ते.

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी


फेब्रुवारी – मार्च १९७७

अनुक्रमणिका


डॉ. मिराशी यांच्या ' कालिदासविषयक नवीन संशोधनाचे परीक्षण ' या लेखात उल्लेखिलेल्या आकृत्या :




आकृती १ : मुद्रेची यथादृष्ट प्रत



आकृती २ : मुद्रेची फोटो प्रत



आकृती ३ : भाजक्या मातीचे पदक



आकृती ४ : अजकालक यक्ष

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

विदर्भ विषय सारस्वती जन्मभूः

युगवाणी

फेब्रुवारी – मार्च १९७७

फाल्गुन – चैत्र शके १८९८–९९

संपादक मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक वि. वा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये

वर्ष ३२ अंक ११–१२

दोन साहित्यिकांची दुःखद चिरनिद्रा

१९७६ सालच्या शेवटल्या रात्री प्रा. सौ. उषाताई कोलते ह्यांच्या दुःखद निधनाची बातमी आली. विदर्भ साहित्य संघावर शोकछाया पसरली. डॉ. भाऊसाहेब कोलत्यांच्या असंख्य चाहत्यांची अंतःकरणे व्यथित झाली. भाऊ कुलगुरु झाल्यापासून उषाताई सतत त्यांचे बरोबर असत. उषाताईंना एकटं सोडून भाऊ कधी कुठं फिरकले नाहीत पण त्या रात्री उषाताईच मात्र भाऊंना एकटं सोडून कायमच्या निघून गेल्या ! उषाताईंचे प्रसन्न व्यक्तिमत्व साहित्यिक व समाजसेवी कर्तृत्वाने अधिकच उजळून निघालेले होते. विदर्भ साहित्य संघाच्या त्या सन्माननीय सभासद होत्या. १९५९ ते १९६२ पर्यंत त्या नागपूर विद्यापीठाच्या सीनेटच्या आणि १९५९ ते १९६२ पर्यंत ॲकेडेमिक कौन्सिलच्या सदस्य होत्या. सुरवातीच्या काळांत भाऊ अमरावतीला असतांना, त्या काही काळ शिवाजी शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष होत्या.

१९३९–४० च्या दरम्यान मुलांसाठी त्यांनी महाभारत व रामायणातल्या कथा कथाभारत नावानी लिहून प्रकाशित केल्या. चरित्रे लिहिली. समाजविज्ञानावर पुस्तके लिहिली. कुटुंबनियोजनावर लेखमाला लिहिल्या आणि कुटुंबनियोजनाचा जोरदार प्रचारहि त्यांनी केला. Charity begins at home ह्या नात्याने, कुटुंबनियोजनाची पहिली शस्त्रक्रिया भाऊंवरच करविली. वि. सा. संघाच्या मराठीच्या परीक्षांसाठी मराठी प्रवेश व महाराष्ट्र साहित्य भाग १ ते ५ ही पुस्तकेहि त्यांनी भाऊंच्या सहकार्याने लिहिली. तकषी शिवशंकर पिल्ले ह्यांच्या "रंटी टङ्कषी" ह्या गाजलेल्या पुस्तकाचे त्यांनी साहित्य अकादेमी साठी मराठीत भाषांतर केले. स्त्री, किर्लोस्कर आदि मासिकातून त्यांनी लघुकथा लिहिल्या. त्यांची एक नवी पण अप्रकाशित लघुकथा आम्ही ह्या अंकातच प्रसिद्ध केलेली आहे.

उषाताईंना वि. सा. संघातर्फे व व्यक्तिशः मी नम्र श्रद्धाञ्जली अर्पितो.

———————— × ————————

२१ फेब्रुवारी १९७७ ला रा. श्री. जोगांचे दुःखद निधन झाले. वयाच्या २३ व्या वर्षी ते प्राध्यापक म्हणून नाशिकच्या कॉलेजांत लागले. 'निशिगंध' ह्या टोपण नावाने त्यांनी प्रथम कविता लिहिल्या. 'ज्योत्स्नागीत' व 'निशागीत' हे त्यांचे दोन काव्यसंग्रह. ठाण्याला भरलेल्या मराठी

साहित्य सम्मेलनाचे ते अध्यक्ष होते. 'अभिनव काव्यप्रकाश', 'सौंदर्यशोध आणि आनंदबोध', 'संस्कृत काव्यवाङ्मय', 'केशवसुतकाव्यदर्शन', 'काव्यविभ्रम', 'मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन', 'चर्वणा', 'विचक्षणा' हे त्यांचे समीक्षाग्रंथ मराठीत आपले आगळे स्थान राखून आहेत. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ६१ व्या वार्षिकोत्सवाच्या अध्यक्षपदावरून नवकाव्यातील दुर्बोधतेबाबत केलेले विवेचन सर्वस्पर्शी व समीक्षेतील त्यांचे सामर्थ्य अभिनवपणे प्रदर्शित करते.

असा हा टीकापंडित गेल्याने मराठी समीक्षेची फार मोठी हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतीस नम्र अभिवादन.

— संपादक

अं त रं ग

कालिदासविषयक नवीन संशोधनाचे परीक्षण

वा. वि. मिराशी

लेखांक – १

राष्ट्रकवि कालिदास याच्याविषयी सर्व भारतीयांस आत्मीयता वाटत असल्यामुळे त्याचा काल, व्यक्तित्व व ग्रंथ यांच्याविषयी नवीन नवीन मते वरचेवर प्रकट होत असतात. त्यांचे चिकित्सक परीक्षण करून त्यांची सत्यासत्यता उपलब्ध प्रमाणांच्या कसोटीवर पारखली नाही तर सामान्य जनांचा बुद्धिभेद होण्याचा संभव असतो. अलीकडे कालिदासाचा काल, त्याचे जीवनचरित्र, त्याचा आश्रयदाता विक्रमादित्य याचे निश्चितीकरण इत्यादींविषयी काही नवीन सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्याचे यथाक्रम परीक्षण येथे करीत आहे.

डॉ. वि. श्री. वाकणकर यांचे सिद्धान्त

विक्रम विद्यापीठाच्या पुरातत्त्व उत्खनन विभागाचे संयोजक डॉ. वि. श्री. वाकणकर यांनी ७ जुलै १९७६ रोजी समाचार वृत्तसंस्थेमार्फत असे वृत्त प्रसारित केले की आपणांस उज्जैनी येथे गढकालिका या पुरातन परिसरात ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकाच्या ब्राह्मी लिपीत ‘ कृत ’ राजाचे नाव स्वस्तिक आकृतीच्या सभोवार लिहिलेली अशी भाजक्या मातीची (टेराकोट्टा) मुद्रा सापडली आहे. ‘ कृत ’ हे विक्रमादित्याचे नाव होते. त्याने शकांचा उच्छेद करून आपल्या नावे ‘ कृत ’ किंवा ‘ विक्रम ’ संवत् स्थापला होता. तसेच ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकातील एक पदक (मेडॅलियन्) सापडले असून त्यावर कालिदासाच्या ‘ शाकुन्तल ’ नाटकातील सातव्या अंकात वर्णिल्याप्रमाणे सर्वदमन (भरत) हा सिंहाचे दात मोजीत असलेला दाखविला आहे. या दोन प्रमाणांवरून कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात झालेल्या विक्रमादित्याच्या दरबारी होता, हे सिद्ध झाले आहे. हे वृत्त डॉ. वाकणकरांनी समाचार वृत्तसंस्थेमार्फत सर्व देशभर प्रसारित केले होते.

ही वार्ता खळवळजनक होती. कारण दीर्घकालीन वादविवादानंतर आता हे मत जवळ जवळ सर्वमान्य झाले आहे की कालिदास हा गुप्तवंशी द्वितीय चन्द्रगुप्ताच्या काळी ख्रिस्तोत्तर ४०० च्या सुमारास झाला होता. हेच मत आम्ही चाळीस वर्षांपूर्वी प्रकाशिलेल्या आपल्या ‘ कालिदास ’ ग्रंथात अन्य मतांचे साधार परीक्षण करून प्रतिपादिले होते. त्यानंतरच्या कालात उपलब्ध झालेल्या कोरीव लेखांसारख्या प्रमाणांनी तेच मत आता दृढ झाले आहे व ते गतवर्षी महाराष्ट्राच्या साहित्य संस्कृति मंडळाने प्रकाशित केलेल्या आमच्या ‘ कालिदास ’ ग्रंथाच्या तृतीयावृत्तीत प्रतिपादिले आहे. डॉ. वाकणकरांची प्रमाणे व त्यांवर आधारलेले त्यांचे कालिदास-कालविषयक मत प्रसिद्ध होताच त्यांना आम्ही त्या ‘ कृत ’ नामांकित मुद्रेचे फोटो पाठविण्याविषयी विनंती केली. ते पाठवून देतो असे त्यांचे पत्रही आले. पण महिना दोन महिन्यांच्या अंतराने तीन स्मरणपत्रे पाठवूनही ते फोटो आम्हांस मिळाले नव्हते.

आमच्या प्रमाणे सागर विद्यापीठाच्या पुरातत्त्व विभागाचे अध्यक्ष प्रा. कृष्णदत्त वाजपेयी यांनाही डॉ. वाकणकरांच्या प्रमाणांविषयी संदेह उत्पन्न होऊन त्यांनी वाकणकरांच्या वृत्तानंतर ८-१० दिवसांतच वृत्तपत्रांत आपले निवेदन प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी वाकणकरांना सापडलेल्या मुद्रेवर ‘ कृत ’ नामापूर्वी राजपदवी नसल्यामुळे ती मुद्रा एखाद्या सामान्य व्यक्तीची असावी असे सुचविले. तसेच ‘ पदकावरील आकृति सर्वदमनाची कशावरून ?’ असाही प्रश्न केला. त्यांच्या लेखाला डॉ. वाकणकरांनी उत्तर दिले असल्यास ते आमच्या पाहण्यात आले नाही.

नंतर नागपूरच्या ‘ तरुण भारत ’ दैनिकाच्या गेल्या दिवाळी अंकात डॉ. वाकणकरांनी ‘ विक्रम आणि कालिदास : ऐतिहासिकता आणि कालनिर्णय ’ या शीर्षकाचा लेख लिहिला आहे. यात ‘ विक्रम आणि कालिदासासंबंधी भ्रम दूर करण्याचा प्रयत्न मी

करणार आहे ' असे म्हणून स्वमताच्या समर्थनार्थ विविध प्रमाणे दिली आहेत. तसेच त्यात पूर्वोक्त पदकाच्या पुढील व मागील बाजूंचे फोटो आणि मुद्रेची यथादृष्ट प्रत (eye-copy) छापली आहे.[१] ती पाहिल्यावर मला त्यांच्या सत्यतेविषयी शंका उत्पन्न झाली. म्हणून मी त्यांना त्या मुद्रेचा फोटो पाठविण्याविषयी पुन: अनेकवार लिहिले. अनेकांची मध्यस्थी घातली. शेवटी त्या मुद्रेचे फोटो मिळाले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्या साहाय्याने पुढील विवेचन करीत आहे.

डॉ. वाकणकरांनी आपला लेख संशोधन पद्धतीने लिहिला नाही. त्यांतील विधानांस निश्चित संदर्भ दिले नाहीत. ग्रंथकारांचे व नाणी प्रसृत करणाऱ्या राजांचे मोघम उल्लेख केले आहेत. त्यामुळे त्यांची प्रमाणे पडताळून पाहता येत नाहीत. दुसरा मुख्य दोष हा की त्यांनी सर्व प्रमाणे सारखीच महत्त्वाची मानली आहेत. त्यांतील समुद्रगुप्तकृत 'कृष्णचरिता'सारखे काही ग्रंथ तर बनावट ठरले आहेत. संशोधकाने न्यायाधीशाप्रमाणे उपलब्ध प्रमाणांचा तारतम्य बुद्धीने विवेक केला पाहिजे. न्यायाधीश एखादी घटना घडली तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तीच्या साक्षीला ऐकीव माहिती सांगणाऱ्या व्यक्तीच्या विधानांपेक्षा जास्त महत्त्व देतो. डॉ. वाकणकर सिद्धसेन दिवाकर, मेरुतुंग, सोमदेव, कल्हण इत्यादिकांच्या विधानांवरून विक्रमादित्य ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला असे सिद्ध करू पाहतात. हे ग्रंथकार त्या तथाकथित विक्रमादित्यानंतर शेकडो वर्षांनंतर होऊन गेलेले. त्यांना त्याच्याविषयी खरी माहिती असणे शक्य नाही. त्यांपैकी काहींच्या विधानांतील असंगतीचे दोष आम्ही आमच्या 'कालिदास' ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात दाखविले आहेत.

डॉ. वाकणकरांची हातचलाखी

काही ठिकाणी डॉ. वाकणकर वाचकांच्या डोळ्यांत धूळ फेकीत आहेत असे वाटते. 'विक्रम' विरुद गुप्तनृपति द्वितीय चन्द्रगुप्त-विक्रमादित्य यानेच प्रथम स्वीकारले असे नसून त्याचा उल्लेख पूर्वीही होताच हे दाखविण्याकरिता डॉ. वाकणकर नाशिकच्या लेण्यातील सातवाहन नृपति पुळुमावि याच्या कोरीव लेखात आलेले त्याचा पिता गौतमीपुत्र सातकर्णीचे पुढील वर्णन उद्धृत करतात.

'आकरावंतीराजस सकयवनपल्हवनिसूदनस वरवारणविकमचारुविकमस खखरातवसनिरवसेसकरस.

हे वर्णन प्राकृतात आहे. यात गौतमीपुत्राला विक्रम म्हटले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. हा गौतमीपुत्र ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकात होऊन गेला असे सिद्ध झाले आहे. तेव्हा कालिदासाचा आश्रयदाता विक्रमादित्य त्यापूर्वी ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला असला पाहिजे अशी त्यांची अनुमानपरंपरा आहे.

डॉ. वाकणकरांना वरील पंक्तींचा अर्थ लागला नाही. 'वरवारणविकमचारुविकमस' या प्राकृत विशेषणाचा अर्थ 'उत्कृष्ट हत्तीच्या चालण्याच्या ढबीप्रमाणे ज्याचे चालणे सुंदर होते' असा आहे. त्यात गौतमीपुत्राने विक्रम विरुद धारण केल्याचा निर्देश नाही. तसेच "समुद्रगुप्ताने 'विक्रम' विरुद असलेले नाणे पाडले होते" हेही त्यांचे विधान चूक आहे. ते नाणे चुकीने पाडले गेले होते. त्याच्या स्वत:च्या स्तंभलेखात त्याचे 'पराक्रम' हे बिरुद उल्लेखिले आहे, 'विक्रम' नाही, हे डॉ. अ. स. अळतेकर यांनी आपल्या 'गुप्त साम्राज्याची नाणी' या इंग्रजी ग्रंथात, पृ. ४४–४५ वर दाखविले आहे. तसेच 'हाल राजाने केलेला विक्रमाचा उल्लेख उपेक्षून चालणार नाही' हेही डॉ. वाकणकरांचे विधान तसेच भ्रामक आहे. "हालाच्या 'गाथासप्तशती'च्या अनेक आवृत्त्या झाल्या होत्या. प्रत्येक आवृत्तीत पूर्वीच्या कांही गाथा गाळून नंतरच्या सर्वसेन, प्रवरसेन यांसारख्या वाकाटक राजांच्या व अन्य कवींच्या गाथा घुसडण्यात आल्या होत्या. तेव्हा पूर्वोक्त विक्रमविषयक गाथा मूळच्या 'सप्तशती'त होती असे सिद्ध केल्याशिवाय तिचा पुरावा ग्राह्य धरणे योग्य नाही" हे आम्ही पंचवीस-तीस वर्षांपूर्वी दाखविले होते. 'संशोधन मुक्तावलि': सर १, पृ. १०८–१२३ वर पुनर्मुद्रित केलेला आमचा तो लेख पाहा.

डॉ. वाकणकरांच्या मुख्य प्रमाणांचे परीक्षण

डॉ. वाकणकरांच्या लेखातील प्रमाणांत असे अनेक दोष आहेत. त्या सर्वांचा येथे उल्लेख करणे

१. आकृति १ व २, इतरत्र छापलेल्या, पाहा.

२. एपिग्राफिया इंडिका, व्हॉ. ८, पृ. ६०.

शक्य नाही. तथापि समाचार वृत्तसंस्थेतर्फे प्रसारित केलेल्या त्यांच्या संशोधनातील मुख्य प्रमाणांचे परीक्षण करणे अवश्य आहे –

१. प्रमाण पहिले –

कृत राजाचे नाव असलेली मुद्रा –

या मुद्रेचा फोटो डॉ. वाकणकरांनी छापला नाही. त्याची फक्त यथादृष्ट प्रत तरुण भारताच्या दिवाळी अंकात पृ. ८६ वर छापली आहे. यथादृष्ट प्रतीवरून वाचन करणे धोक्याचे असते असा संशोधकांचा अनुभव आहे. म्हणून त्या मुद्रेचा फोटो येथे देऊन तिच्या वाचनाची चर्चा केली आहे.

डॉ. वाकणकरांनी त्याचे वाचन 'कतस उजेनिय[स]' असे केले आहे. यातील दुसरे अक्षर 'त' नसून 'ग' आहे. 'त' वर उभी रेघ असते ती येथे नाही. 'क' हे अक्षरही यथादृष्ट प्रतीत नीट काढले नाही. 'कगस' याचा नीट अर्थ होत नाही. मूळ अक्षरात 'क' ला आवश्यक अशी मधली आडवी रेघ नाही. त्या रेघेच्या ठिकाणी नाण्याची कड आली आहे. म्हणून डॉ. वाकणकरांना 'क' अक्षराचा भ्रम झाला आहे. तेव्हा 'रगस (रागस) उजेनियस' असा लेख दिसतो. 'रागस' याच्या पूर्वीची चार पाच अक्षरे मुद्रेवर उमटली नाहीत, असे फोटोवरून दिसते. तेथे त्या व्यक्तीच्या नावातील पहिली कांही अक्षरे कोरली होती असे दिसते. 'उजेनियस' म्हणजे 'उज्जयिनीच्या' तेव्हा ही मुद्रा उज्जयिनीच्या कोणा 'राग' पदान्त नावाच्या व्यक्तीची दिसते, 'कृत' राजाची नव्हे.

मुद्रेचे संभवनीय वाचन

ही मद्रा 'कृत' राजाची असणे संभवनीय वाटत नाही. कारण (१) त्याची 'रञो' किंवा 'महाराजस' यासारखी प्राकृत भाषेतील पदवी यात दिसत नाही. मुद्रेवर कांही अक्षरे उमटली नसल्याने ती दिसत नाही असे मानले तरी हे नाणे एखाद्या राजाचे असल्यास त्याने 'उजेनियस' (उज्जयिनीचा) असा आपला उल्लेख करावा हे विलक्षण वाटते. आतापर्यंत हजारो प्राचीन भारतीय नाणी प्रसिद्ध झाली आहेत. त्यांतील एकावरही असा कोणत्याही राजाच्या राजधानीचा उल्लेख नाही. याउलट अनेक कोरीव लेखांत सामान्य व्यक्तींचे असे उल्लेख आढळतात. उदाहरणार्थ, सांची येथील स्तूपांवरील खालील लेख पाहा. मार्शल व फूशे यांचा 'मॉन्युमेंट्स् ऑफ सांची' ग्रंथ, भाग २ –

पृ. ३०५ – उजेनकस वानेजस इसिदतस दानं ।
पृ. ३३० – थेरस अयनागस भिखुनो उजेनकस दानं ।
पृ. ३०३ – बुधरखितस भिछुनो उजेनकस दानं ।

'तुष्यतु दुर्जनः' या न्यायाने ही मुद्रा 'कृत' राजाची आहे असे मानले तरी तिच्यावरून विक्रमादित्य राजा ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला हे कसे सिद्ध होणार? विक्रमसंवताचे आरंभीचे नाव 'कृत' होते यात संशय नाही. त्या संवताचे आरंभीचे लेख उत्तर भारतात उज्जैनीच्या शेकडो मैल उत्तरेस सापडले आहेत त्यांत त्याचे 'कृत' हे नाव उल्लेखिले आहे खरे. तसेच तो संवत् आरंभी मालव गणात प्रचलित होता म्हणून त्याचे नाव त्या गणाशी पुढे काही लेखांत जोडले आहे. पण त्या काळी मालव गणाची वसती हल्लीच्या माळव्यात नव्हती. विक्रमादित्याच्या नावाचा या संवताशी संबंध पुढे काही शतकांनी जोडण्यात आला. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी त्याचे कारण गुप्त राजा द्वितीय चंद्रगुप्त – ज्याने विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती तो – माळव्यात उज्जयिनीस राज्य करीत होता हे होय, असे अनुमानिले आहे ते संभवनीय असल्यामुळे बहुतेक सर्व संशोधकांनी स्वीकारले आहे. 'जाइकदेवाच्या संवत् ७९४ च्या लेखात विक्रमादित्याचा त्या संवताशी संबंध प्रथम जोडलेला दिसतो' असे डॉ. वाकणकर म्हणतात. पण तो कोरीव लेख बनावट आहे हे डॉ. कीलहॉर्न् आणि डॉ. फ्लीट यांनी दाखविले आहे. (इंडियन अँटिक्वरी, व्हॉ. १६, पृ. १९८, व व्हॉ. १९, पृ. ३७० डॉ. वाकणकरांनी पाहावे). या प्रश्नाचे सविस्तर विवेचन आमच्या 'कालिदास' ग्रंथात (आवृत्ति ३, पृ. १९ – २१) पाहावे.

तेव्हा या मुद्रेवर 'कृत' राजाचे नाव नाही. ते आहे असे मानले तरी 'तो राजा संवत् संस्थापक विक्रमादित्य होय आणि तो ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला' असे सिद्ध होत नाही.

२. प्रमाण दुसरे –

सर्वदमन भरत सिंहाचे दात मोजत असलेले पदक –

आता आपण डॉ. वाकणकरांच्या दुसऱ्या प्रमाणाकडे वळू.

त्यांनी कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुंतला'च्या सातव्या अंकात उल्लेखिलेल्या सर्वदमन भरताच्या सिंहदंतगणनेचे दृश्य दाखविणाऱ्या पदकाचा (मेडॅलियनचा) निर्देश 'कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात झाला' हे सिद्ध करण्याकरिता केला आहे. उत्खननात सापडलेल्या भाजक्या मातीच्या (टेराकोट्टा) पदकावरून कालिदासाचा काल ठरविण्याचा हा पहिलाच प्रयत्न नाही. यापूर्वी प्रा. शारदारंजन राय यांनी प्रयाग जवळ भीटा येथे सापडलेल्या भाजक्या मातीच्या पदकावरून असाच प्रयत्न केला होता. पण तो चूक होता हे आम्ही आमच्या 'कालिदास' ग्रंथात (तिसरी आवृत्ति, पृ. २८) दाखविले आहे.

हे पदक अलाहाबाद विद्यापीठाचे रीडर डॉ. जगदीश गुप्त यांना उत्तर प्रदेशाच्या हरदोई जिल्ह्याच्या शहाबाद तालुक्यातील अंगाईखेड येथे सापडले होते. ते त्यांनी 'पुरातत्त्व' या आर्किआलॉजिकल सोसायटीच्या नियतकालिकात (क्रमांक ६, सन १९७२–७३, पृ. ९०-९२) प्रसिद्ध केले आहे. त्या पदकाच्या दोन्ही बाजूंचे फोटो त्यात छापले आहेत.[३] तेच डॉ. वाकणकरांनी 'तरुण भारता'च्या दिवाळी अंकातील आपल्या लेखात दिले आहेत. तेच येथे देत आहे.[३]

या पदकावरील आपल्या लेखात जगदीश गुप्त यांनी जे प्रतिपादिले होते तेच डॉ. वाकणकर यांनीही दिले आहे. (पदकाच्या पुढील बाजूचा फोटो पाहा.) 'या पदकाच्या पुढील बाजूवर डावीकडे एक सिंहशावक पायात पैंजण असलेला आणि जबडा उघडल्यामुळे त्याचे दात दिसत आहेत असा दाखविला आहे. त्याच्या समोर एक युवक आपल्या दोन्ही हातांनी त्याचा जबडा उघडून त्याचे दात मोजीत आहे' असे डॉ. जगदीश गुप्त यांनी म्हटले आहे. त्यांचे प्रतिपादन स्वीकारून डॉ. वाकणकरांनी हे पदक ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापूर्वीचे असल्यामुळे आणि त्यात 'शाकुन्तला'तील एका प्रसंगाचे दृश्य दाखविले असल्यामुळे 'शाकुन्तल' नाटकाचा कर्ता कालिदास ख्रिस्तोत्तर ४०० च्या सुमारास झाला नसून तो ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकातच होऊन गेला असावा, असे म्हटले आहे.

या पदकाचा निश्चित अर्थ अद्यापि कोणी लावला नाही. ते 'शाकुन्तला'तील दृश्य दाखवीत नाही हे 'पुरातत्त्वा'चे संपादक डॉ. एम्. सी. जोशी यांनी स्पष्टपणे दाखविले आहे. ते म्हणतात, 'ज्याचा जबडा फाकला आहे तो प्राणी सिंह नसून मकर आहे. सिंहाचा जबडा असा लांबट नसतो. त्याचा मागील भाग सिंहाचा असेल. तेव्हा हा प्राणी मकरवदनधारी सिंहशरीरी व्याल असावा. अशा व्यालांची शिल्पे प्राचीन मंदिरांत अलंकरणार्थ कोरलेली दिसतात. या व्यालाच्या समोरील आकृति एखाद्या सर्वदमन भरतासारख्या बालकाची नसून एका मोठ्या माणसाची आहे. शैलीच्या पुराव्यावरून हे पदक ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकातले असावे. त्यात शाकुन्तलातील प्रसंगाचे चित्रण नसल्याने कालिदासाचा काल ठरविण्यास त्याचा काही उपयोग नाही.'

आम्ही या पदकाचा थोडा अभ्यास केला. त्यावरून डॉ. एम्. सी. जोशी यांचे मत आम्हांस ग्राह्य वाटते. ज्याचा जबडा फाकला आहे तो प्राणी खात्रीने सिंह नाही. तो मकरच असला पाहिजे. 'शाकुन्तला'च्या सातव्या अंकातील बालक सर्वदमन फार तर चार पाच वर्षांचा असावा. त्या नाटकात तो सिंहशावकाला म्हणतो, 'तोंड उघड. मी तुझे दात मोजतो.' असे म्हणून तो सिंहशावकाला त्याच्या सिंहिणीमातेपासून ओढू लागतो. तितक्यात त्याच्या बरोबरची तापसी त्याचे निवारण करते व त्याला दुसरे खेळणे देऊ करते, असा प्रसंग 'शाकुन्तला'त घातला आहे. या पदकावरचा प्रसंग तसा दिसत नाही. त्यात एक मध्यम वयाचा पुरुष मकराचा जबडा बळजवरीने फाकून त्याला बेजार करताना दाखविला आहे. **हे दृश्य 'शाकुन्तला'-तील प्रसंगाचे नाही.**

या पदकावरील दृश्याचा अर्थ अद्यापि कोणी लावला नाही. आम्ही तो पुढील प्रमाणे सुचवितो.

पदकाचा खरा अर्थ

हे दृश्य 'अजकालक' नामक यक्षाचे आहे. प्राचीन काळी यक्ष व यक्षिणी यांची पूजा प्रचलित होती. त्यांची नावेही काही गावांना व शेतांना दिली होती. नाशिकजवळच्या क्र. ३ च्या लेण्यात 'अजकालकिय' नामक शेताचा उल्लेख आला आहे.[४] सातवाहनवंशी राजा गौतमीपुत्र सातकर्णि याने त्याचा निर्देश पुढीलप्रमाणे केला आहे — गामे अपरकखडिये य खेतं अजकालकियं उसभदातेन भूतं निवतनसतानि बे'.

३. आकृति ३ पाहा.

४. एपि. इं., व्हॉ. ८, पृ. ७१.

याचा अर्थ अद्यापि विद्वानांना लागला नाही. बुल्हर व भगवानलाल यांनी 'अजयकालकिय' म्हणजे अद्यकालिक असे समजून 'जे २०० निवर्तनांचे शेत आतापर्यंत ऋषभदत्ताने उपभोगिले' असा अर्थ केला होता. सेनार्टला तो पसंत पडला नाही. 'अजकालकिय' हे एका शेताचे नाव असावे असे त्याने म्हटले आहे, पण ते नाव कसे पडले, हे आपणास सांगता येत नाही अशी स्पष्ट कबूली त्याने दिली आहे. त्या शेताचे ते नाव 'अजकालक' नामक यक्षाच्या नावावरून पडलेले दिसते. या यक्षाची प्रतिमा मध्यभारतातील भारहूत येथील स्तूपाला अलंकरणार्थ लावलेल्या स्तंभावर कोरली असून त्याच्या खाली 'अजकालको यखो' असा कोरीव लेख आहे.[५] इतरही अनेक यक्षांच्या प्रतिमा येथे कोरल्या असून त्यांच्या खाली त्यांची नावे दिली आहेत. या अजकालक यक्षाच्या नावे पूर्वोक्त शेत प्रख्यात असावे. भारहूत येथे एका यक्षिणीच्या प्रतिमेखाली 'यखिनि सुदसन' असा लेख आहे.[६] या यक्षिणीच्या नावे एक 'सुदसना' गाव नाशिकजवळ होते. याचाही उल्लेख नाशिकजवळच्या लेण्यातील एका लेखात आला आहे.[७]

भारहूत येथील अजकालक यक्षप्रतिमेशी प्रस्तुत पदकावरील व्यक्तीचे काही बाबतीत सादृश्य असल्याने तोच यक्ष येथे विवक्षित असावा असे वाटते. भारहूत येथील स्तंभावरील यक्षप्रतिमेचा फोटो कॉर्पस इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम, व्हॉ. २, भाग २ (ब्राह्मी इन्स्क्रिप्शनम्) या ग्रंथात प्लेट २९, आकृति B 3 मध्ये छापला आहे.[८] तोच येथे देत आहे. त्या प्रतिमेचे वर्णन येणेप्रमाणे – हा अजकालक यक्ष कुबेर मूर्तीच्या समोर उभा आहे. त्याच्या उजव्या हातात कमलकलिका असून तो हात त्याने आपल्या छातीसमोर धरला आहे. डावा हात खाली सोडला असून त्याचा अंगठा व तर्जनी यामध्ये काही वस्तु धरली आहे. हा यक्ष एका मकरावर उभा असलेला दाखविला आहे. त्याचे पुढील पाय सिंहाच्या पायासारखे असून ते त्याने आपल्या तोंडात घातले आहेत.

अजकालक यक्ष ज्या मकरावर उभा दाखविला आहे त्याची आकृति प्रस्तुत पदकावरील आकृतीसारखी असल्यामुळे पदकावर त्याचा जबडा फाकत असलेली व्यक्ति अजकालक यक्षच असावी. त्या यक्षाने पदकात दाखविल्याप्रमाणे मकराला जेरीस आणल्यावर त्याला भारहूत येथील स्तंभशिल्पात दाखविल्याप्रमाणे आपले वाहन केलेले दिसते.

'पण या यक्षाची आकृति अशा पदकावर उमटविण्याचे कारण काय?' असा प्रश्न येथे उपस्थित होतो. त्याचे उत्तर असे –

या यक्षाचा बुद्धाच्या चरित्रात उल्लेख आला आहे. उदानसुत्तात त्याचे नाव 'अजकालापक' असे आले आहे. या नावाचे स्पष्टीकरण त्यावरील टीकेत असे दिले आहे की त्याला 'अज' किंवा बकरे यांचे 'कलाप' किंवा समूह बांधून बळी दिले जावेत अशी इच्छा असते. याचा बुद्धाच्या चरित्राशी संबंध येतो तो असा[९] – एकदा बुद्ध त्याच्या निवासस्थानात जाऊन बसला. जेव्हा सातागिरि (सप्तगिरि), हेमवत (हैमवत) वगैरे यक्षांनी अजकालापक यक्षाला ही बातमी दिली तेव्हा तो रागावला आणि तेथे येऊन आपल्या मायेच्या सामर्थ्याने बुद्धाला भिववू लागला. तेव्हा बुद्धाने उदान म्हणून त्याला शांत केले. पुढे तो बुद्धाला शरण गेला.

मुचलिंद नागाची कथा बौद्ध स्तूपांच्या वेदिकास्तंभावर कोरलेली आढळते तसाच हा प्रकार असावा. म्हणून धार्मिक बौद्ध त्याचे चित्रण असलेली प्रस्तुतसारखी पदके पूजेकरिता करवीत असावे.

याप्रमाणे प्रस्तुत पदकाचा 'शाकुन्तला'तील प्रसंगाशी किंवा कालिदासाच्या कालाशी यत्किंचितही संबंध नाही.

३. प्रमाण तिसरे –

हरिस्वामीच्या श्रुत्यर्थविवृतीचा पुरावा –

डॉ. वाकणकर म्हणतात – "डॉ. स. ल. कात्रे यांनी 'विक्रमादित्याचा धर्माध्यक्ष हरिस्वामी ह्याने कलियुगाच्या ३०४७ या वर्षी (म्हणजे विक्रमसंवताच्या तिसऱ्या वर्षी) शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यन्दिन शाखेच्या शतपथ ब्राह्मणावर आपली श्रुत्यर्थविवृति ही टीका लिहिली' असे सिद्ध केले आहे. या त्यांच्या शोधास अमान्य करण्याचे काहीच कारण नाही."

---

५. भारहूत इन्स्क्रिप्शन्स् (सं. ल्यूडर्स वगैरे) पृ. ७४.
६. पूर्वोक्त, पृ. ८०
७. एपि. इं.; व्हॉ. ८, पृ. ६५.
८. इतरत्र दिलेली आकृति ४ पाहा.
९. ही माहिती डॉ. पी. व्ही. बापट यांनी पुरविली, तिच्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सकृद्दर्शनी हा पुरावा बिनतोड वाटला. डॉ. वाकणकरांनी डॉ. कात्र्यांच्या लेखाचा संदर्भ दिला नव्हता. त्यांचा हा लेख आमच्या वाचनात आला नव्हता. म्हणून आम्ही उज्जैनीच्या शिंदे ओरिएंटल इन्स्टिट्यूटच्या क्यूरेटरशी पत्रव्यवहार करून त्या लेखाची माहिती मिळविली तेव्हा तो लेख डॉ. कात्रे यांनी 'विक्रम–स्मृति ग्रंथ' (हिन्दी) मध्ये पृ. ३७५–३८३ वर प्रसिद्ध केल्याचे समजले. डॉ. कात्रे विख्यात संशोधक होते. तेव्हा त्यांनी पूर्वोक्त पुराव्यावरून विक्रमादित्य राजा ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला असे सिद्ध केले असल्यास त्यांच्या प्रमाणाचे परीक्षण केले पाहिजे असे वाटून आम्ही त्यांच्या लेखाचा अभ्यास केला. त्यात खाली माहिती आढळली.

हरिस्वामीचे 'शतपथ ब्राह्मणा'वरील भाष्य फार थोडे उपलब्ध झाले आहे. त्या ब्राह्मणग्रंथावरील सायण भाष्याचाही कांही भाग उपलब्ध आहे, पण तो 'शतपथ ब्राह्मणा'च्या ज्या भागावर हरिस्वामीचे भाष्य उपलब्ध नाही त्यावरचाच आहे.[१०] त्यावरून हरिस्वामी हा सायणापूर्वी होऊन गेला असून त्याचे भाष्य ज्या भागांवर नव्हते त्या भागावरच सायणाने आपले भाष्य लिहिले असे दिसते. काही अध्यायांवरील या भाष्याच्या शेवटी पुढील श्लोक आढळतात –

नागस्वामिसुतोऽवन्त्यां पाराशर्यो वसन् हरिः ।
श्रुत्यर्थं दर्शयामास शक्तितः पौष्करीयकः ॥१॥

श्रीमतोऽवन्तिनाथस्य विक्रमार्कस्य भूपतेः ।
धर्माध्यक्षो हरिस्वामी व्याख्यच्छातपथीं श्रुतिम् ॥२॥

भूभर्त्रा विक्रमाख्येन क्लृप्तां कनकवेदिकाम् ।
दानायाध्यास्य कृतवान् श्रुत्यर्थविवृतिं हरिः ॥३॥

या श्लोकांवरून 'शतपथ ब्राह्मणा' वर 'श्रुत्यर्थविवृति' नामक भाष्य लिहिणारा हरिस्वामी हा पराशर गोत्री नागस्वामीचा पुत्र होता, त्याचे मूळ गाव अजमेरजवळचे पुष्कर क्षेत्र हे होते; तो अवन्तिनृपति विक्रमादित्याच्या दरबारी धर्माध्यक्ष व दानाध्यक्ष होता; त्याने विक्रमादित्याने केलेल्या सोनेरी व्यासपीठावर बसून ही 'श्रुत्यर्थविवृति' लिहिली, अशी माहिती आपणांस मिळते.

या श्लोकांत हरिस्वामीने आपला काल उल्लेखिला नाही. त्यामुळे ज्या विक्रमादित्याच्या दरबारी तो होता तो ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेला असे सिद्ध होत नाही. "त्या शतकात कोणी विक्रमादित्य उज्जैनीस राज्य करीत होता असे सिद्ध होईपर्यंत तो द्वितीय चन्द्रगुप्त – विक्रमादित्य किंवा स्कन्दगुप्त – विक्रमादित्य यांच्यापैकी एकाच्या दरबारी होता असे मानण्यात कोणतीही हानि होणार नाही" असे डॉ. कात्रे यांनी स्पष्ट म्हटले आहे. (पृष्ठ ३८० पाहा.) 'त्यांनी हरिस्वामीचा आश्रयदाता संवत्संस्थापक विक्रमादित्य होता असे सिद्ध केले आहे.' हे डॉ. वाकणकरांचे विधान वाचकांच्या डोळ्यांत धूळ फेकणारे आहे.

पंजाब युनिव्हर्सिटीचे संस्कृत विभागाचे अध्यक्ष डॉ. लक्ष्मणस्वरूप यांनी काही वर्षांपूर्वी "आपणांस वाराणसी येथील गव्हर्नमेंट संस्कृत लायब्ररीकडून 'शतपथभाष्या'च्या संवत् १८४९ मध्ये (अर्थात् १८३ वर्षांपूर्वी) लिहिलेल्या पोथीत खालील श्लोक असल्याचे कळविण्यात आले होते" असे प्रसिद्ध केले आहे :–

नागस्वामी तत्र. . .श्रीगृहस्वामिनन्दनः ।
तत्र याजी प्रमाणज्ञ आढ्यो लक्ष्म्या समेधितः ॥५॥

तन्नन्दनो हरिस्वामी प्रस्फुरद्वेदवेदिमान् ।
त्रयीव्याख्यानधौरेयोऽधीततन्त्रो गुरोर्मुखात् ॥६॥

यः सम्राट् कृतवान्सप्तसोमसंस्थास्तथर्क्श्रुतिम् ।
व्याख्यां कृत्वाध्यापयन्मां श्रीस्कन्दस्वाम्यस्ति मे गुरुः ॥७॥

श्रीमतोऽवन्तिनाथस्य विक्रमस्य क्षितीशितुः ।
धर्माध्यक्षो हरिस्वामी व्याख्यां कुर्वे यथामति ॥८॥

यदादीनां(=यदाब्दानां)कलेर्जग्मुः सप्त त्रिंशच्छतानि वै ।
चत्वारिंशत्समाश्चान्यास्तदा भाष्यमिदं कृतम् ॥९॥

हे श्लोक हरिस्वामीच्या शतपथ ब्राह्मणावरील भाष्याच्या दुसऱ्या कोणत्याही हस्तलिखितात आढळले नाहीत. यात हरिस्वामीची वंशावळ गृहस्वामी – नागस्वामी – हरिस्वामी अशी दिली असून हरिस्वामी हा स्कन्दस्वामीचा शिष्य होता अशी नवीन माहिती दिली आहे. शेवटल्या श्लोकात त्याच्या भाष्यरचनेचा काल दिला आहे. डॉ.

---

१०. भांडारकर इन्स्टिट्यूटच्या हस्तलिखितांच्या सूचीत हरिस्वामीच्या भाष्याचे कांड १ (अध्याय ८), ८, ९, १० व १३ हे भाग निर्दिष्ट केले आहेत तर सायण भाष्याचे कांड १ (अध्याय १–७), ४, ५, ६ व १० हे आहेत.

लक्ष्मणस्वरूप यांना तो श्लोक नीट समजला नव्हता. डॉ. कात्रे यांनी त्याचा अर्थ 'कलियुगाच्या ३०४७ या वर्षी हरिस्वामीने आपले भाष्य रचले' असा दाखविला आहे.

पण त्यांनी हे विधान प्रमाण मानले नाही. कारण ते इतर कोणत्याही हस्तलिखितात आढळत नाही. त्यांचे शब्द असे आहेत[११]– "वर्तमान अवस्था में यह कहना असंभव है कि श्लोक में इस अर्थ के अनुसार किया हुआ विधान वस्तुस्थितिपर आधारित है अथवा ज्योतिर्विदाभरण के समयनिर्देश के सदृश केवल कल्पना से गणित की सहायता से किया गया है।" (पृ. ३८३). तेव्हा डॉ. कात्रे यांनी वाकणकरांना इष्ट असा विक्रमादित्याचा काळ मान्य केला होता, ही केवळ लोणकढी थाप आहे.

विक्रमादित्याच्या गुप्तकालीनत्वावरील आक्षेपांचे परीक्षण

ह्या प्रदीर्घ लेख संपविण्यापूर्वी डॉ. वाकणकरांनी 'कालिदास गुप्तकाली होऊन गेला' ह्या पक्षावर जे आक्षेप घेतले आहेत, त्यांचे परीक्षण केले पाहिजे. त्यांचे आक्षेप खाली देऊन त्यांचे परीक्षण केले आहे.

आक्षेप (१) – गुप्तकालीन अवशेष उज्जयिनीस सापडले नाहीत. कालिदासाने 'मेघदूता'त उज्जयिनीचे वर्णन केले आहे ते गुप्त काळाला लागू पडत नाही.

उत्तर – सर्वच प्राचीन राजधानींत तत्कालीन अवशेष आता आढळतात असे नाही. उदाहरणार्थ, पाटलिपुत्र ही गुप्तांची व वत्सगुल्म ही वाकाटकांची राजधानी होती. तेथे अनुक्रमे गुप्तांचे व वाकाटकांचे किती अवशेष मिळाले आहेत ?

आक्षेप (२) – गुप्तांचे आधिपत्य उज्जैनीवर नव्हते. उज्जैनीत त्यावेळी रुद्र, रुद्रिल, जिष्णु, रविल हे राजे राज्य करीत होते. त्यांची नाणी शेकडोंनी उज्जैनीला मिळतात.

उत्तर – डॉ. वाकणकरांनी ही नाणी अद्यापि प्रसिद्ध केली नाहीत. ती प्रसिद्ध केल्यावर ती इ. स. ३०० ते ५०० या गुप्तकालातील आहेत किंवा त्या पूर्वीची आहेत ते ठरविता येईल. ती बहुधा विदिशच्या नागराजांची असावी. विदिशेस गुप्तपूर्व कालात नागराजे राज्य करीत होते असे पुराणे सांगतात.[१२] विदिशेभोवतालच्या प्रदेशास दशार्ण नाव होते. त्याच्या पश्चिमेच्या प्रदेशास 'आकरावंती' असे म्हणत. (गौतमीपुत्र सातकर्णीविषयी नाशिकच्या लेण्यातील कोरीव लेखातून मागे उद्धृत केलेला उतारा पाहा.) या प्रदेशावर पश्चिमेच्या क्षत्रपांचे राज्य होते. त्याची बहुतेक नाणी चांदीची आहेत. तेव्हा व्यवहाराच्या सोईसाठी विदिशेच्या नाग राजांची नाणी त्यांच्या राज्यात चालत असल्यास आश्चर्य नाही. प्राचीन भारतीय इतिहासात अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील.

गुप्तांचे राज्य आकरावन्तीवर (सध्याच्या माळव्यावर) होते हे सर्वमान्य आहे. ते सहज सिद्ध करता येते. गुप्तपूर्वकालात हा प्रदेश क्षत्रपांच्या राज्यात मोडत होता. त्यांची नाणी सुमारे सन ३९० पर्यंतचीच सापडतात. नंतर त्यांचा उच्छेद करून चन्द्रगुप्त विक्रमादित्याने तेथे आपले राज्य स्थापले व क्षत्रपांच्या नाण्यांसारखी नाणी पाडली हे सिद्ध झाले आहे. पूर्वेच्या दशार्ण देशावर व पश्चिमेच्या सौराष्ट्रावर गुप्तांचे राज्य असताना त्यांमधील आकरावन्तीचा प्रदेश मात्र त्यांच्या ताब्यात नव्हता असे असणे शक्य नाही.

चन्द्रगुप्त विक्रमादित्य उज्जैनीस राज्य करीत होता

गुप्तांचे राज्य उज्जैनीस होते याला पुरावा आहे. दक्षिणेतील 'गुत्त' राजे 'उज्जयिनीपुरवरेश्वर' असे बिरुद धारण करीत. यासारख्या कलचुरींच्या 'माहिष्मतीपुरवरेश्वर' आणि शिलाहारांच्या 'तगरपुरवरेश्वर' या बिरुदांप्रमाणे त्या बिरुदाचा अर्थ त्यांचे पूर्वज प्राचीन काळी उज्जयिनीस राज्य करीत होते असाच केला पाहिजे. डॉ. वाकणकरांस हे बिरुद माहीत आहे, पण ते त्यावरून औलिकर राजांचे राज्य उज्जयिनीस होते असे अनुमान करतात. पण औलिकरांनी 'गुप्त' पदांकित नावे कधीही धारण केली नव्हती. त्यांचा वंश गुप्त नव्हता. तेव्हा हे अनुमान चूक आहे.

---

११. विक्रम-स्मृति (हिन्दी), पृ. ३८३ पाहा.
१२. पार्जिटरचे 'डायनेस्टीज ऑफ दि कलि एज', पृ. ४९ पाहा.

द्वितीय चन्द्रगुप्ताचे राज्य उज्जैनीस कधीच नव्हते असे विधान डॉ. वाकणकर ठासून करतात. त्यांचे लक्ष राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'तील पुढील श्लोकाकडे आकृष्ट करतो–

श्रूयते चोज्जयिन्यां काव्यपरीक्षा – इह कालिदासमेण्ठावत्रामररूपसूरभारवयः। हरिचन्द्रगुप्तौ परीक्षिताविह विशालायाम् ॥

या श्लोकावरून विशाला (उज्जयिनी) मध्ये कालिदासाप्रमाणे चन्द्रगुप्ताची काव्यनिर्मितीत विद्वानांनी परीक्षा घेतली होती अशी आख्यायिका राजशेखरकाली प्रचलित होती असे दिसते.[13] पद्मगुप्त, कल्हण, मेरुतुंग यांच्या आख्यायिकांवर भिस्त ठेवणारे डॉ. वाकणकर त्या ग्रंथकारांपूर्वी कांही शतके होऊन गेलेल्या राजशेखराच्या विधानाला योग्य तो मान देतील अशी आशा आहे.

गुप्तांचे राज्य माळव्यात होते व त्यांच्या अमलाखाली उज्जैनी नगरी मेघदूतात वर्णिल्याप्रमाणे सुसमृद्ध होती हे सर्व प्राचीन भारतीय इतिहासाच्या जाणकारांस मान्य आहे. त्यांच्या विरुद्ध आपले क्रान्तिकारक मत पुढे मांडण्यापूर्वी डॉ. वाकणकरांनी उपलब्ध पुराव्याचा निर्विकार मनाने विचार करावा, एतदर्थ या लेखाचा प्रपंच केला आहे. डॉ. वाकणकरांनी प्रागैतिहासिक कालाची सामग्री प्रकाशित करण्यात स्पृहणीय कामगिरी केली आहे. ऐतिहासिक साधनांचा उपयोग त्यांनी तारतम्याने करावा असे त्यांस सुचवून हा प्रदीर्घ लेख समाप्त करतो.

इतरही नवीन संशोधनाचे परीक्षण पुढील लेखांकात करू.

१३. 'सुभाषितरत्नकोषा'दि सुभाषितसंग्रहांत घेतलेली विक्रमादित्याची सुभाषिते या चन्द्रगुप्त–विक्रमादित्याची असावी.

एक दिवस तुझा पण येईल!

उषाताई कोलते

आज वनिता विकास गृहात काय पण गर्दी झाली होती! आजपासून शारदोत्सवाची सुरवात व्हायची होती! शारदेची मूर्ति स्वतःच तयार करणं, मनोरंजनाच्या कार्यक्रमात नाटक बसवणं, भावगीताच्या तालावर नृत्य तयार करणं, खेळाच्या तालमी घेणं, अशा प्रकारच्या कामात गेले पंधरा दिवस गृहातल्या झाडून साऱ्या मुली, मोठ्या बायका व अधीक्षिका गुंतल्या होत्या! शारदेची स्थापना ज्या सभागृहात व्हायची होती तिची सजावटहि आकर्षक पद्धतीने मुलींनी केली होती! भोवतालच्या दारांना सारे कशिदांचे पडदे सोडलेले होते. समोर फुलांची रांगोळी घातलेली, बाजूला निसर्गसौंदर्याचा देखावा काढलेला, दिवाणखान्यात रंगीबेरंगी पताकांच्या माळा लावलेल्या, उदबत्त्यांचा घमघमाट सुटलेला, असा सारा थाट होता! गृहाच्या आवारांत सगळीकडे आनंदाचं वातावरण भरलेलं होतं! गृहातील सर्व लहान मोठ्या स्त्रिया सभागृहात जमल्या होत्या!

शारदोत्सवाच्या उद्‌घाटनासाठी गावातील थोर कार्यकर्त्या सौ. मालतीबाई कुळकर्णी यांना बोलावलं होतं. गृहातील सर्व व्यवस्था व मुलींच्या सर्वांगीण विकासाची योग्य ती काळजी घेतलेली पाहून मालतीबाईंनी समाधान व्यक्त केले. त्या मुलींना उद्देशून म्हणाल्या,

"मुलींनो, आजच प्रथम मी या गृहात पाऊल टाकलं, आणि ही संस्था किती उपयुक्त आहे याची मला जाणीव झाली! तुमच्या बाईंनी आज मला तुम्हाला चार शब्द सांगण्यासाठी बोलावलं पण मी खरोखर तुम्हाला काय सांगणार? कारण, माझं आयुष्य सरळपणाने अगदी सुखात गेलेलं आहे! परिस्थिति अनुकूल असल्यामुळे मी पुस्तकी शिक्षण घेतलं व माझं ज्ञान वाढवलं! तुमचं पुस्तकी शिक्षण माझ्याएवढं नाही खरं, पण तुम्ही माझ्यापेक्षा अधिक जाणत्या आहात. समाजाचे अनेक प्रश्न आम्ही फक्त जाणतो! तुम्ही त्यांना तोंड दिलं आहे! तुम्ही जग पाहिलं आहे. तुमच्यापैकी अनेक जणींना समाजाच्या क्रूरपणाला, समाजाच्या ढोंगाला बळी पडाव लागलं असेल! दारिद्र्य, नवऱ्याची व्यसनं, त्याचा जाच, त्याने केलेली मारहाण हे अनेक जणींना सहन करावं लागलं असेल! याची जाणीव किती सुशिक्षित स्त्रियांना असेल कोण जाणे! पण इथं आल्यानंतर तुमचं संरक्षण करून द्रव्यार्जनाचा काही उद्योग तुम्हाला शिकवून किंवा शिक्षण देऊन नोकरी करण्याची पात्रता तुम्हाला मिळवता येते. तुमच्यात असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून आजच्या सारखे कार्यक्रम आखले जातात. आताच तुम्हाला विविध कलाकौशल्याच्या कामात भरतकामात, धावण्यात, रांगोळ्या काढण्यात तुम्ही फारच प्रगति केलेली दिसली! यावरून तुम्हाला सुद्धा संधि मिळाल्यास तुम्ही इतरांप्रमाणे प्रावीण्य मिळवू शकता हे सिद्ध होतं! इथे तुमचं संरक्षण होतं, तुमचं शालेय शिक्षण होतं, नवार शिकणं, खेळणी करणं, नर्स, दाई, ग्रामसेविका ह्यासारखा अभ्यासक्रम पार पाडणं, किंवा उत्पादन केंद्रात काम करणं अशासारख्या उद्योगाने तुम्हाला पैसा मिळवायचं सामर्थ्य मिळवून देणं हे या संस्थेचं उद्दिष्ट आहे व ते चांगल्या तऱ्हेने पार पाडलं जात आहे असं मला दिसून आलं! आजचे तुमचे सामने पाहिले, खेळांच्या चढाओढी पाहिल्या यावरून तुम्हीहि इतर मुलींप्रमाणे गुणी आहात, तुमच्यात कला आहे, शक्ति आहे, स्वतंत्र रीतीनं जीवन जगण्याची पात्रता आहे, तुमच्या व्यक्तित्वाचा विकास व्हावा म्हणून चालकांची सारी धडपड आहे! जरूर तुमचा विकास होईल, तुम्ही सामर्थ्यशाली व्हाल आणि यापुढे कोणत्याहि फसवेगिरीस दाद देणार नाही! याची मला खात्री आहे! इतके दिवस समाजाने तुमची उपेक्षा केली पण एक दिवस असा येईल की, तुमच्या मनावरची ही काजळी झडेल, तुमची जीवनासंबंधीची उदासीनता, भीति जाईल आणि तुम्ही

गृहिणी, सुमाता व देशाच्या उत्तम नागरिक व्हाल! जरूर एक दिवस तुमचाहि येईल!"

भाषण संपताच टाळयांचा कडकडाट झाला. पण प्रभाचं लक्ष कुठे होतं त्याकडे! शेवटचं वाक्य तिच्या कानात घुमत होतं—'काय – एक दिवस तुमचा पण येईल! – काय माझा! उपेक्षितेचा! पुरुषाच्या वासनेला बळी पडलेल्या निरपराध प्रभाचा'—

प्रभाने आपले डोळे घट्ट मिटून घेतले. तिला एकदम अंधार दिसला – त्या भयंकर दिवसाची तिला आठवण झाली. भोवतालच्या मुली उठून गेल्या तरी ती तशीच बसून राहिली. तिच्या डोळ्यापुढून तिच्या जीवनाचा चित्रपट सरकला.

प्रभा वयाच्या दहाव्या वर्षीच आईबापाविना पोरकी झाली. वसंतावरच धाकट्या प्रभाच्या व सहा वर्षांच्या राजूच्या पोषणाचा भार पडला! वसंताचं शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालं होतं. लगलीच तो मोटारीच्या कारखान्यात कारकून म्हणून लागला होता! त्याचा स्वभाव अगदी शांत! आपलं काम बरं की आपण बरं अशी त्याची वृत्ति होती! वसंताचं लग्न झालं तेव्हा प्रभाला किती आनंद झाला! आपल्याला वहिनी येणार म्हणजे आपलं हक्काचं माणूस येणार! शाळेतून सहलीला जायचं असलं म्हणजे आता वहिनी फराळाचं देईल, आपला दादा सदा गर्दीत! त्याला आपल्या गमती जमती सांगितल्या तरी त्याला त्याचं काहीच नसतं – आता आपल्या साऱ्या गमती जमती वहिनीला सांगू! ती शेजारची सुमन, सारखं आपल्या आईचंच कौतुक सांगत असते, मी पण आता माझ्या वहिनीचं सांगेन असं तिला वाटलं.

पण तिचा अंदाज चुकला. वहिनी आल्यानंतर एकादं वर्ष ठीक गेलं. तिने प्रभाची व राजूची वरवर तरी चांगली काळजी घेतली. पण पुढे तिला त्यांची अडचण वाटू लागली. त्या भावनेने ती दोघांना वागवू लागली. आपल्या राजूची कपड्यांची, खेळांची हौस पुरी होत नाही म्हणून प्रभाला फार वाईट वाटे. आता ती चौदा वर्षाची होती. आपण वहिनीला त्रास देऊ नये हे तिला समजत होतं. प्रभाला शाळेत पाठवायचं म्हणजे चांगले कपडे हवेत, फीला पैसे हवेत, शिवाय शाळेतला अभ्यास करण्यासाठी घरी वेळ द्यायला हवा म्हणून तिची शाळाहि बंद करण्यात आली. आपल्या दादाला त्रास होऊ नये म्हणून ती फार जपायची! रोज पहाटे उठून झाडझूड करावी, घरातलं वरचं काम करावं व वहिनीला स्वैंपाकात मदत करावी असा तिचा कार्यक्रम असायचा! एकादं काम रेंगाळलं किंवा त्यात काही चूक झाली तर वहिनीचा किती राग व्हायचा तिच्यावर! राजूशी बोलणं, त्याच्या जेवणाखाण्याची काळजी घेणं हाच तिचा आनंद होता!

तिचा हा कार्यक्रम शेजारचा विश्वास पाहात असे. त्याला या मुलीबद्दल सहानुभूति वाटायची! चाळीतल्या नळावर प्रभा पाणी भरायला गेली की नंबर लावण्यासाठी तिला जेव्हा थांबायला लागायचं तेव्हा परत आल्यावर वहिनींची तिच्यावर जी सरबत्ती व्हायची ती विश्वासला ऐकू जायची! विश्वास सायन्स कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षात शिकत होता! कधी कधी तो पुढे होऊन तिला अगोदर पाणी भरू देत असे! एक दिवस त्याच्या कानावर खालील संवाद पडला.

"वहिनी, आज राजू प्रदर्शनाला जायचं म्हणतो. शेजारचा बाळूकाकांचा रमेश, प्रभाकर, तीनचार मुलं, व आम्ही दोघी तिघी मुली जाऊ का प्रदर्शन पाहायला?"

"काय अडलं आहे तुमचं प्रदर्शनावाचून! कसलं आलं आहे प्रदर्शन नि विदर्शन! सगळी दुकानंच असतात ना! दुकान कधी पाहिली नाहीत की काय? तो दुकानदार कोणी काका मामा आहे का तुमचा फुकट द्यायला तुम्हाला! कुठून आणायचे पैसे तुमचे चोचले पुरवायला! काही डबोलं ठेवलं आहे का नानांनी तुमच्या? त्या काटर्यांचं पुरं करता करता नाकी दम येतो आमच्या!" इतकं बोलल्यानंतर प्रभा काय सांगणार? मुसमुसणाऱ्या राजूची तिने कशीतरी समजूत घातली. दुसरे दिवशी विश्वासने त्याला प्रदर्शनात फिरवून आणलं. प्रभाच्या समंजसपणाचं त्याला मोठं कौतुक वाटलं तेव्हा!

ती आठव्या वर्गात गेली तेव्हा वहिनींची तब्येत विघडली! अलीकडे त्यांना घेऱ्या यायच्या! डॉक्टरांची औषधे त्यांना चालू झाली. त्यामुळे घरचं आटोपून प्रभाला शाळा नियमितपणे कशी साधणार? तिच्या खूप सुट्या लागायच्या! वहिनींच्या बाळंतपणामुळे तर तिला शाळेला रामरामच ठोकावा

लागला ! वहिनी आपल्या बाळाच्याच खिदमतीत गुंतलेल्या असायच्या ! चौदा वर्षांची कोवळी पोर ती ! कामाखाली चुरडून जायची ! का कुणास ठाऊक पण प्रभाच्या नेहमीच्या जीवनक्रमाकडे विश्वासचं लक्ष असायचं ! मध्यम स्थितीतल्या गरिबीमुळे व आईची सावली नसल्यामुळे व वहिनीच्या रोषाला विनाकारण कारणीभूत झालेल्या प्रभाबद्दल त्याला सहानुभूति वाटायची ! तिचे श्रम हलके करावे, तिचं बाहेरचं एकादं काम करावं, बाजारहाट करून द्यावा, असं त्याला फार वाटे ! वसंता तर सकाळी ८ पासून कारखान्यात जायचा तो एकदम संध्याकाळी ६ वाजता घरी परतायचा ! कारखाना फार दूर असल्यामुळे तो मधे जेवायलाहि येत नसे. त्यामुळे विश्वासला प्रभाला मदत करण्याचा योग पुष्कळ वेळा येत असे ! प्रभाला त्याबद्दल किती कृतज्ञता वाटे ! पण ती बिचारी त्याच्यासाठी काय करणार ? फक्त नजरेने आपली कृतज्ञता ती व्यक्त करू शकत होती ! तिचे ते डोळे पाहिले की विश्वासला आपण कृतकृत्य झालो असे वाटे ! एका दिवशी तो प्रभाला म्हणाला, "प्रभा, मी आठ दिवसांनी खडकपूरला जाणार ! इंजिनियरिंग कॉलेजमधे मला प्रवेश मिळाला आहे. आठवण ठेवशील ना माझी ? मी तिथे असलो तरी रोज तुझी आठवण होईल मला तिथे ! पत्र पाठवून खुशाली कळव हं ! उत्तर देशील ना तू मला ? मी तुला तिकिटासाठी पैसेहि पाठवीन. पण मला तुझ्या हातचं उत्तर आलंच पाहिजे हं !"

प्रभाचा गळा दाटून आला. डोळे अश्रूंनी डबडबले. तिच्या तोंडातून शब्द उमटेना ! ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. विश्वासने तिचे हात आपल्या हातात घेतले व पाठीवरून हात फिरवून तो म्हणाला, "धीर धर प्रभा, हेहि दिवस जातील तुझे ! आज जरी तुला कष्ट करावे लागत असले तरी एक दिवस जरूर तुला आनंदाचा येईल. तुझ्यासाठी धडपडणारं कुणीतरी आहे हे लक्षात ठेव."

विश्वासच्या म्हणण्याप्रमाणे काही दिवस तिला पत्रं आली. आपल्या साध्यासुध्या भाषेत तिने उत्तरं दिली. पण पुढं कां कोण जाणे, विश्वासची पत्रं तिला मिळाली नाहीत !

वहिनींची तीन बाळंतपणं झाली ! प्रभा कामाच्या रगाड्याखाली चुरडून गेली होती ! विश्वासची पत्रं बंद झाल्यापासून तिला आयुष्यात राम वाटेनासा झाला ! पण तिचा राजू ! व तिचं कर्तव्य ! वहिनीला आता ती हक्काची मोलकरीणच मिळाली होती. कारण, बाळंतपणामुळे वहिनींची शक्ति नाहीशी झालेली होती. त्यांना मुंबईला नेऊन डॉक्टरांना दाखवावं असं नेहमीच्या डॉक्टरांनी सांगितलं म्हणून वसंता व वहिनी तिन्ही मुलांना व राजूला प्रभाच्यावर टाकून ती दोघं आठ दिवसासाठी मुंबईला गेली.

दुसरेच दिवशी प्रभा स्टोव्ह पेटवीत असताना जवळच असलेल्या स्पिरिटच्या बाटलीने पेट घेतला. प्रभा गडबडली. ती झटकन बाजूला सरली. तरी तिचे दोन्ही हात पोळलेच. भडका पाहताच समोरच्या कोपऱ्यात सुरेंद्र बागची नावाचा औषधांचा एजंट Medical Representative राहात होता, त्याने पाहिलं. आणि तो धावत आला. त्याने शेजारच्या खोलीतलं गरम पांघरूण झटकन ओढलं आणि ते प्रभाच्या अंगावर टाकलं. ताबडतोब त्याने तिला औषधोपचार केले. प्रभाला फार संकोच वाटला ! सुरेंद्र तर नुकताच राहायला आलेला दिसत होता ! त्याची काहीच माहिती नव्हती तिला ! त्याच्याबद्दल तिला अत्यंत कृतज्ञता वाटली ! तो धावून आला नसता तर आपलं काय झालं असतं कोण जाणे ! दादा आपल्याला काय म्हणेल ! अन् वहिनी ! बापरे ! किती भयंकर रागावतील ! आपल्याला होणाऱ्या त्रासापेक्षा वहिनींच्या रागाचीच तिला भीती वाटली ! आठ दिवस झाले तेव्हा दादा येईल म्हणून ती पत्राची वाट पाहात राहिली ! पत्र आलं पण काय ! वहिनींचं पत्र होतं ते ! दादाहि टायफॉइडने पडला ! ४२ दिवसांच्या मुदतीचा टायफॉइड ! बापरे ! आता हे दिवस कसे काढायचे ! किती दिवस आपण एकटं राहायचं ! किती दिवस त्या सुरेंद्राचे उपकार घ्यायचे ! पण मग करणार तरी काय ? विश्वासचा पत्ताहि तिला ठाऊक नव्हता ! त्याचं विन्हाड केव्हाच समोरून हाललं होतं ! विश्वासचं काही पत्रहि येत नव्हतं ! रोज सुरेंद्र यायचा, प्रभाशी गप्पा मारायचा, मुलांशी खेळायचा, राजूच्या अभ्यासाची चौकशी करायचा ! त्यामुळे प्रभाचा विश्वास त्याच्यावर बसला ! ती मोकळेपणाने त्याच्याशी बोलू लागली. तो बंगाली असला तरी अलीकडे त्याला मराठी समजायला लागलं

होतं ! मोडक्या तोडक्या हिंदीत त्यांचं बोलणं चालायचं !

एके दिवशी सुरेंद्राने तिला आग्रहाने म्हटलं, "किती दिवस असं घरांतच राहणार तू ? दिवसभर श्रम तरी किती करतेस ? तुला काहीतरी करमणूक नको का ? आपण आज सिनेमाला जाऊं !" प्रथम प्रभाने त्याच्याबरोबर जायला आढेवेढे घेतले पण नंतर तिला तो मोह आवरता आला नाही. ती त्याच्याबरोबर सिनेमाला गेली. हळूहळू तिचा परिचय वाढत चालला, सुरेंद्राच्या व तिच्या गाठीभेटी होऊ लागल्या, कामामुळे कंटाळलेली प्रभा सुरेंद्राच्या सहवासात रमू लागली !

एक दिवस राजूला फणफणून ताप भरला त्यावेळी सुरेंद्रानेच तिला मदत केली. वारंवार त्याची मदत घ्यावी लागल्यामुळे त्याच्या उपकारांच्या ओझ्याखाली ती दबली गेली ! एक दिवस सुरेंद्राने विचारलं,

"लग्न करशील प्रभा तू माझ्याशी ? आता मी तुझ्याशिवाय राहू शकत नाही ! माझं कलकत्त्याला घर आहे, शेती आहे, सर्व काही आहे. तुझे दादा व वहिनी आले की त्यांना विचारून पाहू ! तुझ्यासारखी सून आईला फार आवडेल !"

"नाही सुरेंद्र ! ते कसं शक्य आहे ? तुम्ही बंगाली, मी महाराष्ट्रीय. तुमच्या चालीरीती निराळ्या, आमच्या निराळ्या ! तेव्हा हे कसं जमायचं !" "त्याची काळजी करू नको प्रभा. मी सर्व पाहून घेईन ते !" प्रभाला मोह झाला ! विश्वास आता तिच्या दृष्टिआड झाला होता ! त्याची काहीच वार्ता नव्हती गेल्या दोन वर्षात ! मधून मधून तिला वाटे, काय हरकत आहे सुरेंद्राशी लग्न करायला ? दादा अन् वहिनी काय आपल्या लग्नाचं बघणार आहेत ! तिने सुरेंद्राला होकार दिला ! लग्नाच्या आमिषाने त्याच्या म्हणण्याला संमति देऊन स्वतःला नकळत एका संकटात टाकलं ! इतक्यात सुरेंद्राची बदली झाली व तो दुसऱ्या गावी गेला !

चार महिन्यांनी दादा व वहिनी परत आली तेव्हा प्रभाची तब्येत ठीक नव्हती, तिला घेऱ्या सुरू झाल्या होत्या. डॉक्टरांना दाखवताच खरा प्रकार वहिनींच्या लक्षात आला ! ती प्रभाला वाटेल तसं बोलली ! तिचा संताप अनावर झाला. असली कुलटा आपल्या घरात नको म्हणून तिला घरातून बाहेर हाकलून द्यावं असा हट्ट वसंतापाशी घेतला ! वसंताला मोठा प्रश्न पडला ! हे निस्तरण्यासाठी पैसा तरी कुठून आणायचा ! कारकुनाचं उत्पन्न ते काय ? पाच जणांचा संसार त्यात चालवायचा शिवाय दुखण्यात वाटेल तसा पैसा खर्च झालेला ! आता प्रभाला मोकळे करायचं म्हणजे शेदोनशे तरी रुपये हवेत ! ते कुठून आणायचे ! वरं भरल्या चाळीत तिला ठेवायचं तरी कसं ? एवढ्यात ५० मैलावर असलेल्या नाचणगावी अशा चुकलेल्या स्त्रियांसाठी एक आश्रयगृह निघाल्याचं त्यानं ऐकलं होतं. तिथे त्याने व सर्व चौकशी करून, तिला नीट मार्गाला लावावं, अर्थोत्पादनाला योग्य असं शिक्षण द्यावं अशी विनंती करून तो गेला !

आता प्रभाने शिवणकलेचा संपूर्ण शिक्षणक्रम पुरा केला होता.

मालतीबाईंचे भाषण संपताच तिला विश्वासच्या त्या बोलण्याची आठवण झाली ! एक दिवस तुझा पण येईल ! कधी येणार होता तो दिवस !

इतक्यात अधीक्षिका बाईंनी तिला हाक मारली. वसंताचं पत्र आलं होतं तिला – पत्रात विश्वासनं मागणी घातल्याचं दादानं कळवलं होतं. त्याला मधली सर्व हकीगत सांगितल्यानंतरहि विश्वास तिच्याशी लग्न करायला तयार होता ! हे वाचताच तिला हायसं वाटलं – अन् पटलं सुद्धा की प्रत्येक ढगाला रुपेरी कडा असतेच !

आधुनिक मराठी काव्य : नवे विश्लेषण

नरेंद्र पोफळी

उत्कृष्ट संस्कृत काव्याचे अनुकरण संत कवी व पंडित कवी करीत होते. संस्कृतातील काव्यरचनेचे प्रकार व तंत्र हे मराठी कवी पाळीत होते. इतकेच नव्हे तर संस्कृत महाकाव्यांचे 'रामायण' व 'महाभारत' हेच मराठी कवितेचे आद्य विषय होते. या सर्व कवींची शैली अलंकारिक व कृत्रिम होती. सर्वमान्य तत्त्वप्रणालीचा उच्चार करणारी कविता त्यांनी लिहिली. एकंदरीत ही मराठी कविता संस्कृत काव्याचे अनुकरण होते. इंग्रजी काव्येतिहासात ग्रीक व रोमन कवितेचे अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीवरूनच 'अभिजातवादी काव्य' (Classical poetry) असा प्रकार आला. त्याच आधारे संस्कृतचे अनुकरण करणाऱ्या मराठी कवींच्या काव्यास 'अभिजातवादी मराठी काव्य' असे म्हणता येते.

अभिजातवादाचे अपकर्ष युग

अव्वल इंग्रजी काळात परशुरामतात्या गोडबोले, राजवाडे, लेलेशास्त्री, खरेशास्त्री, पारखी, चिंतामणि पेठकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर इ. पंडिती वळणाची रचना करणारे कवी झाले. पंडितांची, शास्त्र्यांची कविता संस्कृत काव्याचे अनुकरण होते. ह्या काळात स्वयंतेजाचा प्रतिभावंत कवी मात्र झाला नाही व एकंदरीत 'अभिजातवादाचे अपकर्षयुग' (Decadence of classicism) हे नामाभिधान प्रस्तुत काळास अप्रयोजक ठरू नये, अशी मराठी काव्याची स्थिती होती.

नवशिक्षित कवींनी इंग्रजी कवितांची भाषांतरे व रूपांतरे करण्यास सुरुवात केली. त्यांची काव्यरचना म्हणजे आंग्ल काव्यातील रुचीचे निदर्शन मानता येईल, एवढेच. 'कुसुमांजली' कर्ते महाजनि व 'राजा शिवाजी' कर्ते कुंटे यांचे प्रयत्न ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचे खरे परंतु त्यांची काव्यनिष्ठा व काव्यनिर्मिती यामधील तफावत लक्षात घेता त्यांची रचना केवळ भाषादृष्टया व कालदृष्टया अर्वाचीन आहे, असे म्हणता येईल.

आधुनिक मराठी काव्य

मराठी काव्यात नवी काव्यदृष्टी प्रथम केशवसुतांच्याच काव्याने प्रकट झाली. केशवसुतांनी नवी काव्यदृष्टी प्रकट केली व मराठी काव्यसृष्टीत त्यांच्या काव्याने क्रांती घडून आली. म्हणूनच त्यांना 'आधुनिक मराठी काव्याचे जनक' म्हणावयाचे. केशवसुतांची काव्यदृष्टी अभिजातवादी काव्यदृष्टीहून पूर्णतः भिन्न स्वरूपाची आहे. "अशी असावी कविता फिरून। तशी नसावी कविता म्हणून ।। सांगावया कोण तुम्ही कवीला । आहात मोठे पुसतो तुम्हाला ।।" ह्या केशवसुतांच्या उत्स्फूर्त उद्‌गारापासूनच मराठी काव्याचे स्वरूप पालटण्यास सुरुवात झाली.

केशवसुत आणि रोमँटिसिझम

केशवसुतांनी, "करुनिया काव्य जनात आणणे। न मुख्य हा हेतू तदीय मी म्हणे ।। करूनि ते दंग मनात गुंगणे। तदीय सुंदर हेतु मी म्हणे", अशी नवी काव्यस्वतंत्रतेची कल्पनाही मांडली. केशवसुतांची काव्यदृष्टी व काव्य इंग्रजी काव्यातील 'रोमँटिसिझम'-च्या स्वरूपाचीच असल्यामुळे आधुनिक मराठी काव्यात रोमँटिसिझमला सुरुवात केशवसुतांपासूनच झाली असेही म्हणता येते.

रोमँटिसिझम : स्वरूप आणि समीक्षा

रोमँटिसिझम ही संज्ञा फारच वादग्रस्त ठरली आहे. (एफ्. एल्. ल्युकसने 'The decline and fall of the Romantic Ideal' ह्या पुस्तकात 'रोमँटिसिझम'च्या ११,३९६ व्याख्यांचा उल्लेख केला आहे.) पाश्चात्य वाङ्मयेतिहासात 'रोमँटिसिझम' ही संज्ञा क्लासिसिझमविरुद्ध घडून आलेली 'प्रतिक्रिया' ह्या स्वरूपात विशेष प्रचलित आहे. साहित्याचे विषय, रचनाप्रकार आणि शैलीतील पारंपरिकतेविरुद्ध क्रांतिकारी अशी ध्येये 'लिरिकल बॅलड्स' च्या प्रस्तावनेत मांडण्यात आली होती. "Poetry is the

अनुक्रमणिका

spontaneons overflow of the powerful feelings " ही वर्डस्वर्थने सांगितलेली व्याख्या प्रसिद्धच आहे. काव्य हे मानवी कृतींची अनुकृती किंवा प्रतिमा नसून कवीची स्वत:ची भावना हा काव्याचा आवश्यक घटक आहे असे मानणे ही वर्डस्वर्थची काव्यदृष्टी म्हणजेच रोमँटिक काव्यप्रकृती होय. भिन्न काव्य-मूल्यामुळे ही काव्यदृष्टी अभिजातवादी वस्तुनिष्ठ काव्यदृष्टीच्या विरोधी ठरते. तशीच रोमँटिक काव्यरचनापद्धतीही 'उत्स्फूर्तते'मुळे अभिजातवादी कृत्रिम शैलीच्या विरोधी ठरते. 'स्व-भावप्राधान्य' आणि 'उत्स्फूर्तता' ह्या मूलगामी तत्त्वांचे महत्त्व दर्शविताना वर्डस्वर्थने स्वत:च्या काव्याचे " emotions recollected in tranquility " असे वर्णन केले आहे. काव्यात योग्य प्रकारे प्रकटणारी 'उत्स्फूर्तता' मात्र चिंतनाचा परिपाक आहे ही गोष्ट वर्डस्वर्थने स्पष्ट केली आहे. चिंतनामुळे अधिक विचार आणि उजळणी होते तथापि रचनेची तात्काळ कृति (कविता 'अस्सल' genuine होण्यासाठी) 'उत्स्फूर्तच' झाली पाहिजे हेही वर्डस्वर्थने सांगून ठेविले आहे. कविता 'उत्स्फूर्त' ठरण्यासाठी रचनेच्या बंधनांपासून 'मुक्त' असली पाहिजे. म्हणजेच ती स्वाभाविक, स्वतंत्र व सहज (unforced) असावी. हीच गोष्ट स्पष्ट करतांना कीट्स म्हणतो, " If poetry comes not as naturally as the leaves to a tree, it had better not come at all." तत्वज्ञानी वृत्तीच्या कोलरीजने अभिजातवादी नियमबद्धतेला विरोध केला. त्याने, "एखादे रूप वांशिक गुणधर्माप्रमाणे वाढत जाऊन पूर्ण विकसित रूप प्राप्त करते, तसाच कवितेचा विकास व्हावयास पाहिजे" असा 'सेंद्रिय सिद्धांत' मांडला. एकंदरीत **रोमँटिक कवी उत्स्फूर्ततेस व स्वाभाविक रचनेस काव्यकृतीचा निकष मानतात.**

रोमँटिसिझम व नव-अभिजातवाद

(Neo-Classicism)

'लिरिकल बॅलड्स'च्या पूर्वीचे इंग्रजी काव्य म्हणजे ड्रायडन, पोप, गोल्डस्मिथ व बर्क यांचे काव्य 'नव-अभिजातवादी काव्य' समजण्यात येते, कारण ह्या कवींनी कडक पारंपारिकता स्वीकारली होती. त्यांना प्राचीन रोमन कवींविषयी-अभिजातवाद्यांविषयी नितांत आदर होता. ह्या नव-अभिजातवादी कवींच्या मते 'रोमन काव्य' हे सर्व महत्त्वाच्या साहित्य-प्रकारांचे आदर्श होण्यास योग्य होते, कारण ते काव्य सर्वोत्कृष्ट होते. ह्या नव-अभिजातवादी कवींचे काव्य 'वस्तुनिष्ठ' स्वरूपाचेच होते. या उलट रोमँटिक काव्य म्हणजे कवीचे स्व-भावाविष्करण आहे. अब्राहम्स म्हणतो, " Whether the romantic subject was the poet himself or someone else, *he was no longer part of an organized society but typically, a society figure engaged in a long – and sometimes infinitely elusive – quest,* often he was a social non–confirmist or outcast. Many romantic works had as protogonist the rebel, whether for good or ill. " (A Glossary of Literary Terms – page 107) **रोमँटिक कवीचे हे वेगळेपण ध्यानात घेतल्यास केशवसुत व तांबे, गडकरी व माधव ज्युलियन, अनिल व कुसुमाग्रज ह्या सर्वांनाच रोमँटिक संप्रदायातील कवी मानणे बरोबर नाही, ही गोष्ट स्पष्ट होते.** रोमँटिक कवीचे भावाविष्करण स्वत:च्या आगळचाच भावनेचे-कल्पनेचे-विचाराचे आविष्करण असते, सर्व-सामान्यांच्या साधारण भावनांचे आविष्करण नसते. प्रेयसीविषयक वाटणाऱ्या प्रणयाभूतीतील कुतूहल व उत्कटता, पतीच्या पत्नीविषयक प्रेमात नसते कारण पत्नीविषयक प्रेम सगळेच पति काव्यातून व्यक्त करू शकत नसले तरी त्यांचीही अनुभूति सर्वसामान्यपणे कवीसारखीच असते. नल-दमयंतीची विवाहपूर्व विरहव्यथा व लग्नानंतर त्यांना भोगावी लागणारी विरहव्यथा यातील पहिल्या अवस्थेतील हुरहूर कुतूहल-पूर्ण वाटते तशी दुसऱ्या अवस्थेतील वेदना कुतूहलपूर्ण ठरत नाही. ती सर्वसामान्य व पूर्व-परिचित वाटते ना? **रोमँटिक काव्यातील भाव उत्कट आणि कुतूहल-पूर्ण असतो. रोमँटिक काव्याचे हे वेगळेपण स्वानुभूती-मुळे, तशा आत्मप्रत्ययामुळे येत असते.** रोमँटिसिझम ही एक मनोवृत्ती असून ती सर्वांच्याच ठिकाणी आढळत नाही. **मनोवेधक कल्पना व आकर्षक चाल ह्यांच्या उपयोगाने सुंदर 'प्रेमगीत' लिहिणे हे रोमँटिसिझमचे वैशिष्टय मानणे बरोबर नाही.** शब्दार्थातून व्यक्त होणारी उत्कटता आणि संगीतामुळे जाणवणारी उत्कटता ध्यानी आणल्यास अस्सल रोमँटिक काव्य व रोमँटिक काव्याचा आभास ह्यातील फरक कळू शकतो. रोमँटिक कवी स्वत:स जाणवलेला आशय योग्य शब्दात पकडण्यासाठी तळमळत असतो.

रोमँटिसिझम म्हणजे काय हे सांगतांना Crompton-Rickette म्हणतात, " Romanticism, generally speaking, is the expression in terms of sharpened sensibilities heightened imaginative feelings." (A History of Eng. Literature, Page 292) **ही भावनेची उत्कटता व भरारी रोमँटिक काव्याचे खास वैशिष्ट्य ठरते.**

उत्कट भावनेच्या भरात तीव्र कल्पकतेमुळे पुढे फेकलेल्या काल्पनिक सृष्टीच्या प्रत्यंतरावरून रोमँटिक कवीस 'स्वप्नाळू' म्हटल्या गेले. परंतु ही स्वप्ने रोमँटिक कवींच्या महत्त्वाकांक्षी प्रवृत्तीची निदर्शक होत. इंग्रजी काव्यातील रोमँटिक कवींच्या महत्त्वाकांक्षी वृत्तीचे कारण फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव होय असे मत देणारा अब्राहम्स म्हणतो, " Man's unquenchable aspiration beyond his limits, which to the neo-classic moralist, had been his tragic error, now become man's glory and his truimph over the pettiness of circumstance. In a parallel way, the earlier judgement that the highest art is the perfect achievement of limited aims give way to a dissatisfaction with inherited rules and imposed restrictions. *According to a number of romantic writers, the highest art consists in the intrepid attempt beyond possibility, as a result, neo-classical satisfaction in the perfectly accomplished, because limited, enterprise was replaced by a preference for the glory of the imperfects, in which the artist's very failure attested the grandeur of his aim.* " (A Glossary of Literary Terms – Page 108.) ह्यावरून मराठी रोमँटिक कवींच्या काव्यातून आढळणाऱ्या स्वर्गसमक्षता, भव्य, दिव्य, अनंतत्व, अपूर्णत्व, अमूर्तत्व इ कल्पनांची कारण-मीमांसा लक्षात येते.

रोमँटिक काव्याविषयी क्राम्पटन-रिकेट म्हणतात, " The features most insistent in Romanticism are a subtle sense of mystery, an exuberant intellectual curiousity and an instinct for the elemental simplicities of life." वरील तिन्ही वैशिष्ट्ये मराठी काव्यात प्रथम केशवसुतांच्या काव्यातच दिसून आलीत. त्यांच्या समकालीन कवी व समीक्षकांना त्यांच्या काव्याचे वेगळेपण जाणवलेही. केशवसुतांसारखी म्हणजेच रोमँटिक काव्यवृत्ती असलेले प्रमुख मराठी कवी गोविंदाग्रज, बालकवी, बी व अनिल हे होत. तांबे, रविकिरण मंडळातील कवी, बोरकर व कुसुमाग्रज इ. प्रमुख मराठी कवींनी स्वभावाविष्कारासाठी लिहिलेल्या कवितांची संख्या त्यांच्या इतर सर्वसामान्य भावाविष्कारासाठी लिहिलेल्या गीतांच्या मानाने व समूहगीतांच्या मानाने इतकी कमी असण्याचे खरे कारण हेच आहे की त्यांची काव्यदृष्टी रोमँटिक नसून नव-अभिजातवादी आहे. **एकाच विषयावर, एकाच आशयाच्या, एकाच कालखंडातील अनेक कवींच्या, भिन्न चालींवरील कविता काय दर्शवितात ?** केशवसुतांच्या काव्यावरील तांबे व माधव ज्युलियन यांची टीका वाचली तरी ह्या गोष्टीचा पुरेसा बोध होतो की ह्या कविवर्यांना केशवसुतांची काव्यदृष्टी एक तर समजली तरी नसावी किंवा त्या रोमँटिक प्रवृत्तीचा मराठी काव्यातील प्रवाह थोपवून स्वतःस साध्य असलेल्या काव्यप्रकाराची चलती वाढविण्यासाठी त्यांनी प्रस्तुत प्रकारची टीका आरंभिली असावी. अर्थात् १८८५ ते १९२० ह्या कालखंडात रोमँटिक प्रवृत्तीचा काव्यप्रवाह वेगात धावत होता. परंतु १९२० ते १९४० ह्या कालखंडात त्याची पिछेहाट होऊन तांबे व रविकिरण मंडळाच्या काव्याचे व काव्यपद्धतीचे चलन वाढले होते. म्हणजेच रोमँटिसिझम ह्या काव्यप्रवाहास मागे टाकून नव-अभिजातवादी काव्यप्रवाह पुढे आला. १९४० ते १९४५ ह्या कालखंडात तांबे व रविकिरण मंडळ अनेक कारणांनी मागे पडले व अनिल यथार्थवादी आशय व क्रांतिकारी मुक्तछंदाने पुढे आले तर मर्ढेकरही वास्तवातीत वाद (surrealism) घेऊन पुढे आले. मर्ढेकरांनी इंग्रजी काव्यसृष्टीतील अनेक नवप्रवाहही मराठी काव्यात आणून सोडले. हे सर्व नवप्रवाहही रोमँटिसिझमचा भिन्न दिशांनी झालेला प्रवासच होय हे कळून आल्यामुळे पाश्चात्य देशात तरी ते Neo-Romanticism म्हणजे 'नूतन स्व-भावप्राधान्यवाद' म्हणूनच अलीकडे ओळखले जातात.

एकंदरीत अभिजातवाद व स्व-भावप्राधान्यवाद हेच मुख्य संप्रदाय असून प्रत्येक भाषेच्या वाङमयात एका कालखंडात अभिजातवादी संप्रदाय वाढतो तर

काही काळानंतर दोन्ही एकमेकात मिसळून पुढे रोमँटिसिझमचा प्रवाह जोमात येतो, असे सुरू असते. इंग्रजी काव्यात निओ-क्लासिसिझम→डिकेडन्स ऑफ क्लासिसिझम→ रोमँटिसिझम→डिकेडन्स ऑफ रोमँटिसिझम →निओ-रोमँटिसिझम हे दृश्य दिसते. परंतु मराठी काव्यक्षेत्रात डिकेडन्स ऑफ क्लॅसिसिझम→रोमँटिसिझम→निओ – क्लासिसिझम→निओ – रोमँटिसिझम असे दृश्य : ., ळते.

रोमँटिसिझमला पर्यायी मराठी संज्ञा

रोमँटिसिझम सर्व देशात एकाच वेळी आल्याचे आढळत नाही. तसेच रोमँटिसिझमची साहित्यिक वैशिष्टचे देशपरत्वे भिन्न भिन्न असल्याचे आढळते. रोमँटिसिझमला सर्वत्र एकच अर्थ प्राप्त झालेला नाही असेही आढळते. केशवसुतांनी व्यक्त केलेली काव्यदृष्टी 'रोमँटिसिझम' होय. युरोपात रोमँटिसिझमची जी वैशिष्टचे प्रकट झाली त्यावरून रोमँटिसिझमला स्वच्छंदवाद, सौंदर्यवाद अशी मराठीत संज्ञा योजण्यापेक्षा **मराठी काव्यदृष्टीत 'रोमँटिसिझम'च्या ज्या मूलभूत तत्वामुळे व मूल्यांमुळे क्रांती घडून आली त्या वैशिष्टचाचे निदर्शन करणारी संज्ञा योजणे अप्रयोजक ठरू नये**, ते वैशिष्टच म्हणजे कवीने स्व-भावनेचा केलेला आविष्कार. (ह्यावर अशी शंका निर्माण होणे शक्य आहे की मराठी संतकवींच्या काव्यात त्यांचा स्व–भावाविष्कार नव्हता काय ? ह्या प्रश्नाचे उत्तर असे देता येईल की संतकवींचा तो स्व–भावाविष्कार सर्वसामान्यांचाही होता व सर्वमान्य भक्तीचा प्रकार म्हणून अधिक महत्त्वाचा होता, काव्य म्हणून नव्हे.) रोमँटिसिझम सर्वांनी मान्य केलेले व केशवसुतांच्या मध्येही आढळणारे स्व–भावाविष्करण हे मूल्य लक्षात घेता **रोमँटिसिझमला आधुनिक मराठी काव्यात 'स्व-भाव प्राधान्यवाद' असे संबोधणे अयोग्य ठरू नये.** ("There are traits common to al! European romanticism. Universally it proposed absolute creative freedom, spontaneity, sincerity and a sort of emtional engagement on the part of the poet." - Encyclopaedia of Poetry & Poetics; Page 718.) काव्यनिर्मिती स्वातंत्र्य, उत्स्फूर्तता, सचोटी आणि आसक्ति ह्या घटकांनी सिद्ध होणारी काव्यप्रवृती हीच स्व–भावप्राधान्यकारी काव्यप्रवृत्ती होय. "To neo-classical dictates of objectivity, imitation, invention, clarity, separation of prose and poetry, the romanticists oppose demands for the free play of imagination and originality, functional rather than decorative imagery, the use of prose rhythms in poetry and of lyrical prose in novel, essay and criticism. They defend obscurity as a necessary by-product of myth, symbol and intuitions of what today would be called subconscious. (Encyclopaedia of Poetry & Poetics – Page 718.) अंत:स्फर्तीमुळे प्रतीकांच्या भाषेत प्रकटीकरण होऊन येणारी दुर्बोधता रोमँटिक कवींना अयोग्य वाटत नाही. कल्पितकथांचाही त्यांच्या काव्यात आढळ होतोच. केशवसुतांच्या काव्यातही ही वैशिष्टचे आढळतातच.

जर्मनीमध्ये रोमँटिसिझम ही सुरुवातीला चळवळीच्या स्वरूपात पुढे आलेली प्रणाली होती परंतु इंग्रजी रोमँटिक कवींना स्वत:च्या रोमँटिक प्रवृत्तीची जाणीवही नव्हती, त्यामुळे त्यांनी स्वत:ला 'रोमँटिक' हे बिरुद लावून घेतले नाही. केशवसुतांनी आपल्या कवितेला 'नवी कविता' म्हटले ही अनेकदृष्टचा महत्त्वाची बाब. केशवसुतच ही 'नवता' आणू शकले ह्याला कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व, ह्यात शंका नाही. मराठी काव्यातील 'आधुनिकता' ही क्रांती आहे, उत्क्रांती नव्हे. परंतु कालसापेक्षत: नव्या प्रतिमांची भाषा बोलणारी गेल्या ३०–३५ वर्षातील कविता कालानुसारी 'नव' असली तरी ती उत्क्रांती आहे आणि Neo – Romanticism संज्ञेने ह्या नव-प्रवृत्ती युरोपात ओळखल्या जातात. ("The 20th century is revising everything that reinforces our irrationalism" (Malarany) with its poetics ever widening the gap between neo-classical genses and free experimentation in aesthetics and with its poetry sounding the depth of the subconscious, is producing a literature which in its ontological quest, is now largely regarded by critics as extension of romanticism and labelled 'neo–romanticism' (Encyclopaedia of Poetry &

Poetics – Page 718) अशा प्रकारे मराठी काव्यातही **नव–अभिजातवादाच्या सद्दीनंतर नूतन स्व–भाव-प्राधान्यवाद (Neo–Romanticism) हल्ली जोमात आहे असे म्हणणे यथार्थ ठरावे अशी मराठी काव्याची आजची स्थिती आहे.**

आधुनिक मराठी कवी आणि स्व–भावप्राधान्यवाद (Romanticism)

केशवसुतांचे पाठोपाठ येणारी बालकवी व गोविंदाग्रज ही मंडळी मराठी वाचकास 'रोमँटिक काव्य' देऊन गेली. परंतु १९२० नंतर पुढे आलेल्या तांबे व रविकिरण मंडळाने 'गीत–संप्रदाय' रूढ केला व सर्वसामान्यांची भावना संगीताच्या आश्रयाने घरोघर पोचविली. रविकिरणमंडळासंबंधी प्रा. श्री. के. क्षीरसागर म्हणतात, "शेले, बायरन, वर्डस्वर्थ या पहिल्या स्फूर्तिवादी कवींपेक्षा, रविकिरणी कवींचे नाते त्यानंतरच्या कलावादी कवींशीच अधिक होते. ते स्वाभाविक अभिव्यक्तीपेक्षा (sincerity पेक्षा) कलेचे आणि संस्करणाचे भोक्ते होते." (युगवाणी, दिवाळी १९७३, पृ. ४२७) तांबेही कलावादीच होते व म्हणूनच त्यांना केशवसुतांची सामाजिक आशयाची त्वेषपूर्ण रोमँटिक कविता आवडली नव्हती. बोरकर, कुसुमाग्रज, पाडगावकर, बापट हेही सर्वसामान्य भावनांची गोंडस अभिव्यक्ती करण्यात पटाईत नाहीत काय? हे कवी तांब्यांसारखेच आहेत. **बालकवी, गोविंदाग्रजानंतर 'बी' व अनिल हेच केशवसुतांच्या काव्य-दृष्टीस खरे उतरणारे रोमँटिक कवी ठरतात.** विनायक, सावरकर व गोविंद यांनी काव्यप्रांतात प्रवेश केला तो आपल्या अंगच्या कलेचा राष्ट्रकार्यास उपयोग करून देण्यासाठीच असे वाटावे, अशीच त्यांची काव्यनिर्मिती दिसते. (काणेकर व अत्रे ह्यांच्या अनुक्रमे 'चांदरात' व 'गीतगंगा' ह्या काव्यसंग्रहावरून त्यांची कविता 'स्व–भावप्राधान्यवादी' दिसते; परंतु पुढे अत्र्यांनी विडंबनाचा मार्ग स्वीकारला व काणेकरांनी लघु-निबंधाचा. अनिलांनी 'फुलवात' नंतरही आत्मप्रत्ययी काव्यनिर्मितीच सुरू ठेवली.) **तांबे व रविकिरणमंडळाने अनुसरलेली कलावादी भूमिका अभिजातवादीच कशी ठरते ही गोष्ट** अब्राहम्‌सच्या विधानावरून स्पष्ट होते. Neo–classicists च्या काव्यनिष्ठेसंबंधी अब्राहम्स म्हणतो, Literature was conceived to be primarily an 'art', one which though it requires innate talent, must be perfected by long study and practice and which consists mainly in the deliberate adoptation of known and tested means to the achievement of forseen ends upon the audience of readers." (A Glossary of Lit. Terms, Page 109) साहित्य ही 'कला' सरावाने, दीर्घ अभ्यासाने पूर्णत्वास नेता येते आणि त्यासाठी ठाऊक असलेल्या व परीक्षेत खऱ्या ठरलेल्या अशा साधनांचा (ज्यांच्या द्वारे श्रोत्यांस व वाचकांस प्रभावित करता येते) उपयोग करावा हे नूतन-अभिजातवाद्यांचे ब्रीद. तांबे व रविकिरण मंडळाने, बोरकर, कुसुमाग्रज, पाडगावकर, माडगूळकरांनी हेच मराठी काव्यक्षेत्रात केले नाही काय? "The neo–classical ideal, is the craftsman's ideal, demanding the utmost finish, correction and attention to detail." (Eneylopaedia of Poetry and Poetics, Page 718) ही संस्करणाची वृत्तिही रविकिरणमंडळात प्रकर्षाने होतीच. तसेच अनुकरणाचीही. केवळ गीतांच्या बाबतीत उपलब्ध व परिचित गेय काव्यप्रकारांच्या उपयोगाच्या बाबतीतच नव्हे तर खंडकाव्यांच्या बाबतीतही त्यांनी परंपरा स्वीकारली व खंडकाव्ये कथाकाव्याच्या स्वरूपाचीच लिहिलीत. फक्त तत्कालीन सामाजिक जीवनातील कथा एवढाच काय तो बदल! नूतन-अभिजातवादाने घडवून आणलेल्या बदलासंबंधी, "Man and especially man as integral part of an organized society was regarded as the primary source of poetic subject matters. Poetry is an imitation of human life — 'a mirror held up to nature.' And by the human actions it imitated and the aesthetic form it gives to the imitation, poetry was designed to yield both instruction and aesthetic pleasure to the man who need it. Not art for art's sake, but art for man's sake was the ideal of neo-classic humanism." (Encylopaedia of Poetry and Poetics, Page 719) ह्या उद्धरणातून मांडलेली बाब रविकिरण-मंडळाच्या काव्यासंबंधीही खोटी नाही. "सामान्यांनी, सामान्यांसाठी लिहिलेली सामान्य कविता" असे रविकिरणमंडळाच्या काव्याबद्दल म्हटल्या गेलेच आहे. "Both in the subject matter and the appeal

of art; emphasis was placed on what men possess in common — representative characteristics, and widely shared experiences, thoughts and feelings and tastes ... a great primary aim of poetry is to give new and perfect expression to the great commonplaces of human wisdom, whose prevalence and durability are the besc warrant of their importance and truth." त्याचप्रमाणे " In art, as in life, there prevailed the law of measure and the acceptance of strict limits upon one's freedom. " (A. Glossary of Literary Terms, Page 105-106) ही दोन्ही तत्त्वे १९२० नंतरच्या तांब्यांच्या व रविकिरणमंडळाच्या काव्यास लागू पडतातच. तेव्हा ह्या कवींना Neo-classicist म्हणणेच रास्त होईल. हा प्रवाह अजूनही कार्यरत आहे. **तांबे व रविकिरणमंडळातील कवी, बोरकर, कुसुमाग्रज इ. कवी ' रोमँटिक ' वृत्तीचे कवी नाही असे म्हटल्याने त्यांचे कवी म्हणून महत्त्व कमी होत नाही.** इंग्रजी वाचकांस मिल्टन व शेले सारखेच आवडतात तसे मराठी वाचकांस तांबे व केशवसुत सारखेच आवडणे अशक्य नाही. **कवींच्या भिन्न प्रवृत्ती असणे ह्यात वावगे काहीच नाही.**

यथार्थवाद (Realism)

युरोपीय साहित्यक्षेत्रात Realism म्हणजे यथार्थवादाची सुरुवात रोमँटिसिझमचा विकास अशा स्वरूपाचीच झाली. " Poetic realism, as a movement must be regarded as an outgrowth of romenticism. In the preface to the second edition of the lyrical Ballads (1800), Wordsworth defends his choice of " incidents and situation of common life " while at the same time advocating, " a certain colouring whereby ordinary things should be presented to the mind in an unusual aspect. This selective romanticism, which presupposes a certain degree of idealization, is also championed by Crabbe, who (in the preface to his tales of 1812) envisages a poetry, that has " enough reality to engage sympathy, but possesses not interest sufficient to create painful sensations." (Encyclopaedia of Poetry & Poetics, Page 685.) मराठी काव्यात यथार्थवादाची उदाहरणे तशी कमीच आहेत. रे. टिळकांच्या काव्यातून थोडी तर अनिलांच्या मुक्तछंदातील कवितेतून त्यामानाने बरीच उदाहरणे आढळतात. युरोपीय काव्यातही यथार्थवादाची उदाहरणे कमीच आढळतात. ब्लेक, थॉमस हूड, ब्राऊनिंग ह्या इंग्रजी कवींच्या व व्हिटमन्, फ्रॉस्ट ह्या अमेरिकन कवींच्या काही कवितातच ' यथार्थवाद ' आढळतो. यथार्थवादास विशेष महत्त्व कादंबरीच्या क्षेत्रातच सर्वत्र मिळाले. कारण वर्णनात्मकतेचा प्रांत कादंबरीने व कथेनेच व्यापिला असल्यामुळे ही वर्णने ' यथार्थ ' असावीत असा सूर ह्या वादामागे होता. यथार्थवादी काव्याची " Realistic poetry, at its best, is likely to meet the following conditions; (i) It will describe normal situations and average characters in ordinary settings (often with emphasis on the lower strata of society); (ii) it will endeavor to reproduce actual speech and tend to approximate prose rhythms." (Encyclopaedia of Poetry & Poetics – Page 685) ही वैशिष्ट्ये ध्यानात घेता यथार्थवादी काव्य मराठीत फारच क्वचित् आढळते असे दिसून येते. **लक्ष्यात घेण्यासारखी बाब ती एवढीच की ' यथार्थवाद ' ही प्रवृत्ती ही रोमँटिसिझम्‌ची विकसित अवस्थाच होय, विरोधी प्रवृत्ती नव्हे आणि यथार्थवाद ही प्रवृत्ती खरे तर कृत्रिमतेच्या म्हणजे खऱ्या अर्थाने अभिजातवादी प्रवृत्तीच्या विरोधी आहे.**

इंग्रजी काव्यक्षेत्रात रोमँटिसिझमने फार मोठा कालखंड व्यापिला आहे. व्हिक्टोरियन काळातही टेनिसन व ब्राऊनिंगने रोमँटिक प्रवृत्तीची जोपासना केली व पुढे प्रिरॅफेलाइट ब्रदरहुडनेही हीच प्रवृत्ती सौंदर्यवादाच्या (aestheticism) स्वरूपात उचलून धरली. परंतु मधून मधून ' यथार्थवाद 'ही इंग्रजी काव्यात आढळतो. व्हिक्टोरियन काव्यात रोमँटिकांची निसर्गभावना, आदर्शवाद, आत्मनिष्ठा व वैचित्र्य ह्या वैशिष्ट्यांचा आढळ होतो. तरी महत्त्वाचा फरकही आहेच. व्हिक्टोरियन काव्य व रोमँटिक काव्य ह्यातील फरक दर्शविणारे पुढील विधान महत्त्वाचे आहे. " The romantics were able, in Colerdige's words ' to bring the whole soul, a man, into activity ', as the Victorians could not; among them the romantic synthesis of heart and head broke down. The new findings of science deprived the victorians of the romantic creed of nature; Tennyson, Browing,

Arnold, Hardy, Hausman and the others possess the romantic sensibility without the romantic help .... Despite much fine poetry, the result is a derivative and decorative romanticism which brought down upon itself the anti-romanticism of the 20th Century." (Encyclopaedia of Poetry & Poetics – Page 234)

इंग्रजी काव्यात रोमँटिसिझमचा अपकर्षही आढळतो तर मराठी काव्यात रोमँटिसिझमची पिछेहाट होण्यास नूतन–अभिजातवादाची अधिक निर्मिती व भरभराट कारण ठरल्याचे आढळते. युरोपमधील नव–प्रवृत्तींचे मराठी कवींनी आरंभिलेले अनुकरण ही खऱ्या अर्थाने नव–अभिजातवादी ठोकळेबाज काव्याविरुद्धची प्रतिक्रियाच होय, रोमँटिसिझम विरुद्धची प्रतिक्रिया नव्हे.

नव-प्रवृत्ती (New trends)

पहिल्या महायुद्धापासून सुरू होणाऱ्या इंग्रजी काव्याच्या क्षेत्रात अभिव्यक्तिवाद (Expressionism) प्रतिमावाद (Imagism), प्रतीकवाद (Symbolism), वास्तवातीत वाद (Surrealism) व अस्तित्ववाद (Existentialism) इ. वाङमयीन घडामोडी झाल्या व त्यांचा प्रवेश मराठी काव्यात मर्ढेकरांकरवी झाला. ह्यापैकी पहिल्या तीन चळवळी अभिव्यक्तीशी व नंतरच्या दोन चळवळी आशयाच्या भिन्नतेशी संबंधित आहेत.

अभिव्यक्तिवाद (Expressionism) ह्या चळवळीची सुरुवात जर्मनीमध्ये, स्वीडीश नाटककार स्ट्रींडबर्गच्या प्रभावाने २० व्या शतकाच्या आरंभी सुरु झाली आणि १९१५ ते १९२५ ह्या कालखंडात तिला फारच तीव्र स्वरूप प्राप्त झाले. अभिव्यक्तिवादाची चळवळ चित्रकला, संगीत, साहित्य व रंगभूमी ह्या क्षेत्रात झाली. अभिव्यक्तिवादाचे मुख्य वैशिष्टच म्हणजे यथार्थवाद (Realism) विरुद्धचे मूलगामी बंड. " In stead of representing the world as it objectively is, the author undertakes to express inner experience by representing the world as it appears to his state of mind, or to that of one of his characters – an emotional, troubled or abnormal state of of mind. Often the work implies that this mental condition is representative of anxiety ridden modern man in an individual and technological society which is drifting towards chaos" (A Glossary of Lit. Terms– Page 57)

प्रतिमावाद (Imagism) ही चळवळ इंग्लंड व अमेरिकेत १९१२ ते १९१७ ह्या कालखंडात फार तीव्र स्वरूपात आढळली. ह्यूमच्या प्रभावामुळे इंग्रज व अमेरिकन कवींनी एझ्रा पौंडच्या नेतृत्वाखाली केलेल्या ह्या चळवळी संबंधी एमी लॉवेल म्हणते, " A poetry which absconding conventional poetic materials and versification is free to choose any subject and to create its own rhythm, is expressed in common speech, and presents an image that is hard, clear and concentrated" (A Glossary of Lit. Terms– Page 77-78)प्रतिमावाद ही चळवळ पुढे प्रतीकवादास (Symbolism ला) पुढे आणण्यास आधारभूत ठरली.

प्रतीकवाद (Symbolism) ही चळवळ फ्रान्समध्ये १८५७ साली बॉदलेरच्या ' Fleuss du Mal ' ने सुरू झाली. ह्या चळवळीचा प्रभाव १८९० नंतर संपूर्ण युरोपभर आढळून आला. यिटस्, पौंड, इलिएट, थॉमस इ. कवींच्या काव्यावर प्रतीकवादाचा प्रभाव आढळतो. प्रथम महायुद्धानंतरच्या इंग्रजी व युरोपियन साहित्यावर ह्या काळास ' प्रतीकवादाचे युग ' म्हणावे इतका जबरदस्त प्रभाव आढळतो.

अभिव्यक्तीसंबंधीच्या ह्या तिन्ही चळवळींमुळे प्रथम महायुद्धानंतरच्या युरोपीय कवितेत प्रतिमा व प्रतीके ह्यांचा सुकाळ झाला व काव्य दुर्बोध वाटू लागले. समाज ज्या भाषेत प्रकटीकरण करतो, कवी ती भाषा टाळू लागला. इतरापेक्षा आपली भावना वेगळीच असल्यामुळे ती वेगळयाच भाषेत प्रकट होणे आवश्यक आहे असे त्यास वाटू लागले. ' निषेधात्मक ' साहित्याची ही भाषा प्रतिके व प्रतिमा ह्यांचा आश्रय घेते. प्रतिमाही दूरान्वयाने योजिल्या असल्यामुळे अनाकलनीय होऊन बसतात. (मर्ढेकरी कवितेबद्दलचा असाच अनुभव अनेकांचा आहे.)

पहिल्या महायुद्धानंतरच्या युरोपीय काव्यात पुढे आलेल्या वास्तवातीत वाद (Surrealism) व अस्तित्ववाद (Existentialism) ह्या दोन प्रवृत्तींचा

पुष्कळ कवींवर प्रभाव पडला. १९१४ ते १९१८ मधील महायुद्धाचा प्रत्यक्ष अनुभव रीड, ससून, ओवेन इ. कवींना होता व तो त्यांनी व्यक्त केला. अर्थात् त्यात उद्वेग आणि निराशा आहे. परंतु इलिएटला युद्धानुभवाची झळ पोचली नसतांनाही त्याचे काव्य सार्वत्रिक निराशा-वादाने भरलेले असावे ह्याचे कारण काय असावे? व्हिक्टोरियन काव्यातील क्षीणतेविरुद्धची प्रतिक्रिया की २० व्या शतकातील अप्रिय वास्तवतेची जाणीव? अबोध मनाचा कौल घेणे व त्याखेरीज कोणत्याही अवस्थेवर विश्वास न ठेवणे ही वास्तवातीतवादी निष्ठा निराशावादीही आहेच.

'वास्तवातीत वाद' (Surrealism) हा शब्द वाङमयात प्रथम गिलॉम अॅपोलिनेर या फ्रेंच लेखकाने वापरला. परंतु वास्तवातीत वादाच्या चळ-वळीचा जनक फ्रेंच लेखक अँद्रे ब्रेतॉं यास मानले जाते. अँद्रे ब्रेतॉंने वास्तवातीत वादाचे वर्णन 'शुद्ध मानसिक स्वयंचालन' असे केले आहे. त्याला अंतर्मनाची जी नोंद अभिप्रेत होती, तिच्यावर नीति, विवेक किंवा कलात्मकता यांपैकी कशाचेही बंधन अपेक्षित नसल्या-मुळे संज्ञाप्रवाहाचे आविष्करण हेच काव्यमूल्य ठरले. प्रेम आणि सामाजिक आशयातही निराशावाद व्यक्त करणारी ही कविता रुक्ष आणि औपरोधिक झाली. वास्तवातीतवादाच्या चळवळीला सहेतूक वळण १९२४ मध्ये देण्यात आले. तशातच फ्रेंच प्रतीकवादाचा (Symbolism चा) पगडा मनावर बसलेल्या एझ्रा पौंड व इलियटसारख्या कवींनी प्रत्यक्ष पुरस्कार केल्या-मुळे युरोपभर अशी कविता लिहिणाऱ्यांचे प्राबल्य वाढले. मानसशास्त्राचा विकास व नवीन तत्वज्ञानाने प्रभावित होऊन बुद्धिमान आणि गंभीर प्रकृतीच्या कवींनी युरोपात वास्तवातीतवादी व पुढे अस्तित्ववादी काव्यप्रवाहास वाट मिळवून दिली.

युरोपीय वाङमयातील ह्या नव–प्रवृतींविषयी अब्राहम्स म्हणतो, "In the last thirty years or so, however there has been a widespread tendency, especially prominent in the existentialist philosophy of men of letters such as Jean–Paul Sartre and Albert Camus, to view each man as an isolated being who is cast ignominiously into an alien universe, to conceive the universe as possessing an inherent human truth, value or meaning, and to represent man's life, as it moves from the nothingness whence it come towards nothingness where it must end, as an existence which is both anguished and absurd.. There are also affinities with the movement in the numerous recent works which exploit black humour." (A Glossary of Liter. Terms – Page 86–87)

व्यक्तीचे स्वयंनिर्णयाचे स्वातंत्र्य आणि प्रचलित बंधनप्रवण व्यवस्थेचा निषेध ह्या मूल उद्देशातून अस्ति-त्ववादाचा जन्म झाला आहे. माणसाच्या संकल्पना स्वातंत्र्याची जपणूक करून त्याप्रमाणे कृति करण्याचे कार्य अस्तित्ववाद साधू पाहतो. जीवनाच्या दुःखद भया-कुलतेपासून दूर जाण्यासाठी काल्पनिक सुखात रमण्या-पेक्षा त्या भयाकुलतेच्या अंधारात थेट उडी घेणे हे अस्तित्ववादाचे ब्रीद आहे. अस्तित्ववादाने मानवी देहाला आणि मरणाला वेगळा संदर्भ मिळवून दिला आहे. देहमाध्यमातून प्रकट होणाऱ्या विविध स्पंदनांना शब्दरूप देणे व मृत्यूसंवेदनेला मूर्त स्वरूप देऊ पाहणे हा अस्तित्ववाद्यांचा धाडसी प्रयत्न असतो.

अस्तित्ववादी आशय मराठी वाङमयात प्रथम काव्यातूनच झाला. १९४५ पासूनच्या मराठी साहित्या-तही यांत्रिक संस्कृतीचे, शहरी बकालपणाचे, युद्धजन्य विध्वंसाचे ताण आढळू लागले. अनिलांच्या काव्यातून वास्तववादी आशय साकार होऊन आशावादी सूर उमटत होते, तर मर्ढेकर निराशाप्रवण झाले. मर्ढेकरांचे साहित्य 'अस्तित्ववादी' आहे असे निखालस म्हणता येत नाही कारण त्याला कसल्या ना कसल्या तरी मूल्याचा आधार आहे. अस्तित्ववादाचे संदर्भहीन, मूल्यनिरपेक्ष रूप मर्ढेकरांनंतर आलेल्या दिलीप चित्रे, सदानंद रेगे, अरुण कोलाटकर इ० कवींच्या काव्यात तीव्रतेने जाणवते. त्याचबरोबर ध्येयनिष्ठ आशावादी जाणीव मुक्तिबोध व्यक्त करतांना दिसतात. परंतु तेही प्रतिभाप्राबल्याच्या झोतातून सुटले नाहीत. निदान आविष्काराच्या बाबतीत तरी त्यांनी युगधर्मच स्वीकारला.

अस्तित्ववादाला चलन मिळण्यास कारणीभूत झालेली यांत्रिकता व जीवनाची उद्ध्वंसता आपल्याकडे म्हणावी तशी आणि तितक्या प्रमाणात जाणवणारी

अनुक्रमणिका

नसतांनाही तशा प्रकारची कविता लिहिण्याची प्रवृत्ती वाढत असण्याचे कारण कवींच्या प्रकृतीतच शोधता येईल. युद्धाचा अनुभव नसलेला इलिएट नैराश्यपूर्ण काव्यप्रवाहाला पुढे आणू शकला. वास्तवातीतवादी काव्याविषयी प्रा. क्षीरसागर म्हणतात, "प्राय: काव्य-विरोधी भूमिका घेणारा हा काव्यसंप्रदाय अखेर इंग्लंड-मध्ये व आपल्याकडेही दीर्घकाल बद्धमूल कसा झाला ? वार्ड यांच्या शब्दातच उत्तर देणे बरे. वॉर्ड म्हणतात, 'Neverthless, T. S. Eliot controlled the main current of poetry and criticism for a whole generaton largely through the hypnotic attraction, his writings exercised, in academic channels and through acquiscent teachers upon a multitude of students, including most of the apprentice poets'. 'शिशिरागम' लिहिणारा सौंदर्यवादी कवी इंग्लंडमध्ये जाऊन आल्यावर इलियट संप्रदायी कविता कसा लिहू लागला आणि महाराष्ट्रात त्या कवितांवर सर्वत्र प्रतिकूल टीका होत असूनही, काव्य आणि काव्यमीमांसा या दोन्ही क्षेत्रात मर्ढेकर संप्रदाय कसा मूळ धरू शकला याचे उत्तर वरील उताऱ्यातच सापडेलसे वाटते." (टीकाविवेक)

अलीकडे जोरात असलेल्या अस्तित्ववादी काव्य-लाटेचे मूळही ह्यापेक्षा वेगळचा कुठल्या घटनेत नाही. कारण अलीकडे 'नवकाव्य' लिहिणाऱ्यात महाविद्या-लयीन काळात 'प्रसिद्ध' होण्यासाठी धडपडणाऱ्या युवकांनीच हा प्रांत कात्रीज केल्यासारखा दिसतो व त्याला उत्तेजन देणारे गुरुवर्य लाभले तर शिष्य 'महाकवी'च होऊन बसतो.

नव–प्रवृत्ति आणि 'नूतन स्व-भावप्राधान्यवाद'
(Neo–Romanticism)

मुक्तिबोधांची कविता प्रतिभाप्रवान असली तरी रोमँटिकच आहे, ध्येयनिष्ठ आहे. रोमँटिसिझममध्ये जसे व्यक्तिनिष्ठेला प्राधान्य आहे तसे अस्तित्ववादातही आहे. फरक इतकाच की अस्तित्ववादातही व्यक्तिनिष्ठा निरंकुश किंवा आत्मनिर्भर असते. एकंदरीत ह्या नव-प्रवृतीही कवीच्या स्वभावास प्राधान्य देणाऱ्याच व कृत्रिमतेविरुद्ध, ठोकळेबाजपणाविरुद्ध प्रतिक्रियात्मक स्वरूपाच्याच आहेत. तेव्हा Neo–Romanticism ह्या संयुक्त प्रवाहातील ते भिन्न प्रवाह आहेत असे म्हणणे वावगे होणार नाही.

परंपरा आणि प्रवाह

आधुनिक मराठी काव्यात स्व–भावप्राधान्यवादी, नूतन–अभिजातवादी, व नव–स्वभावप्राधान्यवादी असे भिन्न प्रवाह आहेत, परंपरा नाहीत. कारण परंपरा ही अनेक वर्षे अव्याहत सुरू राहणारी व नवीन प्रयोगांनी पुढे पुढे विकसित झालेली असते. आधुनिक मराठी काव्यास सुरुवात होऊन एक शतकही लोटले नसतांना आधुनिक मराठी काव्यात 'परंपरा' आहेत असे म्हणणे रास्त ठरणार नाही.

प्रस्तुत आकलनात सहाय्यभूत झालेले ग्रंथ

१. साहित्यातील संप्रदाय – डॉ. रा. शं. वाळिंबे.
२. टीकाविवेक – प्रा. श्री. के. क्षीरसागर.
३. पहिली परंपरा – डॉ. द. भि. कुळकर्णी.
४. दुसरी परंपरा – डॉ. द. भि. कुळकर्णी.
५. नवी मळवाट – शरच्चंद्र मुक्तिबोध.
६. मर्ढेकरांची कविता – बाळ सीताराम मर्ढेकर.
७. पासंग – कुसुमावती देशपांडे.
८. स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक पुनरुत्थान (भाषण) – श्री. आ. रा. देशपांडे.
९. युगवाणी, दिवाळी १९७३ लेख–'रविकिरण मंडळ काय होते आणि काय नव्हते': प्रा. श्री. के. क्षीरसागर.
१०. युगवाणी, दिवाळी १९७२ लेख – 'अस्तित्ववाद आणि ललित साहित्य' : प्रा. गो. म. कुळकर्णी.
११. A History of English Literature – Compton–Rickett (Macmillan, 1976).
१२. A Glossary of Literary Terms – M. H. Abrahms (OUP, 1971).
१३. Encyclopaedia of Poetry & Poetics – Newyork Press, 1970.
१४. परंपरा आणि नवता : गो. वि. करंदीकर.

महेश्वर पंडितांचे ऋद्धिपूर माहात्म्य

ज. शा. देशपांडे

महानुभावीय काव्यात महानुभावीय पवित्र स्थान ऋद्धिपूर याचा महिमा अनेक काव्यातून वर्णन केलेला आढळतो. आतापर्यंतच्या अशा उपलब्ध काव्यात पंडित नारायण व्यास यांनी लिहिलेले ऋद्धिपूर वर्णन हे काव्य सर्वात जुने होते. तसेच कवी कृष्णमुनि डिंभ याचे सतराव्या शतकातले ऋद्धिपूर माहात्म्य हे काव्यही प्रसिद्धी पावलेल्या काव्यांपैकी एक होय. श्रीचक्रधरांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांचे चिरंजीव महेश्वर पंडित यांचे ऋद्धिपूर माहात्म्याचा उल्लेख व त्यातले उतारे उपलब्ध होते पण ग्रंथाची हस्तलिखित प्रत अनेक वर्षे प्रयत्न करून सापडत नव्हती. दहा एक वर्षापूर्वी महानुभावीय लेखक व प्रकाशक श्री. कृष्णदास यांना एक प्रत सापडली व आम्ही ती प्रकाशित करण्याचे ठरवले. परंतु केवळ एका प्रतीवरून ग्रंथ छापणे बरोबर होणार नाही, म्हणून मुद्रणप्रत तयार करून आम्ही तशीच ठेवली. त्या काव्याचा या लेखात परिचय करून देतो.

हे काव्य प्रस्तुत प्रतीत दहा प्रसंगांचे असून ८२७ ओव्या आहेत. या काव्याचा काळ शके १२२४ असा डॉ. य. खु. देशपांडे देतात. त्याला आधार काय ते ठाऊक नाही. तथापि तो काळ अगदी चुकीचा असणार नाही हे उघड आहे.

काव्याचा आरंभ श्रीचक्रधर नमनाने होतो :—

जो हेमवर्णासारिखा : नमन करूं इति मुनीवेखा
जो न वर्णवे सेखादिकां : सहस्रमुखीं ।।१।।

वेद जयाचे नागारी : वर्णितां गुणलावण्याची थोरी
श्रमले तयाची परी : नेणती म्हणौनी ।।२।।

श्रुतीवरी रचिली पुराणें ते वोलों नेणति अज्ञानें
भांवावली पट्दर्शनें जयासि पाहाता ।।३।।

अज्ञानाचेनि प्रसादें : आगम दुरी राहिले विसंवादें
ननुवादतीचि उपनिपदें : भुली कीं जाली ।।४।।

ऐसा षट्प्रमाणी अगोचरु : श्रुतीं नव्हेचि निर्धारु
तो नमस्करिला श्रीचक्रधरु मुनी महेशें ।।५।।

कवी नागदेवाचार्यांना नमन करतो :—

प्रभुचेनि नाम प्रसादिकें : देवा आळविती कवतिकें
तया नागार्जुनासि मीं अमृतसुखें : नमस्करीन ।।६।।

नंतर संत महंताचे स्तवन व नमन करून कवी 'महानुभाव श्रोतेयातें' नमन करून माझा अव्हेर करू नका अशी त्यांना विनवणी करतो. मग श्रीगुरूंना बंदन होऊन

यावरी श्रीगुरूचे चरण वंदिले : वंदुनि मस्तकीं धरिलें
कर जोडुनि बोलों आदरिलें : महेश्वर पंडितें ।।५६।।

कवी ऋद्धिपूर महात्म्यास सुरवात करतो—

आता बोलैन ऋद्धिपूर माहात्म्या
जेथ विहरण आत्मया रामा
जयाची सहस्रमुखीं महिमा
शेष वर्णितां श्रमला ।।८७।।

ऋद्धिपूर म्हणजे काशीच होय. काव्यात कवी श्रोता व वक्ता यांचा संवाद सांगणार आहे:—

श्रोतया वक्रयांचेनि संवादें : हा प्रवंधु चालैल आनंदें
संत कृपाप्रसादें म्हणे महेश्वर पंडितु ।। ७९ ।।

पयोष्णी तीरावर सिंहरायाच्या नगरीमधें दशमस्कंधाची कथा सांगितली जात आहे. सगळे जण तटस्थ होतात. नागार्जुन येतात. तुला देवाचा संकेत जाणवला काय असे ते कथाकार ब्राम्हणाला विचारतात. श्रोता ब्राम्हण महंतांचे मोठेपण ओळखतो व कथाप्रसंग पुरा करून महंताजवळ वसतो व ज्ञान सांगण्याची विनंती करतो. (११९)

महंत प्रथम ऋचिकाची कथा सांगतात.. ऋचिक मुनीने घोर तप केले. तेव्हा आकाशवाणी झाली व आकाशवाणीने मुनीला लग्न करण्यास सांगितले. तेवढ्यात नारद आले व गाधीराजाच्या कन्येला मागणी घालावी असे त्यांनी सुचवले. ऋचिक गाधीराजाकडे गेला. त्या म्हाताऱ्याला पाहून राजाला व त्याच्या पत्नीला प्रश्न पडला. त्याला टाळावा म्हणून कन्येच्या पाणिग्रहणार्थ

पाचशे शामकर्ण वारू आणावे लागतील असे राजाच्या पत्नीने सांगितले. मुनीने इंद्राकडे जाऊन वारू मागितले. 'माझेकडे वारू नाहीत पण हवा तर ऐरावत ने' असे इंद्र म्हणाला. तेव्हा मुनी ब्रम्हादिकांकडे गेला. त्यांनी अनुसयेला भेटण्यास सांगितले. अनुसयेचे कृपेने वारू मिळाले व मुनीचे लग्न झाले. लग्नानंतर यज्ञ झाला. यज्ञपुरुषाने प्रसाद दिला. मुनीने त्याचे दोन भाग केले, व एकात ब्रम्ह आव्हान केले व दुसऱ्यात क्षत्र आव्हान केले. पण चुकून गाधीपत्नीने ब्रह्मआव्हानित भाग घेतला व तिची कन्या म्हणजे मुनीपत्नीने क्षत्र आव्हानित भाग घेतला. त्यामुळे गाधीपत्नीला राजर्षी झाला व ऋचिक पत्नीला जमदग्नी झाला. जमदग्नीपासून परशुराम झाला. मातेच्या आज्ञेने परशुराम कावडी घेऊन निघाला. सैह्याचळावर त्याची श्रीदत्ताशी भेट झाली. परशुरामाने श्रीदत्ताना आपल्या पूर्वजांचे दर्भपुर ऋद्धिपुर अंगीकारावे अशी विनंती केली असा या क्षेत्राचा महिमा आहे. तेथे देवाचे अवतरण होणार या आशेने नृसिंह देवताही तेथे येऊन राहिली. ऋद्धिपुरात श्री गोविंदप्रभु अवतरले.

वंदर्भकुली मातुलग्रामु : तेथ अवतरला आत्मारामु
फेडावया भवश्रमु : जीवजातांचा ।। २५० ।।

श्री गोविंद प्रभूंनी अनेक लीळा केल्या. हे सर्व निरूपण ऐकून श्रोता विस्मय पावला व विचार करू लागला

मग थोरा विस्मयाते पावला
विवेकसमुद्रीं बुडुनि गेला
मग तीरें तीरें लागला अनुभवाचेनि ।। २९४ ।।

मग कृष्णाने जशी पार्थाला प्रचीती आणून दिली तशी आपणांस महंताकडून मिळेल म्हणून श्रोत्या ब्राम्हणाने महंतास व परावाणी निरूपणाशिवाय ज्ञान नाही व तिनेच आज मला ज्ञानाचा मार्ग कळला असे सांगितले. त्यावर महंताने दशमस्कंध निरूपणास सुरुवात केली, व श्रीकृष्णानी द्वापारात अवतार कसा घेतला त्याचे विवरण केले. श्रोत्याने हात जोडून परावाणी निरूपणाची विनंती केली. महंताने नाना उदाहरणे सांगून मोक्षदाता परमेश्वर येथे अवतरता होत जातो व तो सगळ्या घोरांधरापासून सोडवतो असे प्रतिपादिले. श्रोत्याने नमन करून विचारले "कलियुगात परब्रम्ह मूर्त रूप घेऊन आले हे काय ?" महंताने श्री दत्तावतार वर्णिला. श्रोत्याने अनेक शंका विचारल्या. तेव्हा विचारवंत महंतराजानी पंथाच्या ज्ञानमार्गाचे आणखी विवरण केले. श्रोता म्हणाला, "स्वामी ! देवाने कर्मभूमीत अवतार घेतला हे आगमनिगमादिकाना कळले का ? " मुनीश्वर बोलले, "आगमानिगमादिकांना तो सापडला नाही. आता फक्त परावाणी अंतःकरणी धर, व दुसरे काही मनात आणू नको."

ब्राह्मण प्रश्न करतो, "देवाने यतिमुनीचा वेष धरून पूर्वी कोणाला ज्ञान दिले ?" श्रीदत्तात्रयानी शंकराचार्याना भेट देऊन ज्ञान दिल्याचे मुनीनी सांगितले. श्रोता म्हणतो–

"जो परब्रम्हाचा पुतळा : ज्ञानमार्गासि जीवाळा
तोचि घनश्यामु सावळा : दाखवा मज ।।५६६ ।।
तरीचि प्रचीतीचिये खुणें : सत्य वाटैल बोलणे
परी शब्दब्रम्ह श्रवणे : घेववेना" ।। ५६७ ।।

यावर तो ब्रह्मज्ञानी महंत हांसून बोलला "भक्ति, ज्ञान वैराग्य यांनी जन्ममरणाच्या येरझारा सुटून शेवटी तूं ईश्वरत्व पावसील." मग महंतांनी कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णानी पार्थाला विश्वरूप दाखवून ज्ञान दिले त्याबद्दल कथन केले. मग ब्राह्मणाने तो श्रीकृष्णच दाखवा अशी विनंती केली. मग महंत आणि ब्राह्मण उठले व महंतानी पूर्व दिशेला अवलोकन केले. तो चमत्कार झाला, व ऋद्धिपुरीतच द्वारका दिसू लागली. ब्राह्मणाला आपण पाहातो का निद्रेत आहोत ते कळेना. ब्राह्मणाने गुरूला वंदन केले व आपणामुळेच ही प्रचीती मला आली असे उद्गार काढले.

गुरु म्हणतात "आता तू प्रत्यक्ष परब्रह्ममूर्तीच पाहशील." मग ब्राह्मणाला प्रत्यक्ष श्रीकृष्णांचेच दर्शन होऊन तो आनंदसागरात बुडाला व स्तुती करू लागला. नंतर त्याने श्री गुरूंची स्तुती केली. गुरु म्हणाले– "पूर्वजन्मामुळेच तुला हे पाहण्यास मिळाले. नाहीतर–
सांजवेळेचे तमवेळे : पाहाति घडसे आणि आंधळे
दीपें दिसे वस्तू जया डोळे : येरा अंधकारुचि" ।।८०७।।

तू माझा शिष्यराज आहेस व तूं आदिवस्तूला सहज पावशील.

कवी सांगतो :–
जी तुमचेनि पसायदाने : ऋद्धिपूर माहात्म्य अनुसंधानें
वोवुनि पुराण प्रबंधरत्नें : पदीं प्रमेयाचा ।।८२१
जी ते परावाणीचेनि बोले : मुनि नागदेवीं अनुवादिलें
तुम्हां रुचैल तरि भलें : स्वीकरिजे ।। ८२२।।

शेवटी–

परि हे देवाचे स्तवन : सलगी केले अनुवादन
ते उपशांति करावे तुम्ही संतजन : म्हणे मुनी ।।८२७।।

असे हे ऋद्धिपूरमाहात्म्य काव्य आतापर्यंत अज्ञात राहिले होते. त्याची साधारण कल्पना वरील उताऱ्यावरून येईलच. हे काव्य प्रथम श्रेणीच्या काव्यात बसणे कठीण आहे व त्यामुळे ते मागे पडले असणार. काव्यात अनेक ठिकाणी अध्याहृत शब्द धरावे लागतात व ओव्यांची रचना उलटसुलट होऊन अर्थ कळणे कठीण जाते. काव्याची भाषा प्राचीन आहे. कवीचा योगमार्गाशी परिचय दिसतो. काव्यात पंथीय तत्त्वज्ञान पुष्कळ येते. काव्याचा एक विशेष म्हणजे त्यात ज्ञानदेवांचा स्पष्ट उल्लेख आहे व ज्ञानेश्वरीच्या ओव्यांची या ग्रंथावर झाक आहे. प्राचीन मराठी कविता ६ (नृसिंहाचे रुक्मिणीस्वयंवर इ. स. १४०३) यात नृसिंहाला ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी ज्ञात होते हे दाखवले आहे. तसेच महेश्वर पंडितांनाही ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी ज्ञात होती असे म्हणावे लागते. महेश्वर पंडितानी ऋद्धिपूर माहात्म्य शके १२२४ मधे लिहिले हे बरोबर मानले तर शके १२१२ मधील ज्ञानेश्वरी तेव्हा चांगली प्रसिद्धी पावली होती काय असा प्रश्न उद्भवतो.

एकंदरीत विचार करता अनेक दृष्टींनी हे काव्य महत्त्वाचे वाटते. दुसरी हस्तलिखित प्रत मिळाली तर बरे, एकाच प्रतीवरून काव्य प्रकाशन योग्य होणार नाही, म्हणून आम्ही बरेच वर्षे वाट पाहिली व प्रकाशनास सुरुवात करणार इतक्यात आणखी दोन प्रती उपलब्ध झाल्याचे कळले. आता या प्रती उपयोगार्थ मिळतील काय हा प्रश्न आहे. आता साहित्य काय कुठल्याच प्रांतात रूढ संकेताना फाटा मिळाला आहे. तथापि एकतरी प्रत मिळेल अशा आशेने आम्ही प्रकाशन स्थगित करून बसलो आहोत. जर कुणाकडे या काव्याच्या अथवा महेश्वर पंडितांच्या **निर्वेदस्तोत्र** व **संकटस्तोत्र** यांच्या प्रती उपलब्ध असतील तर त्यांनी लेखकाला कळवण्याची कृपा करावी.

पत्ता – रुक्मिणीनिवास १, ली गल्ली
हिंदु कॉलनी, दादर, मुंबई १४

दोन कविता

नीलकृष्ण देशपांडे

काडी काडी जमवावी तशी साठविलेली माया डोळ्यात
छाया मिळेल म्हणून बांधले घरटे एक प्रीतीचे
पण तुझ्या नजरेचा अंगार जाळतो माझ्या भावना
पापण्याचे पंख पाखरू फडफडणारे शोधते सहारा
कुणी कुणाचे घरटे जाळू नये उगीचच.

०

हरवले हिरवेपण सुरू झाली पानगळ
भरलेली सारी माझी रिती झाली ओंजळ
फुलून आल्या वेदना कोमजले कोंब
अतृप्तीतच आटला शेवटला थेंब.

ज्युडास

श्रीकांत गोडबोले

अन्यायाचे बळी
सत्यस्पर्शाने पुनर्जन्मतात
असा भेकड शब्द–वाद
पदच्युत व्हायला हवाय
अन् क्रूसभर लाकडाच्या
वज्रकठोर तलवारी
कारण शेवटी
स्वप्ने बर्फाचीच असतात
आणि घरा घरातून
ज्युडास जन्म घेतात.

पाहिजे

* *

दिलीप म्हैसाळकर

[करटन उघडल्यावर—

रंगमंच अस्पष्ट उजळलाय. दूरवरून 'वॉन्टेड' आशयाचे अनेक कल्लोळ येऊन आदळता आदळता चार कोपऱ्यातून चार पात्रे तोंडाने काहीतरी पाहिजे असं पोटतिडीकीने सांगत मनाला वाटेल तसे चालताहेत. त्यांच्या मागण्यातील — आवाजातील वैचित्र्य—वैविध्य जाणवावं. अत्यंत विस्कळितपणे हिंडणाऱ्या या व्यक्तीं-मधे सुसूत्रता येते आणि टाळ्यांच्या ऱ्हिदमवर त्या एका रिंगणात व्यवस्थित फिरू लागतात. एकेक व्यक्तीच्या प्रश्नाला सामूहिक उत्तर मिळत जाते.]

पुरुष तू कोण ?

मुलगा : मी ? मी होय ? बबन !

सर्व अस्संअस्संअस्संअस्सं !

मुलगी आणि तुम्ही ?

स्त्री : मी बाई वेणाऱ्यांची मुलगी. आणि ह्यांची... (लाजते.)

सर्व : ओ ऽऽऽऽऽऽऽऽऽ

मुलगा ऐ ! तू गं कोण ?

मुलगी : हियर इज शाशा. इजन्टीट ? गॉटीट ?

सर्व : हो — कां ऽऽऽ.. ?

स्त्री : आमची नावं विचारून मोकळे होणारे आपण हो कोण ?

पुरुष (नुसताच खोकतो)

सर्व : हं ऽऽऽऽऽ ! म्हातारे दिसतात. वृद्ध वाटतात. नाना तात्या आबा काका यापैकी कुणीतरी असावेत एक.

(सर्वान्मुखे 'एक' हा आकडा चढत जातो. इतक्यात ह्या व्यक्ती गोठून जातात. मग एकेक जण आपापल्या पोटातलं ओकून टाकतात.)

मुलगा एक गोष्ट ध्यानात ठेव. वडीलं धाऱ्यांचं हे ऐकायलाच पाहिजेलय. एक समजत नाही सालं, हे आईबाप आम्हाला समजतात तरी कोण ?

मुलगी : दोनदां पाह्यलाय 'सबसे बडा रुपय्या !' दोन अपत्यं बस, केव्हाच सांगताहेत, पण ऐकतंय कोण ?

स्त्री : तिन्तीन्दा नापास झालास घोड्या, कशाला आलास जन्माला ? तिन्तीन्दा आईचे वाभाडे कशाला काढायचे गं, एकदा पुरे !

पुरुष : चार पैसे मिळवायला शिका, मग घाला नागडा नाच ! चार वाजता घरी पोचायचंय, श्राद्ध आहे बापाचं !

(त्यातली मुलगी उंच स्वरांत पाढे म्हणते, स्त्री कुणाशी तरी कचंकचं भांडते, मुलगा आवडीचं गाणं शिट्टीवर म्हणत हिंडतो आणि पुरुष आपल्या एका मित्राशी (खूप महत्वाचं आहे, असा आव आणून) बोलतांनाच अचानक ही सगळी चौकडी गोठल्या सारखी होतात. कुठल्याशा देवळात घंटा वाजतेय. आणि धीर गंभीर अशा आवाजात एक श्लोक सुरू होतो.)

अखंड मंडलाकारम् ।
व्यप्तंयेनचराचरम् ।।
निर्विघ्नंकुरमेदेवो ।।
सर्व कार्य शुसर्वदा ।।

(प्रत्येक जण वितळत असताना अतिशय थकलेले आहेत. मुलगा मुलगी प्रेक्षकांकडे पाठमोरे झालेयत. आई म्हणजे ती स्त्री लगेच आपल्या स्वयंपाकघरात आलेली आहे. तांदूळ निवडत बसलीय. पुरुष येतो. कोट, टोपी काढून रंगमंचावर एकमात्र असलेल्या खुर्चीवर बसतो. वेळेचा अंदाज घेवून काल्पनिक रेडीओकडे जातो, त्यावर ऐक गाणं सुरू होतं — 'हरवले ते गवसले का.. गवसले, ते हरवले का'...न राहवून ती)

स्त्री : बंद करा हो ते डबडं ! लहान मुलासारखा रेडीओ काय लावताय ! हरवले ते गवसले काय गवसले ते हरवले काय ? काही कळतं तरी काय गाण्यातलं ?

पुरुष (हांसतो) वाह ! अहो केवढा मोठा प्रश्न विचारलाय, याचा कधी विचार केलाय कां ? आज चार दिवसापासनं हे गाणं दररोज लागतंय – त्याचा जरा बारकाईनं अर्थ काढायचा तर – ते राह्यलं बाजूला. हे आपलं नवीन डबडं घेवून बसलात. तुमची तरी कमालंच की हो !

स्त्री (फणकाऱ्याने) वडवायला नाही बसले. तुमचं मला रोजचं ऐकून घ्यायचं नाहीय. 'आज भात नाही केला.'

पुरुष : बरं बरं. मग जरा बबनच्या वाटणीचा दुप्पट टाका ! सकाळी भात न खाताच गेलाय नं घाईघाईनं . . .

स्त्री : हो . . , टाकते नं ! बाहेर उकीरडे फुंकित बसायचे आणि घरी भात गिळायचा. दुसरं येतयं काय त्याला. उडाणटप्पू मेला . . . फार शेफारून ठेवलंय तुम्ही त्याला. घरातलं एक काम नाही करायचं की बाहेर कवडया नाही कमवायच्या. नुसतं डोक्यावर बसवून ठेवलंय गं बाई. मीरे वाटणार आहे हा एक दिवस.

पुरुष (अजिजीने) अहो, आज गेलाय नं चहाच्या कंपनीत इंटरव्ह्यूला.

स्त्री सकाळपासून जो गेलाय ढोंगी तो अजून आलाय तरी कां ? येऊ तर द्या घरी त्याला. नाही फाईलावर . . .

पुरुष नाही नाही. तुम्ही रागवायचं नाही हं त्याला. येवढ्या मोठ्या पोराला कसचं रागवायचं. काही तरीच आपलं.

अहो ! पोरगा रुसेल, छकुलंय माझं ते ! तुम्ही रागावू नका हं त्याला. किती ठिकाणी त्यांनी प्रयत्न केलेयत – तुम्हाला माहीतीय नं सगळं. त्याला रागावून कसं वरं चालेल. एकच तर बाळ आहे आपल्याला . . .

स्त्री : तोंड पहा आरशात ! जरा बाहेरच्या घरांत डोकावून बघा – म्हणजे कळेल. अगदी घरकामांपासून रात्री आपले आईबाप निचिंतीनी पडेपर्यन्त त्यांची कोण धांवपळ चालू असते. ती पोरं शहाणीच हो.

पुरुष कुणाबद्दल बोलतीयस ?

स्त्री तुम्हाला माहितीय सगळं !

पुरुष बाकीच्या घरासारखं आपलं घर कुठेय ? आणि शिवाय एखादाच श्रावण असा निघतो जो आपल्या आईबापाला हसरा–आनंदी ठेवू शकतो. बाकी सगळे धटींगण, उद्धट असतात. लोकांच्या घराशी आपली बरोबरी करून तू फार मोठी चूक करतीयस. नसत्या भ्रमांत राहू नको. नुसता जिवाला घोर. आधीच उल्हास नांदतोय इथे – त्यात फाल्गुनात बुडालेलं घर . . . नुसता खायला उठतो इथला कणन्‌कण, ही खुर्ची, ही कोंदटलेली हवा, हे छप्पर, हा अंगातला सदरासुद्धा . . . ! आपल्याला कुठलं सुख आणि आराम, देवानं इथे शिक्के मारून मर्जीबाहेर केलंय न आपल्याला . . . (गंभीर, एकाग्र होऊन) माजलेयत सगळे हरामखोर . . त्यांचीच चलतीय. मग उगाच कशाला रडायचं. समोरून आदळणारा प्रत्येक क्षण आपण झेलायचा – तो सुटला तर बाद. व्हायचं अगदी बरबाद. कळलं ? म्हणून म्हणत होतो की बबनला आल्यावर सवयीप्रमाणे भडाभडा टाकून बोलू नको. तरुण आहे तो. रात्रींचं रक्त आणि देवाचा दैत्य करणारा जीव आहे. नसता अवमान करून घेऊ नकोस – उतरत्या वयात तुम्हाला तो मानवायचा नाही ऐकतीय नं मी काय म्हणतोय ते.

स्त्री कटकट करू नका हो. घरात काय करायला हवं नको त्याला मी समर्थ आहे . . . !

आणि त्या बबनच्या फालतुपणाचा तर अगदी वीट आलाय अता. सारखं आपलं बबन बबन. ठाऊक आहे बबनवर तुमचा खूप जीव आहे. तुमचं ते छकूलंय, बच्याय. ऐकून ऐकून कान किटलेयत माझे. ढोंगीपणा तरी किती करावा माणसानं, मला नाही बाई जमायचा असला लाळघोटेपणा ! मला जे योग्य वाटतं त्याचाच मी विचार करते – आणि तेच करीत असते. तुमच्या सारख्यांकडून शहाणपण उधार घेतलं असतं तर एव्हाना धर्मशाळा झाली असती घराची. कलथून गेलेले खांब खचलेल्या भिंतीच्या कोपऱ्यात संपून गेलेले दोन तरुण म्हातारे – दोन बोचकी, आपण बसलेलो राह्यलो असतो. बघवलं असतं तुम्हाला ?

(याच वेळी एक भिकारी येऊन भीक मागतो)

काही नाही रे बाबा आज. (वरं माई करत तो जातो.)

पुरुष तू काय बोलतीयस मला काही कळत नाही..

स्त्री अस्सं. !

पुरुष मला कळतो तो फक्त स्वार्थ. दीर्घायुष्य हवं असल्यास स्वार्थाखेरीज दुसर टॉनिक नाहीय, आहेस कुठे ? आणि. .आपण म्हातारे दुसरं काहीच करू शकत नसतो गं. तरुणपणी मरायचं नसतं म्हणून म्हातारपणाच्या घोंगडीत शिरायचं. झालं. कुठेतरी खोल दडी मारून बसल्यानी कां मृत्यु टळतोय. जून झालेले मासे असतो आपण !

आता तू माझं शहाणपण काढलंस, आपल्या नवऱ्याची अक्कल काढलीस मला ढोंगी म्हणालीस लाळघोटचा म्हणालीस..

मला त्याचं काही वाटलं नाही ! सगळचा अहंकाराचे थर घोळून निघाल्याने मी आता कशाचंच मनाला लावून घेत नाही. माणसानं अहंकार गिळावा, सगळं काही मिळतं. बबुला तू रागावून का नोकरी मिळणार आहे. जिथे योग्य आहे तिथेच तू त्याला रागवायला हवयंस... उगीचचं

स्त्री पुरे हो. पुष्कळ बोललात. बस झालं आता.

आणि खरं सांगू कां ? तुमचा हा थंडपणा पाहूला नं की छातीत डोंब उसळतो रागाचा. वाटतं... वाटतं निघून जावं या घरातून. जो बघावा तो आपल्याच कुऱ्यांत. अरे ! घर म्हणून कांही कर्तव्य—मर्यादा आहेत की नाही ? काय करायचंय मेलं असल्या फुटक्या तुटक्या घरटचांत राहून. पोरीनं तर जन्माचा डाग दिलाय. काय तर म्हणे तसं तिने — डायरीत लिहून ठेवलंय. वारेवा !

उद्या मी ही म्हणेन हो — गर्भारपणांत कार्टीनं लाथा झाडायला सुरवात केली होती, मी मग ठरवलं होतं — नक्को गं बाई तो पोराटोराचा त्रास, म्हणून मारून टाकलं मोठेपणी. तान्हेपणात माया आडवी येत होती नं. म्हटलं जरा होऊ द्या मोठी, तूपरोटी खाईल, गुबगुबीत होईल. तसं झालं. तसं झालंन् मी तीला मारलं.

तुम्हाला पटेल ते ? कां ? मीही माझ्या डायरीत लिहून ठेवलंय. नाही हो, तुम्हाला जमणार नाही आयुष्यात विचार करणं ! तुम्ही आपल्या ढोंगीपणाचा टेंभा मिरवा पुलावर बसून. बस, तुमचं कार्य संपलं.

पुरुष (विमनस्कपणे) फार विखारी बोलायला लागलीस गं तू आताशा. डोकं कसं अगदी बधीर होऊन जातं. पडत असतात सारखे तुझ्या घनगंभीर जड शब्दांचे घणाघात.

सोसतोय सगळं मुखवटयांच्या आडोशाखालून एक जीवाभावाची मैत्रीण म्हणून...माझ्या बरोबरीनं आयुष्य वेचणारी माझी बायको म्हणून... कुशीत डोकं खुपसून पोटभर रडू देणारी एक आई म्हणून...

अगं ! एकमेकांच्या सुरकुत्या मोजायचं वय उलटून गेलंयन् तू मला...अजून ओळखू शकली नाहीस. परमेश्वरा ! काहीतरी अघटीत घडलंय रे बाबा किंवा घडणार आहे ! अशी जगाविरहीत बायको मिळायला भाग्य लागतं म्हणतात तेकाही खोटं नाही.

स्त्री ही तक्रार येवढचा उशीरा करतायं ? काय म्हणावं हो तुम्हाला ?

पुरुष सगळचाच गोष्टी मनाजोगत्या घडत्या तर कसली तक्रार होती हो ! बरं ते जाऊ दे. कुठून कुठवर आणून सोडलंस बघ तू मला. विपर्यास नुसता विपर्यास, माय फेअर लेडी ! दाय नेम इज विपर्यास।

(थोडं थांबून) काहो ! एका प्रश्नाचं उत्तर देऊ शकता तुम्ही मला ?

स्त्री : आता काय आहे ? नविन काहीतरी मेलं खुळ..

पुरुष आता समजा...आपल्यापैकी उद्या कुणीतरी मेलं, नाही म्हणजे मरणारच आहोत कधीतरी — तर ...पींडदान कोण करणार हो आपल्याला...?

स्त्री (दचकून) त्याचं काय आहे आता. कोणी करायला हवं असं म्हणणय तुमचं...आपला बबन कशाला आहे.

पुरुष : (हासून) आणि तुमच्या असल्या ह्या झणझणीत बोलण्यानी तो आपल्यावर रागावून घरातून निघून गेला तर...!

स्त्री : (चरकते)

पुरुष (तिची अवस्था बघून) आलं कां ध्यानात ? आता तरी जाग्या व्हा — थोडा गावंढळाणा बाजूला

सारा – पोराला समजावून घ्या. तुझं माझं लग्न झालं. तेव्हा कुठे होती नोकरी मला. अगं ! तुझ्या रागवण्यानी कां बबनला नोकरी मिळणार आहे. ती मिळायची तेव्हाच मिळत असते गधडी.

केवढ्या मिनतवाऱ्या करून धाडलाय त्याला इंटरव्ह्यूला. तू पाह्यलंस नं सकाळी.

स्त्री सकाळपासून जे तोंड काळं केलंय मेल्यानी, अजून आलाय तरी कां घरी. ह्या असल्या बेजबाबदार वागल्यामुळे मला तिडीक फुटते.

दीड वर्षापासून तस्सा रिकामटेकडा बसलाय काही शरम ? दिवसभर भटकायचं मवाल्यांबरोबर, फक्त जेवायला न् झोपायला तेवढं यायचं घरी वाट्टेल तेव्हा.

पुरुष : अहो काय करेल घरी बसून. आपले हे असे सदैव लंबे चेहरे – खुंट्या ठोकून ताणून धरलेले, बरं तुमचं त्याला ते सतत रागावणं...अशानं कंटाळून जातात पोरं. मंजून सुद्धा कंटाळूनच तर.... (अडखळतो)

परत तोच विषय नको होता मी काढायला. (स्वतःवर चिडत) अहो पण वस्तुस्थिती कधी लपल्यायत कां ? (खिन्नपणे हांसतो.)

स्त्री : (फूटून) हो हो मीच मारलं माझ्या मंजूला. जबाबदार आहे मीच एकटी तिच्या आत्महत्त्येला..

मला ते गुबगुबीत केसाळ पिल्लू आवडलं नव्हतंच कधी आणि मांजर नावडत्या पिल्लाला पोसत नसते कधी – माहीत आहे नं ?...ती त्याला चावून चावून मारून टाकते !

माझ्या दांताची टोकं अजून बोथट झालेली नाहीत ! वेळ आलीच तर मी बबनला ही (हुंदका अनावर होतो.)

पुरुष अहो रडायला काय झालं ? माझा तसा उद्देश नव्हता. पण मला एक गोष्ट आवडली. स्वतःच म्हणन खरंच आहे हे जर समोरच्या गळी उतरवायचं असेल तर मात्र तुमच्याकडून रडणं शिकायला पाहिजे. अहो, हल्ली धड रडू सुद्धा येत नाही !

इकडे आपण अगदी भरपूर गंभीर चेहरा करून बसावं पण या डोळ्यात टिपं जमून येतील तर शपथ.

(दारावर टकटक होते. स्त्री हुंदक्यातून सावरून दार उघडते समोर एक मुलगा – हा बबन – यांचा मुलगा. चेहऱ्यावरून तो कुठेतरी पिडलेला वाटावा. नुकताच इंटरव्ह्यूहून आलाय. पुरुष त्याला ती चिड-ल्याचे सांगतो. तो त्याकडे दुर्लक्ष करून एक वाहियात गाणं सुरू करतो.)

मुलगा रेशमा जवान हो गयी... तीरे कमान हो गयी...

...साजनवा... साव...न वी..ता जा... य..

स्त्री : काय रे लोफरटा वेडबीड लागलंय कां ? डोमकावळा मेला...

मुलगा (हासत) लागणार आहे एक दिवस ! नाही तरी मी वेडा झाल्याचा आनंद होईलच तुला ! आता कुठल्याही आर्टमध्ये त्याचा फाईननेस यायला थोडा वेळ लागणारच. नाही कां ? आता ही जी भव्यदिव्य कलाकृती तुझ्या गर्भाशयाच्या फुग्यातून तडफडत बाहेर आलीय तिला लोकांनी ॲक्सेप्ट, ॲप्रिशिएट करायला मला थोडी तालीम नको का करायला

नाही म्हणजे मी चूक असेन तर... काय बाबा ?

पुरुष ए काय वाट्टेल ते काय वरळतोयंस बब्या ? फुगा काय, कलाकृती काय ! अरे आपल्या आई समोर असं बोलायचं. आता मी एक समजू शकतो बाबा तुझं ते नवकाव्यात्मक बोलणं आईला काय कळणार त्यातलं ?

मुलगा : ह्यं...तिला सवय झाली असणार एव्हाना. काय मी बरोबर बोलतोय नं ?

स्त्री (संधी मिळाल्यासारखी) स्वतःच्या अस्तीत्वाची जाणीव नसलेल्या तमाम नावा आता बुडवायला हव्यात जबरदस्तीने ! पाणी गळचावर चढायच्या आंत ! (आत झर्रकन निघून जाते).

मुलगा (भानावर येत) करेक्ट! पण समुद्र कुठाय ? तीथे तर नुसत्याच नावा भरल्यायत डचाडच !... आणि आमच्या संपन्न तरुण मनाची रुसलेली स्पंदनं !

काहो ? माझ्या आधी आई काहीतरी बोलली. आठवतंय ? डू यू रिमेम्बर ?

पुरुष : ज्या नावेत कुणीच बसलेलं नाही – त्या काही

तरी बुडवायला हव्यात. (हांसतो) आता माणूस नसलेली नांव एक दिवस बुडणारच नाही कां ?

मुलगा : नाही नाही. शी सेड समथींग डिफरंट !

वाह ! जे काही ती बोलली त्यावर आपण अगदी फिदा आहोत.

कुर्बानं !

आईनं तर चक्क आमचा पंथ स्वीकारलाय बाबा. चला जे होतं ते चांगल्यासाठीच. गुड व्हॉट अबाऊट यू डॅड ? तुम्ही कुठले ?

पुरुष : (खोटं हांसत–टाळत) मी तसा...सकाळी गेला होतास ?

काय झालं त्याचं. तुझा इंटरव्ह्यू कसा झाला ?

मुलगा : नो व्हेकन्सी !

पण...ॲज यू नो, असले प्रश्न मला परत विचारीत जाऊ नका. गॉट इट !

पुरुष : ते ठीक आहे रे राजा. मला ते पटण्यासारखंही आहे. पण दिवसेनदिवस मी आता व्हेकंट होत चाललोय रे बाबा...

मुलगा : मग त्या शेजारच्या जानूथेरड्याबरोबर जात जा हिंडायला बँक ऑफ इंडीयाच्या कट्टयावर...

घरी आल्यावर तुमचे ते सुतकी चेहरे, ती मुर्दाड शरीरं बघवतं सुद्धा नाही, पण सांगतोय कुणाला... तुम्ही असेपर्यंन्त ही व्याधी माझा पिच्छा सोडायची नाही. ती सोसल्याशिवाय दुसरा मार्गच नाहीय जा, तीही सोसायची ताकद आहे. एवढंच आहे नं, तोही दगड ठेवून घेऊ छातीवर. (पुरुष जातो).

सालं ! कधीकधी वाटतं फार प्रांजळपणे बोलत सुटणारा मी एक शुद्ध कावळा आहे ! आई म्हणत असते कधी कधी लाडानं, ते काही खोटं नाही.

कावळा दिवटा चिडका मेला
गुढाळून हिंडतोय फाटका शेला
कांव कांव कांव नुसतंच रे काय
बघ ! तुझं वय सगळं वाहून जाय

(सरळ प्रेक्षकांना) कावळ्याला काम नाही हो। अजिबात नाही. करावी लागते ती नुसती कांवकांव। आणि रंगीबेरंगी महालांच्या मिनारघुमटांवरून अफाट भटकंती...कधी कुठल्याशा घरांवर बसून पाहुण्यांची अगावू वर्दी द्यावी लागते. हो. .! तेव्हा कुठे नशिबाला येतात चारदोन खरकटया पत्रावळी !

पाहुणे आलेच नाहीत तर..गळा हिरवा निळा होईल तोवर करावा लागतो नुसताच कंठशोष, विनंत्या, याचना आर्जव.

तरी आशेचा देवचार ओरडतच असतो. घडतं निराळंच ! दूर निष्पर्ण झाडावर भरदुपारी ऐक काऊ कोकलत असतो जीवाच्या आकांतानं !

पैल तो गे काऊ कोकताहे
शकून गे माये, सांगताहे
उड उड रे काऊ तु सोन्यानी मढविन पाऊ

पावू सोन्यानी तर मढवीत नाहीच कुणी, पण भाताची शीतं चोचीत पकडतांना असाच कुणीतरी बेचकीनं फोडतो एक डोळा. कुणाचा ' मा निषाद ' नाही की वर्तमानपत्रात साधी काळी चौकट नाही. बेकार श्वास चालू असतो साला. ...थराथरानं वाढत जाणाऱ्या चामडीला साथ देत. पायखालच्या चर्रमर्र वाजणाऱ्या पाचोळ्यासारखं निःसत्व, घरातल्या भगभगीत म्हातारपणाच्या सहवासांत चाललं असतं भणंग आयुष्य सावणफुग्यासारखं !

इतक्यात...दूर टेकडीवर ऐक अजाण वृक्ष लागतो. जवळ जाऊन बघावं तर ते जांभळाचं झाड असतं. (सुखावून) जांभळाचं झाड !

गर्द वृक्ष. पोसलेली गडद सावली. लवलवीत शांतता. अधूनमधून लटकणारी रसरशीत जांभळांची टप्पोरी लोभसवाणी झुंबरं ! (लवंडतो) !

(आतापर्यंन्त पाठमोरी असलेली मुलगी म्हणजे शाशा हलकेच येते. त्याला जागं करायच्या इराद्याने खाकरते, हासते. तो उठत नाही हे बघून थोडयाश्या लटक्या रागानेच)

मुलगी : ऐ.. ! म्हटलं कसली तंद्री लागीय येवढी. केव्हाची उभी आहे मी इथे.

मुलगा (चाळवतो) अं ? ' साय पांघरून दूध झोपी गेले '

मुलगी : फन्टॅस्टीक ! ऐ, कसल्या कल्पना आहेत या, कशा सुचतात तुला ? ऐ...सांग ना...

मुलगा : ही साय आहे नं साय... या मऊशार सायीच्या पांघ्रुणाखाली माझा मी नसतोच कधी.

मी असतो आपलीच कुडी घट्ट धरून असलेला... अेखाद्या झपाटलेल्या पीरासारखा

मुलगी (लाडावून) अे...! यू आर अ सेल्फिश, फायवर हं !

मुलगा (हासून) वन हॅझ टू बी...काग, पण आज वेळ का लावलांस यायला. तू असाच वेळ लावणार असशील तर ही लोभस झुंबर खळ्ळकन फुटून सुद्धा जातील. तुझ्या अध्याहृत निचींतीने माझा मात्र फार छळ होतो. किती वाजलेत ? गेस ?

मुलगी वेळ कुठे रे ! आम्ही आपली तडतड करत रोज तुला भेटायला धडपडायचं, आणि तू वर हे असले वेचव प्रश्न विचारून मूड घालवायचा.

मुलगा मूड जायला झालंय तरी काय ? कुठे दाखवलं (ती रुकार दर्शवते) अरे व्वा ! सालं, म्हणजे हे खूपच झालं ! मागणी घातली ? (ती परत रुकार दर्शविते) कमाल आहे ! नाही नाही... तू काहीही म्हण, शाशा पण तू आहेसच पुसून ठेवलेल्या त्या स्वच्छ कांचघरातल्या – हव्याहव्याशा – वाटणाऱ्या बाहुलीसारखी. ती तर तकलादू असते आणि तू (कल्पनेने) व्वा ! आता मला थोडे अर्थ लागायला लागलेयत की जगामधे तुम्हां बायकां-साठी युद्ध कां पेटतात ! नो. नो. मला कळलं, पटलंही आहे. शाशा – वा ग व्वा !

मुलगी : वा काय ? तुला गंमत वाटत असेल, बट, आय हॅड अ सिरीयस स्टॅन्ड. तुला कळत कसं नाही, तुझी माझी फक्त ओळख आहे येवढंच पाँपला ठाऊक आहे. काही सबळ असं कारण म्हणजे तुला असलेली एखादी नोकरी असं काही असल्याखेरीज मी पाँपला साधी अप्रोच सुद्धा होऊ शकत नाही. ते लोक अगदी हात धूवून लागलेयत. वडं घराणं आहे असं पाँप म्हणत होते. मला काही लक्षणं ठीक दिसत नाहीय.

मुलगा : अगं, मग मी काढू कां गोष्ट ? मी सांगेन त्यांना सगळं स्पष्ट की...ह्या ह्या अशा अशा फॅक्टस आहेत. फॅक्टस आर् फॅक्टस ! त्या तुझ्या पाँपलाच काय पण कुणालाच निगलेक्ट करता येणार नाही.

मुलगी : येशील ?

मुलगा : हो

मुलगी : उद्या येतोस ?

मुलगा ओके

मुलगी : ...पण नको. उद्या नको. पुढल्या रविवारी पाँप फ्री आहेत मी अपॉईन्टमेंट घेवून ठेवीन.

...पण बबन पपा तुझ्यावर नाराज तर होणार नाही नं ?

मुलगा अगं, नसत्या शंका काढू नकोस, पपा नाराज होतील असं मी कांही केलंय कां आजवर... अगाचच.

मुलगी : दॅटस नो प्रॉब्लेम ! बट् यू नो, पाँप इज व्हेरी प्रॅक्टीकल (एकदम चिडून) अे, तू नोकरी कां करीत नाही रे ! दीड वर्षापासून आपण असे रोज भेटतो आहोत, पण तुला नोकरी मिळत नाहि असं जे तु म्हणतोस नं, त्यांवर माझा बिलकूल विश्वास नाही. आय डोन्ट बिलीव्ह इन !

...आणि खरं म्हणजे तेच अेकून मी बोअर झालेय.

मुलगा : मला कळत कां नहिय ते ? पण शाशा, आय अॅम हेल्पलेस...वरं मी काय करावं अस म्हणणंय तुझं ?

मुलगी (तडकून) उटकमंडला जाअून रहा ! नोकरी नाही करता येत ?

मुलगा : आता कसं सांगाव हिला...

शाशा, तुझ्याशी ओळख झाल्यापासून शोधतोय मी नोकरी. मला माझ्या जाणीवा नाहीतच असें कां समजतेस तु ? मला काहीच कां वाटत नसेल ? तुम्ही कसे गं स्वतःच्या सोयीनुसार अर्ज लावत बसता. किती ठिकाणी अप्लाय केल्येत, किती ठिकाणी उंबरठे झिजवलेयत ? –

बघायचय प्रत्यक्ष तुला ?

मी अपला दर वेळी नव्या उमेदीनी धांवतोय समोरसमोर आणि प्रत्येक वेळी समोरच्या दरडी-वर आदळून फुटतोय, त्याची कुणाला खंत ?

मुलगी : (त्याच्या खांद्यावर हात ठेवते)

मुलगा : साध्या चिवेलाही महाग झालोय. इकडे जखमा वाढताहेत. वाटतं...हे सगळं एक दिवस संपवून टाकावं.

मुलगी : बबन !

मुलगा : तुम्हाला काय होतं नुसतं बोलायला

मुलगी : बरं बाबा. चुकले मी. आय अॅम सॉरी !

मुलगा वाईट अशासाठी वाटतं, तुला हे सारं ठाऊक आहे. तरी सुद्धा.

मुलगी : (त्याला तोडत) पप्पांची कड घेतेस ! तसं नाही रे बबन, मला उद्या तूच दोष देऊ नयेस म्हणून जागं करतीय.

मुलगा : अग, पण जागं करून करणार काय ? नोकरी मिळायची तेव्हाच मिळणार. तुझे पपा तर ठेवणार नाहीत न मला त्यांच्या ऑफीसला....

मुलगी : ओह ! शीट. त्याच्या ऑफीसला मला तू मुळीच आवडणार नाहीस.

मुलगा : एरवी तरी आवडतो की नाही कुणास ठाऊक !

मुलगी : बबन, बबन डोन्ट बी सिली हं. तुला माहितीय नं मला ही असली गंमत आवडत नाही (तो हांसतो) ए, मला आज घरी जायचंय लवकर, मी जाऊ ?

मुलगा : जा बाई जा, तुला कोण अडवणार (ती हांसते)

मुलगी : तसं नाही रे, पण मला सारखं वाटतंय की पॉप हे स्थळ सोडणार नाहीत, आणि एकदा ते निश्चित झालं नं. की आय अॅम अफ्रेड आय कुड हेल्प यू ? बघ रे बाँ, टाईम अॅन्ड टाईम वेटस फार नोबडी, अजूनही निट विचार कर. अरे, मी काय बोलतोय, लक्ष आहे नं ? (तो मान डोलावतो)

(मनगटांवरल्या घड्याळाकडे बघत) आयला, इटस् टु लेट ! ऐ मी निघते हं आता. जाऊ मी ? रागावला नाहीस नां ?

मुलगा : कसा रागावणार ? तू म्हणजे महाबळेश्वरी मधाची बुधली आहेस, मध चाटवून मुकं करून जाणारी ! (ती जाते) (सरळ प्रेक्षकांना) अहो, मध नुसतं बघीतलं तरी वाचा जाते हो मनुष्याची ! मी मुका आहे. (हांसतो) दार नसलेल्या प्रश्नांच्या घुमटांत गोल गोल फिरणारा एक बंदीस्त मुका ! किंवा हो–

मी आहे हुसेनच्या चित्रांतला तरणाबांड घोडा, पिकलेल्या केसांची आयाळ असलेला ! (पार्श्वभूमीवरून 'कोण आहेस तू ?, तुला नोकरी कधी मिळणार ? तुला शाशा कशी मिळणार ?', 'तू जगणार कसा ?' इत्यादि प्रश्नांचे कल्लोळ येऊन आदळतात.)

बंद करा. सहन होत नाहीय आता माझ्या नादान ढोलांवरली तुमची फितुरी. . मी घोडा आहे, पिवळी जखम खोदलीय माझ्या मणक्यामणक्यांवर... जे दुर्बल घोडा. (निश्चयाने) नाही, नाही. मला इथून गेलंच पाह्यजे. मोहमायेच्या या लटकणाऱ्या झुंबरां-खालून, बर्फाच्या लाद्यांवर पडून शरीर कमवायला.

पाठ केल्या उत्तरांचे प्रश्न फितूर ओढून नेती
हलकट भडवे हृदयांमधले, चंद्र काढून फेकून देती
चार लोक खांदा देतील, म्हणून काय हुरळून जाऊ
कुणासाठी माझा मेंदू, त्यांच्या कवटीत भरून ठेऊ.

मी येणार नाही मायबाप हो, तहान लागली तरी, भूक वाढली तरी, माया नडली तरीही...! करा पिंडदान तुम्ही स्वतःचे स्वतःच स्वतःला मुलगा समजून ! सापडलाय मला माझा स्वार्थ ! तुम्हीही शोधा आपल्या मुक्तीचे शिसवी मार्ग ! (निघून जातो)

काळोख.

परत सुरवातीचेच सारखे आदळणारे 'वॉन्टेड 'चे कल्लोळ.

सायक्लोरामाच्या पार्श्वभागावर वेडीवाकडी भटकणारी ही चार पात्र हिंडताहेत.

कुठूनतरी सुरू झालेला न्हिदम पुढे स्वतःचे अस्तीत्व विसरायला लावण्याइतपत थोर झालेला आहे.

[परवानगीसाठी पत्ता–
डॉ. सौ. माधवी म्हैसाळकर, पवनीकर बंगला
धंतोली, नागपूर–१२]



क वि ता

पायवाट

ज. सा. गवळीकर

पायवाट !
लक्षावधी वर्षांची रूळत आलेली ! !
प्रत्येकाच्या पावलाने मळलेली पायवाट !
सृष्टीच्या आदीपासून अंतापर्यंत गेलेली
प्रत्येक व्यवहारी अन् काही असामान्य . . .
याच पायवाटेने जातांना दिसले मला
कधीही न संपणारी पायवाट !
पायवाटेने जातांना जीवनाचे ओझे
मेंदू असलेल्या टकलावर असतेच
हे ओझे अटळ आहे . . . हा रस्ता अटळ आहे
अटळ नाही फक्त चालण्यातला वेग
काही चालतात . . . काही धावतात
काही धावतांना पडतात . . पडतांना सावरतात
पुन्हा चालू लागतात.
चालण्याची संथ लय फार थोड्यांना जमते
कारण घाई असते डोक्यावरचे ओझे फेकण्याची
ओझे फेकून कोठे जाणार . . .
हा एक अनाकलनीय प्रश्न !
कुणी म्हणतात ते खिस्ताला समजले
कुणी म्हणतात गौतमाला तर कुणी शंकराचार्याला
समजले असेल आपल्याला काय त्याचे !
आपण फक्त पायाखालच्या वाटेने जायचे
जायचे आहे थांबाव कशाला ?
पण डोक्यावरल्या ओझ्याला नीट सांभाळा
खाली पडतांना ओझे मात्र पडता कामा नये !

अनुक्रमणिका

प्रतीक्षा
चित्रा पांढरकर

गच्च चांदण्यांची
झाली केव्हाची दारी
साजण माझा घरी
येईच ना ।
उभी कधीची दारी
उरी थेंब असोशी
थेंबरेघ दारी
उमटे ना ।
वल्ही पापण्यांची
वल्हवीत वल्हवीत
रात केली पार
वेदनेची ओल
सुकेची ना ।

—०—

बुचाची फुले
विजया जहागिरदार

चिमण्या वयाचा सुगंध उधळत...
टपटपणारी, ही बुचाची फुले !
बाल्याचं अत्तर, याच्या पायतळी...
जागोजागी, शिंपलेले !
देठांच्या पिसाऱ्यात...
हळव्या हळव्या स्मृती !
हातात मावणार नाही...
असा गेंदेदार गुच्छ !
त्याची माळ गुंफीत..
भूतकाळात चाचपडणारी मी !
एकेक फूल गुंफत गेले...
एकेक देठ तुटत गेला !
एकेक फूल गुंफत गेले...
एकेक देठ तुटत गेला !
पुन्हा पुन्हा बुचाखाली...
अश्वत्थाम्यासारखी...
तुटलेल्या देठांच्या शोधात !

—०—

शोध
शंकर बडे

पेटलेली प्रेते सारी
आणि मी उभा इथे
शोधतो मी प्रेत माझे
दिसेना ते इथे कुठे ?
शोधली मी राख सारी
चितेमधली तापलेली
उघडून पाहिली मी
प्रेते ती झाकलेली
माझे मला शोधण्याचे
नच मी हे सोंग केले
जीवंत मी आहे असे
खरे तर मी ढोंग केले.

—०—

आठवण
वनिताप्रसाद

रांगणारी नाजूक पावलं
अजून आठवताहेत –
लडिवाळ बोबडे बोल
कानात उमटवताहेत प्रतिध्वनि –
शुभ्र काळे निर्मळ डोळे
चिमुकले हात
चाफेकळींच्या साक्षीनं
नुकतेच उमललेले गुलाबी गाल –
अजून दिसताहेत स्पष्ट
– रिकाम्या पाळण्याच्या
अश्रुधारेत !

—०—

आग
बबन सराडकर

पाहटेच्या पारी
पेटल्या मशाली
सांभाळिला जरी
बर्फ उशाखाली
इथे नाही अश्रू
तिथे नाही मेघ
विझवावी कुठे
आभाळाची आग ?

—०—

गरजदरी

राम देशमुख

चंद्रसूर्या अडवून : सातव्या खालच्या पुडाशी
यंत्रकूपाची अनुमती घेत न घेत
भर उन्हाचे इथून चमचमत जाणारे चंदेरी पाट
निर्मम माणसाच्या काळजासारखे...!
कधी कधी पाझरतात या दगडी तटबंदीतून
        अकुतोभय पाझर इथे, तिथे
चंद्र–सूर्याची एन्ट्री ज्या घळीतून होते –
    तिथूनच सातपुड्यातला माणूस एक युगनाट्य निर्मितो
निसर्गाच्या रंगमंचावर : पार्श्वभागी–
    मोरपिसांचे रंग लेवून उभी पर्वतराजी
    नेमस्तांबरोबर पांढरे झेंडे हाती घेतलेले रानगवत
    पिवळट शेलाट्या अंगपेराची क्रांतदर्शी तिखाडी
    जुन्या जमान्यातील सुसंस्कृत स्त्री–सारखे
    केसांचे फुगे काढून सजलेल्या नटमोगऱ्या टेकड्या
    पायघड्यासाठीच जसे काही अंथरून ठेवलेले
                    मऊशार, कातीव गवत
    ईश्वराचा शोध घ्यायला निघालेल्या तडीतापसांप्रमाणे
    जिच्या शोधात रान पालथे घालीत निघावे
    ती झोपडी अखेर भेटूनच जाते !
या आडरानात अजूनही नीतीमान लोक राहतात,
कारण 'पहिल्या धारे'ला ते पाणी घालीत नाहीत
नवसागर, स्पिरीट, ज्वारीची मुळं असले प्रकार
त्यांनाही माहीत नसतील असे नाही
दहा नया पैशात ज्याअर्थी कांचेचा लांबलचक पेला
भरून, तापवून ते गरम गोरस देतात
पहिला प्याला आतिथ्याचा म्हणून विनामूल्य देणारे हे
वन्य लोक रानटी कसे हेच कळत नाही
तसा सारा सातपुडाच उदार आहे !
–आणि आम्ही नागर माणसे
जरा कुठे आडरानी आलो की आमचे पाय डगमगतात :
        जेमतेम शंभरसवाशे मिलीतूनही
        आम्हाला लेहेंगा दिसतो !

अनुक्रमणिका

छातीवर साततुड्याच्या शिखरांचे मिनी चित्र
रेखलेल्या या पहाडकन्यका
आम्हाला पेलतील किंवा नाही याचाही विचार नाही..
होश सांभाळून भवताल बघावे तर
सातपुड्याच्या विशाल हृदयात; परास्त आपण
एखाद्या जंतूसारखे आपले आंबटशोकी
नागरपण अस्ताव्यस्त पडून !

--०--

माणसाचा शोध

दे. शि. दुधलकर

मी उत्खननच करीत चाललो आहे या धरतीचे
आणि प्रत्येक रस्त्याला विचारतो माणसांचे पते
दिशादिशांची घरटी कशी
झपाटल्यागत उस्कटून टाकलीत मी
पण उध्वस्त डोळ्यातील लाल रक्ताशिवाय
माझ्या हातात काहीच लागलं नाही
आता मीच मला कुरवाळीत फिरतो
ठेचाळतात पाय
या किड्यागत वळवळणाऱ्या जिवंत कलेवरांना
उद्याच्या उगवतीचं स्वप्न डोळ्यात भरून
तरी सुसाट निघालोय मी हा चिखल तुडवित
घेत कानोसा कुण्या एखाद्या दिलदार सादेचा
पण, अरेरे !
आपल्याच रक्ताचे हुंकार
असे गहाळ होतांना पाहिलेत की
डार्विनचा उत्क्रांतीवाद साफ खोटा वाटतो
अरे देव नावाच्या निसर्गा
खूप पाड पाऊस
आणि अमाप येऊ दे रे पीक
हृदयभरल्या माणसांचं
म्हणजे बरगड्यावर बसलेल्या
या किडकिडीत घरांनाही पालवी फुटेल
नाहीतर इथल्या उद्दाम ऋतुंना उशाशी घेऊन
अंगांगावर उवजलेल्या असीम वेदनांना थोपटीत
पद्धतशीरपणे सरणावर जळावं लागेल
शाप देत इथल्या माळ जपण्यात मश्गुल असलेल्या
छिनाल डोळ्यांना.

वाट पहा बाळानो, अंधार अजून संपायचा आहे !

म. य. दळवी

जन्मापूर्वीच मी तुम्हाला मरण दिलं,
पण तुमची आठवण बोचते आहे.
तुम्ही मला झालात, पण लाभलात नाही.
उदराचे दरवाजे ठोठावले पण जगात पाऊल टाकलेच नाही.
एक लिबलिबीत आकारहीन मांसाचा गोळा,
निर्मिला, वाढला आणि रक्ताच्या थारोळ्यात गाडला गेला,
खुल्या जगातील फुलांचा सुगंध तुम्ही घेतलाच नाहीत,
तुमच्या इवल्याशा डोळ्यानी जग पाहिलंत नाहीत,
तुम्ही खेळला नाहीत, बागडला नाहीत, नाहीत केलात हट्ट.
तुम्हाला मी आंजारलं नाही, गोंजारलं नाही, नाही काढली दृष्ट,
झालात असतात कदाचित कवी, नट वा शिल्पकार,
तुमच्या वाणीनं वेडावून केला असता टाळ्यांचा गजर,
पण हाय, तुम्ही अंकुरलात आणि फुलण्यापूर्वीच मातीत मिसळलात.
तुम्ही झालात आणि लगेच लगेच होत्याचे नव्हते झालात.
तुम्ही जन्मलाच नव्हतात असं तरी कसं म्हणू .. !
तुम्ही जन्मलात, देहाचा आकारही धारण केलात पण...
त्या मासाच्या गोळ्यात घालण्यापूर्वी प्राणांची फुंकर,
मी पाडलं तुम्हाला, लागू नये म्हणून दुष्ट जगाची नजर...
जगणं म्हणजे वेदना, भूक, अपमान आणि उपेक्षा
कठोर आघात, दीनवाणेपण, आणि आशांची रक्षा,
पोटाच्या खळगीसाठी शमविले वासनांचे धगधगते कुंड,
कशाला जीवन देऊ तुम्हाला जगण्यासाठी बनण्या षंढ,
जाणिवेच्या जन्मापूर्वीच दाखवले नेणिवेचे तीर,
क्षमा करा मला, तुम्हाला जगात आणण्याचा झाला नाही धीर,
पण माझ्या बाळानो, विश्वास ठेवा, अगर ठेऊ नका
माझ्या रक्तामांसाच्या अंकुरानो तुमच्यासाठी तीळतीळ तुटतो जीव
प्रेम दाटलं हृदयात, स्वतःचीच मी करते कीव...
तुमच्यासाठी रडण्याकरिता आता डोळ्यात पाणी नाही
आक्रोश करण्याचं त्राण दुबळ्या देहात राहिलं नाही.
माणुसकीला वाव आहे असं जग जन्मायचं आहे,
वाट पहा बाळानो, अंधार अजून संपायचा आहे.

—०—

अनुक्रमणिका

कै. वा. प्रो. त्र्यंबक आत्माराम भांडारकर

भी. गो. देशपांडे

जीवनस्य प्रवाहोऽयं
नद्या इव निरन्तरः ।
कृत्रिमोपाधिभिर्दिव्यो
भिद्यते न कदाचन ।।
–प्रो. भांडारकर.

मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण केले असता असे आढळते की काही सज्जन मरेपर्यंत काम करण्यासाठीच जन्म घेतात व सन्मान मिळण्याचा काळ येताच धडधाकट देहाने कुणालाही न कळत इहलोकाला राम राम ठोकून परलोकाची वाट धरतात. वाराणसीचे विद्वान, सज्जन, लोकप्रिय व प्रतिभासंपन्न कवी प्रो. त्र्यं. आ. भांडारकर हे वरील सज्जनांपैकीच एक होते. दिनांक १२–४–१९७५ सायंकाळी सात वाजता रस्त्यात आमची गाठ पडली. नेहमीचा हास्यविनोद झाला व दुसऱ्या दिवशी सकाळी ८।। वाजता फोन वरून कळले की पूज्य अण्णाजी भांडारकरांचा, ते आनंदमाईच्या मठात अध्यापन करण्यास चालून गेले असताना, हृदयक्रिया बंद पडून मृत्यू झाला. 'विना दैनेन जीवनं च अनायासेन मरणम्' न्यायाने हे फार बरे झाले. निधनापूर्वीच काही दिवस वर्तमानपत्रांत कै. वा. अण्णाजींना उत्तरप्रदेश शासकीय साहित्यिक अॅकेडिमीतर्फे त्यांच्या दोन संस्कृत काव्यग्रंथांवर सहा हजार रुपयांची दोन पारित्तोषिके मिळाल्याची आनंददायक बातमी वाचावयास मिळाली होती. म्हणून मी दिनांक ५–४ ला सकाळीच त्यांचे अभिनंदन नव्हे तर अभिवादन करावयाला त्यांच्या बंगल्यावर गेलो होतो. नेहमी प्रमाणे चहापाणी झाल्यावर त्यांनी पारितोषकार्ह ठरलेल्या दोन्ही ग्रंथाच्या प्रती मला दिल्या. ते काव्यसंग्रह आहेत, 'श्रीरामकृष्ण गीता' व 'श्री स्वामि विवेकानन्द चरितम् महाकाव्यम्'. हसत-हसत मी त्यांना म्हटले, 'अण्णाजी, भारतीय संस्कृतज्ञ आपल्या 'पाश्चिमात्य दर्शनम्' महाकाव्याच्या प्रकाशनाची आतुरतेने वाट पाहात आहे. मी स्वतः तुमच्यासारखा वऱ्हाडी आहे तेव्हा माझी पुरणाच्या पोळीची भूक रसगुल्ला व चमचमने भागू शकत नाही.' कै. वा. अण्णाजी प्रत्युत्पन्नमती होते, ते उत्तरले, 'आपली पुरणपोळी श्रमसाध्य आहे. जी गोष्ट श्रमसाध्य असते ती कालांतराने घडते कारण The sweetest fruit reapens the latest.' कै. वा. अण्णाजी मराठी, संस्कृत, इंग्रजी व हिंदी साहित्योद्यानांतील रसिक मधुकर होते. अशा विद्वान सहृदाच्या अनपेक्षित मृत्यूची वार्ता ऐकताच माझ्या अंतश्चक्षूंसमोर गेल्या बावीस तेवीस वर्षांचा काळ एकदम सरकला. १९७३ च्या मार्च महिन्याच्या सोळा तारखेला सकाळी दहाच्या सुमारास स्थानिक रामकृष्ण मिशन समोर त्यांची भेट झाली. त्यांच्या हातात पुस्तकांचे एक बंडल होते. त्यांनी झटकन् त्यातून एक प्रत काढली व त्यांच्या वऱ्हाडी कुडत्याच्या खिशातल्या फौंऊटनपेनने 'श्री भीमराव देशपांडे यांस सप्रेम भेट' असे वाक्य लिहून ती प्रत मला दिली व हसत हसत म्हणाले, 'योग्याय योग्यं दद्यात.' मी ती प्रत स्वीकारून त्यांना प्रणाम केला. ही प्रत होती 'विद्यार्थी आत्मचरितम्'ची. कै. वा रा. अण्णाजींनी आपल्या अनेक विद्यार्थ्यांच्या व परिचिताच्या अत्याग्रहावरून संस्कृत भाषेत काव्यरूपात वरील आत्मचरित्र लिहिले. मी त्यांना १९५३ पासून ओळखतो. मी अनेकदा त्यांच्याकडे संस्कृत साहित्यशास्त्रासंबंधी पृच्छा करायला जाई व ते माझे समाधानही करीत. ते अत्यंत मितभाषी व विनम्र वृत्तीचे होते. आत्मश्लाघा तर दूरच राहिली पण सत्यात्मकथन करायला देखील त्यांची सुसंस्कृत वाणी धजत नसे. प्रारंभी एकदा मी त्यांना सहज विचारले, "तुम्ही राहणीवरून वऱ्हाडी दिसता पण आडनावाने कोकणस्थ किंवा सारस्वत कै.

वा. डॉ. रा. ग. भांडारकरांचे जातभाई वाटता. ते खदखदून हसले व मला वऱ्हाडी बळणाने म्हणाले, "अहो ! मी तुमच्याप्रमाणेच शंभर टक्के वऱ्हाडी आहे. मी मूळचा चांद्या जवळील 'भांदक' गावचा 'भांदक-कर' आहे. मी जेव्हा १९२१ च्या सुमारास स्थानिक वसंत कन्या महाविद्यालयात संस्कृतचा प्रवक्ता म्हणून नियुक्त झालो तेव्हा जो तो मला 'भांदककर' म्हणजे काय अशी पृच्छा करी. ह्या निरर्थक पृच्छेला कंटाळून मी भांदककराचा 'भांडारकर' झालो. कारण हे आड-नाव सर्वश्रुत होते." हास्यविनोदात मी त्यांना पुढे विचारले, 'अण्णाजी ! आडनावाला उसना उजळा देऊन तुम्ही भलती जवाबदारी ओढवून घेतली.' हजर-जबावी अण्णाजी उत्तरले, 'अहो ! कै. वा. डॉ. रा. ग. भांडारकरांनी पाश्चिमात्य जगाला इंग्रजीतून संस्कृत शिकविले पण मी भारतीय संस्कृतज्ञांना संस्कृत काव्या-द्वारा पाश्चिमात्य दर्शन-शास्त्र शिकविणार आहे.' असे सांगून त्यांनी हिगेल व कार्ल मार्क्स यांची तत्त्वज्ञाने ग्रथित करणारे स्वरचित आठ-दहा संस्कृत श्लोक मला म्हणवून दाखविले. माझ्या आनंदाला पारावार राहला नाही. एका तत्त्वज्ञ संस्कृत कवीचा व तोही 'वैदर्भीय' परिचय झाल्यामुळे मनाला अनिर्वचनीय समाधान वाटले. तेव्हा ह्या साधुवृत्तीच्या वैदर्भीय संस्कृत कवीच्या जीवनाचा व काव्यसृष्टीचा आपण संक्षेपाने परिचय व आस्वाद घेऊ या.

कै. वा. अण्णाजी 'विद्यार्थी, आत्मचरितम्' मध्ये लिहितात चंद्रपूर (चांदा) जिल्ह्यातील वैनगंगा नदीवरील तोरणगावात एका सामान्य ब्राह्मण कुळात सन १८९७ च्या मार्च महिन्यात माझा जन्म झाला. भांदक सोडून तोरणगावास त्यांचे वडील केव्हा राह्यला आले ह्यासंबंधी ते काहीच सांगत नाहीत. माझे वडील आत्माराम भांदककर होते व माता वज्राबाई होती. मला एक वडील बंधूही होता. हा गाव फार लहान असल्यामुळे तेथे प्राथमिक शाळा नव्हती. तेव्हा त्या काळाला अनुसरून ब्राह्मणाच्या घरात जे शिक्षण मिळत असे ते मला मिळाले. माझी यथाकाल मुंज झाली. सोडमुंजेच्या वेळी बटू काठीच्या घोड्यावर स्वार होऊन संस्कृत विद्येच्या अध्ययनासाठी काशीला जाण्याचा अभिनययुक्त विधि करतो व त्याचा मामा आपली मुलगी त्याला देण्याचे अभिवचन देऊन त्याला तसे करण्यापासून परावृत्त करतो. हा विधि ज्या दिवशी झाला त्या रात्रीच मला एक अलौकिक व भावीसूचक स्वप्न पडले. त्या स्वप्नात मी एक दाढीमिशावाला विदेही महात्मा व त्याच्याच चरणापाशी बसलेला एक राजबिंडा आंग्लविद्याविभूषित तरुण पाहिला. मला त्या स्वप्नाचा अर्थ कळेना. पण काशीशी त्याचा संबंध आहे हे मी पक्के ओळखले. कालांतराने ते स्वप्न सत्य ठरले म्हणजे मी काशीला संस्कृताध्ययनासाठी आलो व तेथील श्रीरामकृष्ण मिशनच्या हॉलमध्ये स्वप्नात पाहिलेल्या म्हणजेच तद्दृश श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्या फोटोला मी सश्रद्ध प्रणाम केला. मुंजीनंतर मी वैनगंगेच्या तीरावरील पवनी गांवी मराठी शाळेत शिकायला राहू लागलो. येथील मराठी शिक्षण संपवून मी ब्रह्मपुरीला इंग्रजी शिकण्यास गेलो. येथील अँग्लोव्हर्नाक्यूलर स्कूलमध्ये असतांना माझी सुप्त साहित्यिक प्रतिभा झपाटून बहरली. मी मराठीत काव्यांची रचना करू लागलो व शाळकरी मित्रांच्या आग्रहावरून तिचे काव्यगायनही करू लागलो. मी एक लहानसे पुस्तकालयही चालू केले व 'सचित्र बोंब' ह्या नांवाचे हस्तलिखित दर महि-न्यास काढू लागलो. एवम् मी विद्यार्थीप्रिय पुढारी झालो. चित्रकला व हस्तकौशल मला उपजतच अवगत झाले होते. तेव्हा मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌ची परीक्षा पास होणे माझ्या हातचा मळ होता. तो काळ १९०८ चा होता. वंगभंगाची चळवळ देशाला राष्ट्रीय चैतन्याने कर्तव्यपरायण करीत होती. **लालबालपाल ह्या त्रिमूर्तीची** नावे भारतीयांच्या जिव्हांवर होती. अशा चैतन्यदायक काळात माझ्या कानात देशभक्तीचे वारे जे शिरले ते शिरलेच. मी 'सचित्र बोंब' मधून लो. टिळकांच्या चतु:सूत्रीचा म्हणजे स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ह्यांचा कळत न कळत आवेशाने प्रचार करू लागलो. देशभक्तीच्या भरात मी त्यावेळी प्रतिज्ञा केली ती अशी:——

'प्रतिज्ञां कृतवान्याव
त्स्वतन्त्रं स्यान्न भारतम् ।
नोपानहं प्रयोक्ष्ये ऽपि
स्वादिष्ये न च शर्कराम् ।।'
(वि. आत्मचरितम्)

'जोपर्यंत माझा प्रिय भारत देश स्वतंत्र होत नाही तोपर्यंत मी साखर खाणार नाही व जोडा वाप-रणार नाही.' १९०९ साली कुमार वयात केलेली ही

प्रतिज्ञा मी १९४७ साली स्वजन्मसार्थक झाल्याच्या समाधानात मोडली कारण ह्याच देही व ह्याच डोळा भारत स्वतंत्र झालेला पाहण्याचे समाधान मी अनुभवले. माझ्या तत्कालीन चळवळीचा अपेक्षित परिणाम झाला, नव्हे तो भोगण्यासाठीच मी आवेशाने चळवळ करीत होतो. १९०९ च्या मध्यात तत्कालीन मध्यप्रांत वऱ्हाडच्या डायरेक्टर साहेबांनी मला शाळेतून रस्टिगेट केल्याचे परिपत्र काढले.

'अण्णाभादककरोपाह्वो विद्यार्थी विद्वषन् नृपम् ।
कुत्रापि पाठशालायां शिक्षां नाजितुमर्हति ।।'
(वि. आत्मचरितम्)

'अण्णा भादककर नावाच्या विद्यार्थ्याला शाळेतून काढण्यात येत आहे. यापुढे तो कुठल्याही सरकारमान्य शाळेत प्रवेश घेण्यास अपात्र आहे.' अशी राजाज्ञा निघाल्यामुळे माझ्या शिक्षणाची दारे एकदम बंद झाली. पण माझा धीर खचला नाही. आता मी इंग्रजांबरोबर त्यांच्या इंग्रजी भाषेचाही तिरस्कार करू लागलो. तेव्हा अल्पावधीतच संस्कृताध्ययनासाठी काशीला जाण्याचे मी ठरविले. माझ्या घरची स्थिती फारच साधारण होती. वडील भावांची इच्छा असूनही ते दर महिन्याला पांच रुपये पाठविण्याचे आश्वासन देऊ शकले नाही. त्यांनी कसेबसे प्रवास खर्चासाठी वीस बावीस रुपये दिले व ते थंडीचे दिवस असल्यामुळे घरची दोन फाटकी कांबळं दिली. श्रीकाशी-विश्वेश्वरावर अचळ श्रद्धा ठेवून व स्वप्रयत्नांवर विसंबून मी काशीकडे प्रयाण केले. यथाकाल काशीला पोहचलो. गंगेच्या काठावरील नागपूरकर भोसल्यांच्या लक्ष्मीमंदिरातील धर्मशाळेच्या अंधाऱ्या तळमजल्यात मी राहू लागलो. जवळच्याच संस्कृत पाठशाळेत प्रवेश घेतला व अध्ययनास तनमनधनाने भिडलो. लवकरच जवळची पुंजी संपली तेव्हा भोसल्यांच्या अन्नसत्रात एकवेळा म्हणजे दुपारी जेवण्याची सोय झाली. श्री विश्वेश्वराला जणू काय माझी परीक्षाच पाहण्याची इच्छा होती. काही महिन्यांतच भोसल्यांचे अन्नछत्र सोडावे लागले. मग काय ?

'भिक्षावृत्ति समालम्ब्य
समस्या सापि पूरिता ।
कठिनं परमेतन्मे
व्रतं तु समभासत ।।' (वि. आ. च.)

अशा रीतीने भिक्षावृत्तीचा आश्रय घेऊन जेवण्याची समस्या सोडविली. पण अध्ययनात खंड पडू दिला नाही. पाठशाळेतील शिक्षण यशस्वी रीतीने संपवून येथील प्रसिद्ध 'क्वीन्स कॉलेजमध्ये' प्रवेश मिळविला. १९१६ मध्ये लखनौला कॉंग्रेसमध्ये यश संपादून कै. वा. लो. टिळक कै. वा. दादासाहेब खापर्ड्यांबरोबर काशीला आले होते. त्यांचे जे भव्य स्वागत काशीला झाले त्यासाठी मी अविश्रांत श्रम घेतले. लवकरच महामहोपाध्याय सर गंगानाथ झा क्वीन्स् कॉलेजचे पहिले भारतीय प्रिंसिपाल म्हणून नियुक्त झाले. त्यांच्या प्रीतीला व कृपेला मी पात्र ठरलो. १९२१ मध्ये असहयोगाची चळवळ उफाळली. माझी स्वराज्यप्रीतीही बळावली. तेव्हा ह्या आंदोलनात मीही रंगलो. पण १९०९ ची तीव्रता व आवेश नव्हता. सहा सात महिन्यात चळवळ थंडावली व मी महामहोपाध्याय गंगानाथ झा यांच्या सांगण्यावरून स्थानिक वसंत कन्या महाविद्यालयात संस्कृतचा प्रवक्ता होण्याचे स्वीकारले. ह्याच महाविद्यालयात चाळीस वर्षे अखंड अध्यापनाचे काम करून मी १९६२ मध्ये सेवानिवृत्त झालो. अध्यापनाचे काम करीत असतांनाच मी शिक्षक म्हणून मॅट्रिक, इंटर, बी. ए. व एम्. ए. च्या परीक्षांना बसून त्यांत स्पृहणीय यश संपादन केले. मी काशी हिंदू विश्वविद्यालयाचा ट्रिपल (तीन विषयात) एम्. ए. झालो. ते विषय आहेत, संस्कृत, तत्त्वज्ञान, प्राचीन इतिहास व संस्कृती. म्हणून मी म्हणतो.

'यावद्विषयबोधेन
स्वप्रयत्नफलेनयत् ।
आसादितं समाधानं
नास्ति तस्योपमाभुवि ।।'
(वि. आ. च.)

मला अनुरूप पत्नी मिळाली व एक मुलगीही झाली. कन्येचे नाव कादंबरी असून ती स्थानिक इंटर कॉलेजात संस्कृतची अध्यापिका होती. मला सुयोग्य डॉ. जावईही मिळाला व नातवंडांचे सुखही अनुभवण्यास मिळाले. माझ्या अध्यापनातील यशाने मात्र माझा पुरा सूड घेतला. कारण वसंत कॉलेजातून सेवानिवृत्त होताच मला स्थानिक आर्यमहिला डिग्री कॉलेजात अध्यापनाचे काम अत्याग्रहामुळे स्वीकारावे लागले. तेथे तीन चार वर्षे काम करून विश्रांती घेतो न घेतो तोंच श्रीआनंदीमाई कडून निरोप आला की तुम्हाला आमच्या आश्रमातील साहित्याचार्य व वेदान्ताचार्य

कक्षातील विद्यार्थिनींना शिकविण्याची मी विनंती करते. श्री आनंदीमाईची विनंती म्हणजे संतीणीची कृपा समजून मी आठ वर्षांपासून हे अध्यापनाचे काम करीत आहे." येथे कै. वा. भांडारकरांचे आत्मचरित्र संपते. त्यांच्या दैवाचा काय सुयोग होता पाहा की हे अध्यापनाचे काम करण्यास ते १३–४ ला सकाळी चालून गेले असतांना त्यांना सुखाने व अनपेक्षितपणे क्रूर काळाने अलगद उचलून नेले. त्यांच्या आत्म-चरित्राचा वरील सारांश वाचून कुणीही सुज्ञ वाचक असेच म्हणेल की 'स्वप्रयत्नांच्या बळावर माणूस आपले जीवन कसे सार्थक करू शकतो ह्याचे हे आत्म-चरित्र ज्वलन्त आदर्श आहे.' स्वजन्माचे सार्थक झाल्याचे समाधान मानणाऱ्या नव्हे अनुभवणाऱ्या विरळ्या सज्जनांपैकी ते एक होते. कारण 'वि. आ. च.'च्या 'प्राक्कथनम्' मध्ये ते लिहितात,

श्री काशीमातः सोऽहं विद्यार्जनपरोऽनिशम् ।
चरन् माधुकरीं वृत्तिमेकः कम्लल सम्बलः ।।
आक्रमानन्तरायाणां सारयित्वा प्रयत्नतः ।
सफलो जीवने जातो यथाशक्ति क्रमात्कथम् ।।

तेव्हा अशा रीतीने आत्मसमाधानाचे सुख भोगणाऱ्या कवीच्या काव्यसृष्टीचे आपण विहंगमावलोकन करूं या.

'वैदर्भी रीतीचा रम्य आविष्कार'

परमार्थोन्मुख संसार करणाऱ्या प्रो. भांडार-करांनी 'परार्थासाठीच' काव्याची सृष्टी केली. राष्ट्राचा उदय सत्साहित्याने होतो असे त्यांचे इतिहा-साचे सखोल अध्ययन करून बनलेले मत होते. ते आपल्या 'श्री स्वामिविवेकानन्द चरितम्' नामक महाकाव्याच्या 'प्राक्कथनम्' मध्ये म्हणतात,

'राष्ट्रोदयः सुसाहित्य निर्माणमवलम्बते ।
युवानो येन जायेरन्युक्तमार्गानुसारिणः ।।'

म्हणून स्वतंत्र भारताच्या नवोदित पिढीला राष्ट्र-कार्यार्थ उत्प्रेरित करण्याचा उदात्त हेतूने त्यांनी वरील महाकाव्याची वीररसप्रधान रचना केली. तसेच 'श्री रामकृष्णगीता' नामक ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते मोकळ्या वऱ्हाडी स्वभावाने सांगतात

'श्री काशीमागतेनाथ कृतोऽल्पोऽयं समुद्यमः ।
स्वसन्तोषकृते ऽन्येषां सेवार्थंच यथामति ।।'

शुद्धात्म्यालाच खऱ्या स्वसंतोषाचा आनंद प्राप्त होतो. शुद्धात्म्याचा आनंद सर्वात्म्यांचा आनंद असतो. अर्थात् ज्याला आत्मानुभूती झाली आहे तोच अशा आत्मा-नंदात सहभागी होऊ शकतो. अन्य नाही. म्हणूनच हिंदी साहित्याचे कविकुलगुरु संत तुलसीदास यांनी उच्चरवाने संस्कृत वाणीत घोषीत केले की :

'स्वान्तः सुखाय तुलसी रघुनाथगाथा ।
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ।।'

कवीचे काव्य प्रयोजन जितके उदात्त असते तितकाच त्याचा काव्यविषयही महान् असतो. म्हणूनच कै. वा. भांडारकरांनी सोडमुंजेच्या रात्री दृष्टान्तगत झालेल्या महान विभूतींना आपल्या काव्यसृष्टीचे विषय बनविले. ते मराठी भाषेतही काव्यरचना करीत व मला रसिक श्रोता म्हणून ऐकवीत. पण संस्कृत साहित्याची भारतातील नव्हे तर जगातील निर्विवाद्य प्रतिष्ठा लक्षात घेता, त्यांनी गीर्वाण वाणीचाच आश्रय घेतला. पण असे करण्यात आपल्या भाषैक–पांडित्याचे भडक प्रदर्शन करण्याचा त्यांचा हेतु नव्हता. ते 'श्रीराम-कृष्णगीता' नामक काव्याच्या प्रस्तावनेत म्हणतात :

'आदितोऽत्रान्तपर्यन्तं देवस्य सरला पुनः ।
बालबोधकरीवाणी संस्कृतेऽनुसृता मया ।।'

म्हणजे त्यांनी कटाक्षाने आबाळसुबोध संस्कृत भाषेत रचना केली. त्यांनी पांडित्य प्रदर्शनार्थ किंवा प्रस्तापनार्थ दीर्घ व कूटस्थ समाजयुक्त गौडी व पाञ्चाली रीतीमध्ये रचना न करता प्रसाद, सुकुमारता व अर्थसौंदर्यादि गुणांनी युक्त अशा वैदर्भी रीतीचा आश्रय घेऊन बहुजनांना आल्हाद व उद्‌बोधन देणारी काव्ये रचिली. म्हणूनच माझ्यासारख्या हाडाने वऱ्हाडी असणाऱ्या रसिकाला कै. वा. अण्णाजीविषयी द्विगुणित आपुलकी व आदर वाटतो. याच हेतूने मी त्यांना खरा वैदर्भीय कवी म्हणतो. ते जसे जन्माने वैदर्भीय आहेत तसे कर्माने व काव्यरचनेच्या रीतीनेही वैदर्भीयच आहेत. त्यांच्या काव्यसृष्टीची प्रासादिकता केवळ अनु-भवनीय आहे. लेखाची मर्यादा लक्षात घेता 'स्थाली-पुलकन्यायाने' आम्ही तिचे संक्षेपाने विवेचन करतो. 'श्री रामकृष्णगीता' काव्याच्या 'अवतार तत्त्वम्' (प्रथमोऽध्यायः) मध्ये परमेश्वर नररूपाने केव्हा व कसे अवतार धारण करतो ह्याचे विवेचन करतांना ते लिहितात :–

नानारूपो नैकलीलो विश्वलीलो जगत्प्रभुः ।
ईशलीलो देवलीलो नरलीलोऽपि तादृशः ।।२।।

अन्वेषणीयो मनुजेषु देवो
ह्यात्राधिकं तस्य भवेत् प्रकाशः।
यत्रोत्कटं प्रेम तथोच्च भक्ति-
र्ज्ञेयः स तत्रैव नरेऽवतीर्णः ।।३।।

जेव्हा जगत्प्रभू नररूपाने लीला करतो तेव्हा त्यास कसे ओळखावे हे किती प्रासादिक शैलीत ह्यात सांगितले आहे. ज्या व्यक्तीत उत्कट जीव–प्रेम व भक्ती वसते तीच व्यक्ति परमेश्वराचा अवतार आहे असे किती प्रांजल भाषेत कथन केले आहे ! श्रीरामकृष्ण परमहंस (पूर्वाश्रमीचे गदाधर) अशा व्यक्तींपैकी होते म्हणून लोक त्यांना अवतार म्हणत असे कवीला सांगायचे आहे. ह्याच काव्यग्रंथातील ' ईश्वर दर्शनम् ' नामक द्वितीयोऽध्यायात कवी लिहितात –

ईश्वरे जायते प्रेम नित्यं निष्कामकर्मणा ।
क्रमेण तत्कृपालाभं प्रभुः प्राप्तौ भवत्यसौ ।।१५।।

' निष्काम कर्मानेच परमेश्वराविषयीचे प्रेम वाढते. पुढे यथाकाल त्याच्या कृपेला पात्र ठरून त्याचे दर्शन होते ' इत्यादी. पुढे भोगासक्त वाचाळ पंडिताला गृध्राची उपमा देतांना कवी म्हणतात–

मुखेन दीर्घ वक्तृत्वं दृष्टिः काञ्चन भोगयोः
गृध्रो नभासि यात्युच्चैः कुणयासक्तलोचनः ।।

पुढे सातव्या अध्ययात गृहस्थाश्रमाचे साफल्य ईश्वरस्मरणात आहे हे कवीने उडणाऱ्या पक्षाची समर्पक उपमा देऊन सांगितले आहे ते वाचा.

आकाशे शकुनिश्चरत्यथ घरानीडे मनः स्थापयन् ।
कुर्वंस्तत्स्मरणं विवेहि विधिवत् संसार कार्याण्यपि ।।

तेराव्या अध्यायात ' द्विविधो योगः ' संबंधी कवी कसे सुलभ विवेचन करतो ते पाहा :–

कर्मयोगो मनोयोगो योगोऽयं द्विविधोमतः ।
येन केनापि मार्गेण साध्या जीवाशी वैकता ।।३।।

लो. टिळकांनीही ' साधनानामनेकता ' प्रतिपादून मोक्षप्राप्तीवर भर दिला होता त्याचाच प्रतिध्वनि वरील कवितेत आहे; साधनापेक्षा साध्यावर अधिक भर दिलेला आहे. हे प्रौढ चिंतनपर मनाचे प्रतीक आहे.

आता आपण त्यांच्या ' श्री स्वामिविवेकानन्द-चरितम् नामक महाकाव्यम् ' विहंगामवलोकन करू या.

वैदर्भी रीतीचे महाकाव्य :– ' श्री स्वामी विवेकानन्द चरितम् नामक महाकाव्यम् ' ची रम्य रचना करून कै. वा. भांडारकरांनी संस्कृत रसिकांना अवर्णनीय आल्हाद दिला आहे. ह्या महाकाव्याचे अठरा सर्ग आहेत. महाकाव्याच्या नावात देखील बरोबर अठराच अक्षरे आहेत. ह्यात एकूण ११२२ श्लोक असून ते भिन्न व अनुकूल वृत्तांत रचिले आहेत. प्रथम सर्गाचे नाव ' संकल्पविकल्प ' असून त्यात नरेन्द्र दत्तांच्या जन्मापासून तों त्यांच्या बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होई-पर्यंतच्या संशयी, अनिश्चित व पाश्चात्य विचारांनी भ्रांत झालेल्या मनाचे मार्मिक वर्णन आहे. त्यांच्या (स्वामी विवेकानंदाच्या) जन्मकुलाचे वर्णन किती सालंकृत आहे तें पाहा :–

' श्रद्धान्विते दत्तकुले प्रसूतः सुतो नरेन्द्रः स्मरणीय कर्म ।
रत्नाकराच्छान्त जलादुदीर्णं रत्नं यथा
स्यात्कमनीय कान्ति ।।'

ह्यातील दृष्टान्त किती समर्पक व सुंदर आहे. उपजाति वृत्तातील ही रचना किती प्रासादिक आहे ? पुढे पाश्चिमात्य तत्वज्ञानाने तरुण नरेन्द्राला कसे भ्रमिष्ट केले ते वाचा :–

' डार्विन्नुपज्ञो जगदुद्भवे स्यादुत्क्रान्तिवाद
किमुनिर्विवाद ।
अज्ञेयता नश्वर वस्तुनो वा सिद्धान्तिता स्पेन्सर
पण्डितेन ।।
सिद्धिस्तथाहो अहमः प्रसिद्धा डेकार्टगीता
किमुयुक्तियुक्ता ।
द्वंद्वात्परो वा परतत्त्व बोधो हेगल्बुधोक्तः
सकलानुकूलः ।। '

' डार्विनचा शुद्ध भौतिक विकासवाद अभ्यासून, स्पेन्सरच्या अज्ञेयवादाचे सखोल अध्ययन करून, डेकार्टेच्या म्हणण्याचे व हेगेलच्या डायलिक्टिकचे मनन करून प्रखर जिज्ञासू नरेन्द्राचे मन कसे अनिश्चयी झाले होते हे वरील श्लोकांत वर्णिले आहे. पुढे चवथ्या सर्गात म्हणजे अनीश्वरवादी नरेन्द्राने श्रीरामकृष्णपरमहंस यांचे शिष्यत्व पत्करल्यानंतर त्यांचे जे साहचर्य वाढले त्याचे वर्णन कै. वा. भांडारकर किती समर्पक दृष्टान्तांनी करतात ते वाचा :–

नित्यं दिनेशेन सहांशुजालं सौरभ्यमास्ते
कुसुमेन सार्धम् ।
माधुर्यमेवं सितयासमेतं शुक्लत्त्वमूधस्य समन्वितं च ।।

' किरणसमूहाशिवाय जसा सूर्य असूच शकत नाही, सुगंधाशिवाय जशी आपण फुलाची कल्पना करू

शकत नाही, माधुर्याविचून साखर सापडत नाही, आणि पांढऱ्या रंगाशिवाय दूध राहू शकत नाही तसे श्रीरामकृष्ण परमहंस व श्री विवेकानन्द यांचे साहचर्य होते.' नूतन ईश्वरवादी नरेन्द्राचे वडील लवकरच स्वर्गवासी झाले तेव्हा त्यांची शोकसंतप्त माता भुवनेश्वरी त्यास रागाने विचारते :–

शोकाभिभूता भुवनेश्वरी तं
निजात्मजं जातरुपा जगाद ।
क्ववा तवेश: सहसा प्रयातो
यतो विधत्ते न सहा सहायम् ।।

'अरे नरेन्द्रा, तुझा तो परम दयाळू ईश्वर जेव्हा क्रूर काळाने तुझ्या पित्यावर घाला घातला तेव्हा कुठे दडून बसला होता ?' पुढे 'भारत भ्रमणम्' नावाच्या आठव्या सर्गात स्वामी विवेकानंदांचे पुण्याला आगमन वर्णिले आहे ते असे :–

वसन्निवासे तिलकस्य कानिचिद् दिनानि
दीनोद्द्युति लीनमानस: ।
स्वमातृभूप्रेम समाजसेवनोपदेशतोऽभू-
दखिलादरस्य ।।

स्वामीजी पुण्यात लो. टिळकांकडे दोन तीन दिवस होते. त्यांची तेथे दोन भाषणेही झाली. त्यांची दरिद्रीनारायणाच्या सेवेबद्दलची व मातृभूमीच्या दास्यमुक्तीविषयीची कळकळ पाहून ते सर्वांच्या आदरास प्राप्त झाले होते. पुढे ते कन्याकुमारीला गेले व तेथे समुद्रवलयांकित खडकावर ध्यानस्थ बसून त्यांनी अशी प्रतिज्ञा केली.

"ततः स वामेश्वर वर्त्मना मुनिः कुमारिकामन्दिर-
मेत्य सन्नतः ।
ब्रवीति मातस्तृषितो न मुक्तये त्वदेकसेवात्म-
कमस्ति यद्व्रतम् ।।'*

'स्वामीजी रामेश्वर मार्गाने कन्याकुमारीला गेले व तेथील समुद्रवलयांकित खडकावर ध्यानमग्न होऊन त्यांनी मातृभूमीच्या सेवेची भीष्मप्रतिज्ञा घेतली व स्वत:साठी काहीही न करण्याचा निर्धार केला. 'धर्मसभा' नामक दहाव्या सर्गात स्वामी विवेकानन्दांचे शिकागो येथे भरलेल्या 'सर्वधर्मसम्मेलनात' जे अविस्मरणीय भाषण झाले त्याचे अंशात्मक वर्णन करणारे स्रग्धरावृत्तातील खालील दोन श्लोक आस्वादनीय आहेत :–

हं हो ! सौभाग्यवन्त: प्रियतर भगिनी
भ्रातरोऽमेरिकायां
दूरादभ्यागतो व: प्रथित पृथुयश: स्त्रग्धरायां
धरायाम्
संदेशं चेतनार्दि श्रुतिषु निगदितं श्रावयिष्यन्
कृतार्थो ।
मन्येऽस्मज्जन्मधाम प्रभवति विलसद् गौरवा
भारती भू: ।।
पावित्र्यं निर्मलत्वं सुकृतिततिरतिः सर्वभूतानुकम्पा
धर्मस्यैकस्य सम्पन्न खलु समभवत् किन्नु सर्वत्र
सन्त: ।
अन्ये लुप्यन्तु धर्मा मम भवतु पुनः सर्वधर्मप्रधानो ।
यद्येवं कोऽपि वाञ्छत्यखिलजनदयापात्रमेतं
धिगस्तु ।।

'फुलांनी विनटलेल्या ह्या सुंदर अमेरिकेतील माझ्या प्रिय बंधुभगिनींनो ! प्राचीन काळापासून अध्यात्माचं मूळ स्थान मानल्या गेलेल्या दूरवर्ती भारतभूमीच्या ह्या नम्र वक्त्याचा वेदान्तपर संदेश ध्यानपूर्वक ऐका. मनोवाक्कायशुद्धि, आचारविचाराची निर्मलता, पुण्याचरण व सर्वभूतांविषयी प्रेम इत्यादी सद्गुण कुठल्याही धर्माची मिरास नाही. ह्यांना जगातील सर्व धर्मांनी मान्यता दिली आहे. जी व्यक्ति अन्य धर्मांचा उच्छेद करून, स्वधर्माची गुढी उभारू इच्छिते, ती व्यक्ति धि:कारास पात्र आहे.' स्वामीजींनी पुढे वेदोपनिषद प्रणित हिंदु धर्माचे जे सार सांगितले ते ऐका :

'स्नेह: समग्रसंसारे स्थित प्राणिषु निर्मल: ।
उदारता तथा तेषु धर्मस्य निकष: स्मृत: ।।
एतादृशो महान् धर्मो वेदोपनिषदीरित: ।'

'जगातील यच्चयावत् प्राण्यांवर प्रेम करणे व उदारतेने जीवन जगणे, हेच वेदप्रणित धर्माचे महान् निकष आहेत. लेख लांबत चालला आहे तेव्हा देशप्रेमी कवी भांडारकरांनी नवोदित पिढीला स्वामी विवेकानन्दा द्वारे जो उर्जस्वल उपदेश देवविला त्याचा मार्मिक अंश सांगून हा लेख संपवितो. स्वामी विवेकानन्द तरुणांना उपदेश देतात:—

'त्यक्तनिद्रा: समुत्थायारभ्वं कार्यमुत्तमम् ।
भवदस्तगतं सर्वं सूच्यते केवलं मया ।।
संघशक्ति विनाधत्वे कार्यं किंचिन्न सिद्यति ।
अस्माभि: संहतैर्भाव्यमतो नि:स्वार्थ बुद्धिभि: ।।

उत्थाय धारय धुरं त्वरितं जगत्यां
जानासि जीवितमिदं क्षणभंगुरं ते ।
जातोऽसि यत्किमपि लक्ष्यभवेत्वदीयं
जाताः स्थिताः कति न पशवो म्रियन्ते ।। '

' तरुणांनो निद्रा सोडून उठा, जागे व्हा व कार्यासाठी कंबरा कसा. तुमच्या दृढ प्रयत्नाला सर्व काही साध्य आहे. एवढे ध्यानात असू द्या की संघशक्तीशिवाय महान कार्याची सिद्धी होवू शकत नाही. म्हणून तरुणांनी नि:स्वार्थ बुद्धीने संघटित होऊन कार्याला लागावे. मानवी जीवन क्षणभंगुर आहे तेव्हा प्रत्येक क्षणाचा सत्कार्यासाठी विनियोग करा. लक्षात ठेवा की पशूंप्रमाणे ध्येयहीन जीवन जगण्यासाठी तुम्ही जन्मला नाही.' इत्यादी. कविवर कै. वा. प्रा. भांडारकरांनी अशा रीतीने ' शुद्ध परार्थ दृष्टीने ' समाजोपकारी काव्यांची सरस रचना करून भावी पिढयांना उपकृत करून ठेवले. त्यांची काव्यसृष्टी जितकी सालंकृत आहे तितकीच रसाळही आहे. ती जितकी विशुद्ध आहे तितकीच प्रेरणादायक देखील आहे. म्हणून मराठी संतकविकुलशेखर ज्ञानेशांची पुढील ओवी त्यांच्या काव्यसृष्टीला लागू पडते :–

' जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती ।
जैसी लावण्यगुणकुलवती । आणि पतिव्रता ।। '

भाषण संपल्या नंतरचा जन्म

विजय दर्डा

तेव्हा
कळले मला
तो शाहाणा आहे
जेव्हा
त्याचे भाषण संपले
भर चौकात.
काल
पर्यंत तो अंधारात होता
आज
त्याचा जन्म झाला
लोक बदलत असल्याच्या जाणिवेने
तो
असा उभा झाला.

' युगवाणी ' मासिकासंबंधी माहिती

१. *प्रकाशन स्थळ*	विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२.
२. *प्रसिद्धीचा नियतकाल*	मासिक परंतु जोड अंक निघतात.
३. *मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पता*	श्या. श्री. वनहट्टी, भारतीय, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर–१२.
४. *प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता*	गो. स. देहाडराय, भारतीय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर–१२.
५. *संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता*	डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर, भारतीय, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.
६. *वृत्तपत्राची मालकी*	विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२.

मी, गोपाळ सदाशिव देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ जाहीर करतो की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

गो. स. देहाडराय
प्रकाशक
सरचिटणीस, वि. सा. संघ, नागपूर १२.

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (दि. २१ डिसेंबर १९७६ ते १५ मार्च १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन :

१.१. **विश्वस्थांची सभा** दि. ८-१-७७ ला झाली. त्या सभेत वि. सा. संघाच्या वास्तूत आणि धनवटे रंगमंदिरात केलेल्या दुरस्त्या आणि सुधारणाची माहिती देण्यात आली. पुढे करावयाच्या दुरस्त्या आणि सुधारणांचा विचार करण्यात आला.

१.२. **शासकीय अनुदान** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून तीन वर्षाचे थकित अनुदान रुपये २९४३० /– मंजूर झाले.

२. सांस्कृतिक कार्यक्रम :

२.१. **संघाचा चौपन्नावा वर्धापन दिन** मकरसंक्रातीच्या शुभ दिवशी दिवशी दि. १४-१-७७ ला साजरा करण्यात आला. आरंभी सौ. जयश्री समुद्र यांनी शारदास्तवन केले. अध्यक्षस्थानी म. म. डॉ. मिराशी होते. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' ह्यांनी प्रास्ताविक भाषण करून डॉ. भवानीशंकर नियोगी, डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. श्री. भा. वर्णेकर, श्री. बा. रा. मोडक, श्री. आनंदराव जोशी ह्यांच्या कार्याचा गौरव केला. नतर डॉ. मिराशी यांच्या हस्ते डॉ. नियोगी यांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला. संघाध्यक्षांनी डॉ. मिराशी, डॉ. वर्णेकर, श्री. बा. रा. मोडक ह्यांचा शाल व श्रीफल अर्पण करुन सत्कार केला. श्री. आनंदराव जोशी उपस्थित राहू शकले नाहीत.

ह्या वर्षी पीएच्. डी. ची उपाधी प्राप्त करणारे सर्वश्री वसंत वऱ्हाडपांडे, मधुकर रामदास जोशी, श्याम सोनारे यांना शाल व श्रीफळ अर्पण करून त्यांचा गौरव करण्यात आला आणि त्यांची स्वतःच्या प्रबंधाविषयी भाषणे झाली. पीएच् डी. प्राप्त चंद्रकांत घांडे उपस्थित राहू शकले नाहीत.

डॉ. नियोगी आणि डॉ. मिराशी ह्यांची आशीर्वादपर भाषणे झाल्यानंतर सरचिटणीस श्री. देहाडराय यांनी सर्वांचे आभार मानले आणि सर्व उपस्थितांना तिळगूळ अर्पण करून वर्धापन समारंभाची सांगता झाली.

रात्रौ ९ वाजता सौ. कल्याणी देशमुख आणि श्री. गिरीश वझलवार यांचे गायन, तसेच श्री. अरविंद गजेंद्रगडकर यांचे बासरीवादन झाले. पेटीची साथ श्री. बबनराव आठले आणि तबल्याची साथ श्री. गोपाळराव वाडेगावकर यांनी केली.

२.२. **कै. इंदिराबाई खरे – शालेय वक्तृत्व स्पर्धा** दि. २३ – १ – ७७ ला सकाळी ९ वाजता टिळक सभागृहात आयोजित करण्यात आली. **विषय** —'मला आवडलेले पुस्तक' हा होता. दहा शाळेतील एकोणवीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला. निकाल येणेप्रमाणे :—

(१) कु. विशाखा निमखेडकर, हडस हायस्कूल, नागपूर, प्रथम पुरस्कार रु. ५१ /–

(२) कु. माधुरी साठे, सरस्वती विद्यालय, नागपूर, व कु. शुभांगी सांबरे, लोकांची शाळा, नागपूर यांना द्वितीय पुरस्कार विभागून रु. ३१/– (३) कु. साधना जोग, सोमलवार हायस्कूल, नागपूर तृतीय पुरस्कार रु. २१/–

स्पर्धेचे परीक्षक श्री दिनकरराव देशपांडे, प्रा. सुधीर पसारकर व डॉ. आशा सावदेकर होते. संध्याकाळी डॉ. कुसुमताई वांकर यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

२.३. **गडकरी स्मृतिदिन** – दि. २३–१–७७ ला सायंकाळी ७ वाजता साजरा करण्यात आला. श्री मुरलीधर आढाऊ, 'गोविंदाग्रजानुयायी' भोपाळ, यांचे "गडकरी साहित्यात त्यांचे आत्मचरित्र" या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षीय समारोपात आ. रा. देशपांडे 'अनिल' यांनी गडकऱ्यांच्या कवितेतील प्रेमविषयक उल्लेखासंबंधी विवरण केले.

२.४. **बेहेरे व्याख्यानमाला** – दि. २७ व २८–१–७७ ला पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक आणि सुप्रसिद्ध समीक्षक, सदाशिव शिवराम भावे, यांनी 'काव्य तत्त्व आणि निर्मिती, आस्वाद आणि समीक्षा' या विषयावर दोन व्याख्याने देऊन गुंफिली. तिसरे व्याख्यान अकोल्यास, तेथील शाखासभेतर्फे दि. २९।१।७७ झाले.

२.५. **अमेरिकन कवी डॉ. विल्यम्स यांचे काव्यवाचन** : सुप्रसिद्ध अमेरिकन कवी डॉ. मिलर विल्यमस् यांनी वि. सा. संघाला दि. ८–२–७७ ला दुपारी ४ वाजता सपत्निक भेट दिली. त्यांच्यासह कु. जोन डिके, असोसिएट डायरेक्टर, यु. एस. आय. एस. मुंबई ह्या होत्या. नागपूर विद्यापीठातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. शास्त्री यांनी कवीची ओळख करून दिली. नंतर डॉ. विल्यमस् यांनी आपल्या निवडक कवितांची प्रोजेक्टरच्या सहाय्याने पडद्यावर चित्रे पाडून त्या वाचून दाखविल्या. कार्यक्रमानंतर पाहुण्यांना संघाची वास्तु दाखवून कार्याचा परिचय करून देण्यात आला.

३. शोक सभा

सौ. उषा कोलते यांचे दि. २।१।७७ ला विशाखापट्टम येथे आकस्मिक निधन झाले. ही वार्ता कळताच शोकसभा आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सौ. उषाताई कोलते ह्या लेखिका आणि सुप्रसिद्ध समाजसेविका होत्या. त्यांचे पती डॉ. भाऊसाहेब कोलते ह्यांच्या आणि सर्व परिवारांच्या दुःखात विदर्भ साहित्य संघ सहभागी आहे.

४. संगीत समिती (स्वरमंडळ)

श्री. मा. ज. कानेटकर यांचे दि. ९।१।७७ ला "संगीत आणि भजन" ह्या विषयावर प्रात्यक्षिकांसह भाषण झाले.

५. सन्माननीयांच्या भेटी

ब्रम्हपुरी येथील आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य चिं. ग. करंदीकर यांनी संघाला २–१–७७ ला भेट दिली.

कविवर्य श्री हेमचंद्र 'सुमन', नवी दिल्ली येथील साहित्य अकादेमीचे सहाय्यक सचिव, यांनी दि. १९–१–७७ ला संघाला भेट दिली. त्याप्रसंगी हिंदी आणि मराठी साहित्यातील प्रश्नासंबंधी अनौपचारिक चर्चा झाली.

६. चित्रकला समिती :

उज्जैन येथील पांच चित्रकारांचे, निरनिराळे आशय व्यक्त करणाऱ्या रेखाचित्रांचे प्रदर्शन

दि. २३ ते २५ डिसेंबर ७६ ला वि. सा. संघाच्या विद्यमाने भरविण्यात आले. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांनी त्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

७. नाट्यसमिती

७.१. डावरे एकांकिका स्पर्धा : कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा दि. ६, ७ व ८ जानेवारी ७७ या तीन दिवशी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत १४ एकांकिका सादर करण्यात आल्या. सुभाष मंडळाच्या "सायलेन्स खटला चालू आहे." या एकांकिकेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. दुसरा क्रमांक रंजन कला मंदिराच्या 'कॅम्प' या एकांकिकेला देण्यात आला. मुक्तिवाहिनीच्या 'व्हिएटनाम' या एकांकिकेला उत्तेजनार्थ तिसरे परितोषक मिळाले. वैयक्तिक अभिनयासाठी क्रमांक देण्यात आले ते असे :– **प्रथम क्रमांक** – सुभाष मंडळ, नागपूर यांनी सादर केलेल्या 'सायलेन्स खटला चालू आहे' मधील 'शिरस्तेदार' या पुरुष–भूमिकेबद्दल श्री. महेश पातुरकर यांना आणि राहूल क्रीडा मंडळ, नागपूर यांनी सादर केलेल्या 'पंख' मधील 'माधुरी' या स्त्री–भूमिकेबद्दल कु. नीता गुप्ते यांना.

द्वितीय क्रमांक : कलातरंग, नागपूर यांनी सादर केलेल्या 'दी लेसन' मधील 'प्रोफेसर' ह्या पुरुष–भूमिकेबद्दल श्री. प्रकाश लुंगे यांना आणि आनंद कला निकेतन, नागपूर यांनी सादर केलेल्या 'चक्रव्यूह' मधील 'अश्विनी' ह्या स्त्री–भूमिकेबद्दल आशा वानखेडे यांना.

प्रशस्तिपत्रे : देण्यात आली ती अशी – ज्ञानेश्वर धुमाळ (कॅम्प), सारंग अभ्यंकर (म्हैं), माधव जोशी (येथे बायका मिळतात), श्री. महेश रायपूरकर (म्हैं), श्रीकांत बोरकर (व्हिएटनाम), शशिकांत नारनवरे (व्हिएटनाम), दिलीप ढवळे (कॉमन इव्हिनिंग), स्वाती शाहाणे (कथा दिनूच्या मृत्युपत्राची), शैलजा परांजपे (डॉ. तपस्वी), सुरेश खापेकर (सायलेन्स खटला चालू आहे). सर्वश्री गो. रा. बैतुले, अकोला, राम जाधव, अकोला, भाऊ समर्थ, नागपूर यांनी परीक्षक म्हणून काम केले.

७.२. खोलकुटे आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धा या वर्षी स्पर्धेचे निर्णय येणेप्रमाणे :– **प्रथम क्रमांक** – विश्वेश्वरैय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर यांच्या 'जेव्हा देवाचा खून होतो' आणि **द्वितीय क्रमांक** – इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज, नागपूर यांच्या 'पळा पळा कोण पुढे पळे तो' या नाट्यप्रयोगांना देण्यात आला. वैयक्तिक अभिनयाची प्रशस्तिपत्रे देण्यात आली ती अशी :– **प्रथम क्रमांक** – 'पळा पळा कोण पुढे पळे तो' मधील पुरुष–भूमिकेबद्दल अच्युत पुराणिक यांना आणि 'घेतलं शिंगावर' मधील स्त्री–भूमिकेबद्दल प्रतिभा कुळकर्णी यांना. **द्वितीय क्रमांक** – 'पप्पा सांगा कुणाचे' मधील पुरुष–भूमिकेबद्दल सुरेश डवरे यांना आणि 'पळा पळा कोण पुढे पळे तो' मधील स्त्री–भूमिकेबद्दल कु. निशांत देसाई यांना याशिवाय चंद्रशेखर साल्पेकर, विश्वनाथ सोहोनी, कु. कठाळे, संध्या जोग, प्रतिभा पाठक, कु. तागडे, नीलकांत फुलसंगे, उद्धव वडस्कर आणि किशोर डांगे यांना प्रशस्तिपत्रे देण्यात आली. श्री. भाऊ समर्थ, श्री दिनकर देशपांडे व श्री जानेफळकर यांनी परीक्षकाचे काम केले.

७.३. बालनाट्यस्पर्धा – या वर्षीच्या स्पर्धेत निर्णय देण्यात आले ते असे :– **प्रथम क्रमांक** 'कलातरंग नागपूर' च्या 'राजकन्येची सावली हरवली' आणि **द्वितीय क्रमांक** – 'हिंदुस्थान विद्यालय, नागपूर' च्या 'कावळे' या नाट्यप्रयोगांना मिळाला. वैयक्तिक अभिनयाचा **प्रथम क्रमांक** 'राजकन्येची सावली हरवली' मधील 'बंड्या' या पुरुष–भूमिकेबद्दल मिलींद देशपांडे यांना आणि 'कावळे' मधील 'वहिनी' या स्त्रीभूमिकेबद्दल कु. सुशीला नडीये यांना. **द्वितीय क्रमांक** – 'राजकन्येची सावली हरवली' मधील 'चौफुल्या' या पुरुष–भूमिकेबद्दल श्री सुनील पानसी यांना आणि 'राजकन्या' मधील 'राजकन्येच्या' भूमिकेबद्दल

कु. हर्षा सोहोनी यांना. सौ. शकुंतला फणसाळकर, सौ. संध्या पराते व कु. संध्या जोग, परीक्षक होते.

८. खांडेकर पारितोषिके १९७६

महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या १९७६ मधील कलास्नातक परीक्षांत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणारे परीक्षार्थी येणेप्रमाणे :—

१. कु. उषा पुसय्या नायक — मुंबई विद्यापीठ, मुंबई.
२. श्रीमती वर्षा एम्. सोवनी — एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ, मुंबई.
३. श्री राजेंद्र चंद्रकांत दास — श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. कु. देवयानी दत्तात्रय कुळकर्णी — नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. कु. अमिता रघुराज देशपांडे — मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. श्री बबन महादु महाले — पुणे विद्यापीठ, पुणे.

प्रत्येकाला वि. स. खांडेकर पारितोषक म्हणून रु. १११/— पाठविण्यात आले.

९. गणराज्य दिन :

दि. २६—१—७७ ला सकाळी ९.३० वाजता संघाध्यक्ष श्री आ. रा. देशपांडे 'अनिल' यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला.

१०. शाखासभावृत्त

१०.१. उमरखेड शाखा दि. ६—९—७६ — कै. भाऊसाहेब खांडेकरांना श्रद्धांजली. दि. ८—९—७६ धर्मभास्कर सु. गो. शेवडे ह्यांचे 'महाभारतातील कर्ण' या विषयावर भाषण. दि. १०-१०-७६ शाखासभेची कोजागिरी. दि. २९—११—७६ भाऊसाहेब माडखोलकरांना श्रद्धांजली. दि. ३—१२—७६—'गीताजयंती' निमित्त गीताई व श्रीमद्भगवद्गीता पाठांतरस्पर्धा. दि. २८—१२—७६ — प्रा. भा. श्री. परांजपे ह्यांचे 'समर्थांचा राष्ट्रवाद' ह्या विषयावर भाषण. दि. २०—२—७७ पुणे येथे होणाऱ्या उमरखेडच्या पं. गणपतशास्त्री जोशी ह्यांच्या सत्कार समारंभाला प्रतिनिधी पाठविला.

१०.२. यवतमाळ : महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. अली यावर जंग आणि यवतमाळचे साहित्यिक कै. द. चि. सोमण यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा घेण्यात आल्या. गतवर्षीचे साहित्य अकादेमीचे पारितोषिक 'स्मरणगाथा' ला मिळाल्याबद्दल श्री. गो. नी. दांडेकर यांचे अभिनंदन करण्यात आले.

१०.३. मूर्तिजापूर कै. आमदार प्रतिभा तिडके व्याख्यानमालेत दि. ४ ते १० जानेवारी ७७ पर्यंत व्याख्याने आयोजित करण्यात आली. वक्ते आणि विषय येणेप्रमाणे :— १. श्री. म. य. दळवी 'मराठी साहित्यातील आधुनिक प्रवाह.' २. श्री. बाबा मोहोड 'युवा शक्ती : संकेत आणि दिशा' ३. प्रा. मधुकर केचे 'माझे व्यक्तिचित्र' ४. डॉ. अ. ना. देशपांडे 'ज्ञानेश्वरी' ५. डॉ. शकुंतला खोत 'मराठी साहित्यातील स्त्री' ६. श्री. दि. भा. घुमरे 'भारताचे परराष्ट्रीय धोरण' ७. डॉ. श्याम सोनारे 'श्री. गाडगे बाबा व श्री. पंजाबराव' ८. डॉ. श्रीराम लागू 'माझे व्यक्तिचित्र.'

१०.४. चंद्रपूर : शाखासभेची साधारण सभा ३० जानेवारीला झाली. आरंभी भूतपूर्व अध्यक्ष पं. भगवतीप्रसादजी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नंतर पदाधिकारी निवडण्यात आले, ते असे — अध्यक्ष: डॉ. तु. वि. पत्तीवार, उपाध्यक्ष : श्री. गं. ना. वैरागडे, सरचिटणीस :

श्री. प्रभाकर काटकर, कोषाध्यक्ष: श्री. भगवंत ठाकरे, सदस्य सौ. मंदाकिनी भृगुवार, प्रा. शा. वा. खान, श्री. आ. वि. मुनगंटीवार, श्री. ना. हि. सोनडुले, प्रा. पु. ह. धनकर, श्री. ज. गो. संत, श्री. छगनलालजी खजानची.

१०.५. **ब्रम्हपुरी** : वि. सा. संघाची शाखासभा स्थापन करण्यासाठी अस्थायी समिती नेमण्यात आली. श्री. वसंत देसाई यांना अध्यक्ष आणि प्रा. नरेंद्र पोफळी यांना चिटणीस म्हणून नियुक्त करण्यात आले.

१०.६. **गोंदिया** व्याख्याने आयोजित करण्यात आली त्यांचे दिनांक, वक्ते आणि विषय येणेप्रमाणे– दि. १०–१२–७६, श्री वसंत मून, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती आणि वाङ्मय' दि. ११–१२–७६, प्राचार्य सदाशिव माळी, 'महात्मा फुले व्यक्ती आणि सामाजिक कार्य'. दि. १४–१२–७६, प्राचार्य पी. बी. पाटील 'महाराष्ट्रातील सामाजिक मन्वंतर'. भवभूती रंगमंदिरात शाखासभेच्या विद्यमाने 'राजकारण गेलं चुलीत' ह्या नाटकाचा प्रयोग पुण्याच्या बहुरूपी नाट्यसंस्थेने सादर केला. दि. २२–१–७७ ला प्रा. या. मु. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली कविसम्मेलन झाले. त्याचे संचालन प्रा. कृष्णा चौधरी यांनी केले. त्यात प्रा. पाठक व श्रीमती भागवत, नागपूर, आणि कवि ऋतुराज, धनराज ऊके, श्रीकांत गोडबोले, माणिक गेडाम, डब्ल्यू. कपूर शफक, शिवकुमार शर्मा, शा. अन्सारी, आणि कृष्णा चौधरी यांनी भाग घेतला.

इतर शाखासभांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

साभार पोच

[२१–१२–७६ ते १५–३–७७ पर्यंत युगवाणीला भेटीदाखल आलेली पुस्तके.]

पाप्युलर प्रकाशन, ताडदेव रोड, मुंबई ३४

आनंद वि. वा. शिरवाडकर, ७४, रु. ७.

चक्रावर्त : वसंत कामत. १२०, रु. १०.

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

ऐलपैल आ. ना. पेडणेकर, ११२, रु. ७·५०.

विज्ञान गवाक्ष : पु. ज. देवरस, ११६, रु. ८.

सौंदर्याचे व्याकरण सुरेंद्र बारलिंगे, २२४, रु. २०.

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे ३०

सर्वबोध पद्यगीता : अनुवादक डॉ. ग. श्री खैर. ८ + ७४, रु. २.

सदाचार चिंतनी भाग ४ था चिंतक डॉ. ग. श्री. खैर, ३ + १२७, रु. ५.

इतर प्रकाशने

प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा : डॉ. एस्. एस्. भोसले, प्रकाशक अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, कोल्हापूर २; ३ + ५०८, रु. ३०.

देवर्षि नारद : पां. कृ. सावळापूरकर, हिंदु धर्म संस्कृति प्रकाशन, नागपूर, ८ + २४८, रु. १६.

कुसुमाग्रज गौरव ग्रंथ साहित्य समीक्षा : प्रकाशक सार्वजनिक वाचनालय, नासिक, ४ + ३५९, रु. २५.

युक्तिवादाची उपकरणे प्रा. दि. य. देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, ७५, रु. ५.

अभिव्यक्ती भास्कर गिरधारी, अनमोल प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २, ८ + ९७, रु. १०.

उकंडा माधव डहाळे, शब्दांगार प्रकाशन, महबूबगंज, परभणी, ४५, रु. ५.

सोनेरी पाने शकुंतला खोत, पडगिलवार प्रकाशन, टिळक रोड, महाल, नागपूर २, २ + ९०. रु. ६.

काव्यशास्त्र व संस्कृति प्रा. वा. के. लेले, प्रकाशिका सौ. मालती वामन लेले, दुर्गाकुंड रोड, वाराणसी, २ + २३०, रु. २०.

चिं० त्र्यं० खानोलकर

यांच्या सात पुस्तकांच्या नव्या आवृत्या त्यांच्या प्रथम पुण्यतिथीला, २६ एप्रिल १९७७ रोजी प्रसिद्ध करणार आहोत.

३१ मार्च १९७७ पर्यंत या पुस्तकांसाठी पैसे भरून मागणी नोंदवणाऱ्या ग्राहकांना पुस्तकांच्या किंमतीवर २० टक्के सवलत दिली जाणार आहे.
नोंदणी १ जानेवारी १९७७ पासून सुरू होईल.

पुस्तकाचे नाव	मूळ किंमत रु०	प्रकाशनपूर्व नोंदणीची किंमत रु०
१. **जोगवा** (कवितासंग्रह)	१०·००	८·००
२. '**गणुराया**' आणि '**चानी**' (लघुकादंबऱ्या)	१६·००	१२·००
३. **एक शून्य बाजीराव** (नाटक)	८·००	६·४०
४. **सगेसोयरे** (नाटक)	७·००	५·६०
५. **कालाय तस्मै नमः** (नाटक)	६·००	४·८०
६. **रात्र काळी. . .घागर काळी** (कादंबरी)	२३·००	१८·४०
७. **अजगर** (कादंबरी)	१०·००	८·००
एकूण	८०·००	६४·००

- **संपूर्ण संचच घेतला पाहिजे असे नाही; पाहिजे असलेली पुस्तके निवडून घेता येतील.**
- **प्रमुख शहरांमध्ये ग्रंथविक्रेत्यांकडून प्रती मिळतील.**
  तशी सोय नसलेल्या गावांमध्ये ग्राहकांना पुस्तके आमच्या खर्चाने घरपोच मिळतील.

पैसे भरण्यासाठी केंद्रे

मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४ ◻ बॉंबे बुक डेपो, मुंबई ४ ◻ मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४ व पुणे ३० ◻ आयडियल बुक कंपनी, दादर, मुंबई २८ ◻ विक्रम वितरण, हरिनिवास, शिवाजी पार्क, मुंबई २८ ◻ अभिनव पुस्तक मंदिर, पुणे ४ ◻ रसिक साहित्य, पुणे ३० ◻ इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना, पुणे ४ ◻ उत्कर्ष बुक सर्व्हिस, डेक्कन जिमखाना, पुणे ४ ◻ श्री लेखन वाचन भांडार, लक्ष्मी रोड, पुणे ३० ◻ गजानन बुक स्टोअर्स, मेन रोड, सोलापूर ◻ गुलमोहर बुक डेपो, कोल्हापूर ◻ नागेश बुक एजन्सी, सरस्वती मंदिर, पणजी (गोवा).

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

परिक्षा समिती वृत्त १९७६–७७ (प्रा. माणिक के. बैतुले–परीक्षा संचालक)

परीक्षार्थी प्रगतीपट

वर्ष	शालेय	महाविद्यालयीन	शासकीय	एकूण	वाढ
१९७३–७४	६७०	३३७		१२३९	–
१९७४–७५	१४१८	७१६	११९	२३३३	१०९४
१९७५–७६	२१२६	६८०	१४१	२९४७	६१४
१९७६–७७	२४३५	६६९	११४	३२१८	२७१

आयव्यय प्रगतीपट

वर्ष	आय	व्यय	फरक
१९७३–७४	५१८६	६९८९	– १८०३
१९७४–७५	७६६१	९२९१	– २६३०
१९७५–७६	१३२००	११४७०	– ०८२२
१९७६–७७	सुमारे १४६००	सुमारे १५५००	– ०९००

(अभ्यासपत्रक, माहितीपत्रक, प्रमाणपत्र व शिलकी उत्तरपुस्तिका मुद्रणामुळे अधिक व्यय.)

साहित्याचार्य पदवी व मामा वरेरकर पुरस्कार

१. प्रा. सौ. सुनंदा कुळकर्णी एम्. ए. सा. पारंगत, रा. रत्न. **विषय** – आधुनिक मराठी कवितेतील गूढवाद आणि हिंदी कवींचा रहस्यवाद. **मार्गदर्शक** – प्रा. माणिक के. बैतुले. साहित्याचार्य परीक्षक – प्रा. डॉ. भवानीशंकर पंडित, प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. माणिक के. बैतुले (मार्गदर्शक पदसिद्ध). कार्यकारिणी व परीक्षा समिती सदस्यांच्या अनुमतीने व परीक्षकांच्या एकमुखी निर्णयानुसार सौ. कुळकर्णी यांना साहित्याचार्य पदवी आणि कै. मामा वरेरकर स्मृती पारितोषक स्वरूप रु. १०१ रोख प्रदान करण्यात आले आहे.

आचार्य प्रबंध नोंदणी

१. श्री. नरेंद्र म. निळे, एम्. ए. सा. पारंगत. विषय – खाडिलकरांच्या नाटकातील स्त्रीजीवन मार्गदर्शक – प्रा. माणिक के. बैतुले.

२. कु. विजया पुरुषोत्तम मोरे – (सौ. शुभदा आगलावे) एम. ए. विषय – नाटककार कोल्हटकर, गडकरी स्त्री चित्रणे. **मार्गदर्शक** – प्रा. डॉ. श्री. द. भि. कुळकर्णी.

३. श्री रामभाऊ चिपुजी वैरागडे, एम्. ए. सा. पारंगत. विषय – यादवकालीन महानुभाव चरित्र वाङमयाचा अभ्यास. **मार्गदर्शक** – प्रा. डॉ. श्री. द. भि कुळकर्णी.

४. श्री निळकंठ ना. काडगाये, बी. कॉम्. सा. पारंगत, रा. रत्न. विषय – प्रमुख मराठी संतांच्या दृष्टिकोनातून स्त्री. **मार्गदर्शक** – प्रा. सौ. नीला जोशीराव.

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

द्वितीय सत्रीय परीक्षा जानेवारी १९७७

पारितोषक प्राप्तकर्ते

परीक्षा	परीक्षार्थ्यांचे नांव	केंद्र	पुरस्कार रक्कम
विद्यालयीन			
१. मराठी प्रवेश	प्रकाश या. खेवले	–सिंधी हिंदी हायस्कूल, नागपूर.	५–००
२. मराठी परिचय	कु. हबीबुन्निसा खान	–सुब्हानिया हायस्कूल, नागपूर	५–००
३. मराठी बोध	श्री महम्मद इ. सलीमुल्लाह	–सुब्हानिया हायस्कूल, नागपूर	५–००
४. मराठी प्रबोध	कु. खालेदा बेगम महंमद अब्दुल रहीम	–मन्सुर वेल्फेअर असोसिएशन, नागपूर	५–००
५. मराठी प्रारंभ	कु. उज्ज्वला र. महाजन	–वीर वामनराव जोशी विद्यालय, अमरावती	५–००
६. साहित्य विनीत	श्री. अमोलचंद्र वा. उधोजी	–जामदार हायस्कूल, नागपूर –कै. ना. कृ. दिवाणजी पारितोषक	१५–००
महाविद्यालयीन			
७. भाषा परिचित–१	श्री. गडप्पा को. मलय्या	–आंध्र समिती तेलगु हायस्कूल नांदेड	५–००
८. साहित्य परिचित-१	कु. साधना श्री. देशमुख	–यशवंत महाविद्यालय, वर्धा	५–००
९. साहित्य परिचित-२	कु. छाया ह. महाजन	–यशवंत महाविद्यालय, वर्धा	५–००
१०. साहित्य प्रबोध	श्री. नारायण ग. चांदपूरकर	–सी. पी. अँड बेरार महाविद्यालय, नागपूर	५–००
११. भाषा स्नातक	श्री. अशोक रा. ताकसांडे	–श्री. बाबासाहेब देशमुख पार्वेकर महाविद्यालय, पांढरकवडा	१०–००
१२. साहित्य स्नातक	सौ. मालती म. साठे	–भा. भा. मंदिर, नागपूर	१०–००
१३. साहित्य पारंगत	कु. छाया का. देशपांडे	–वीर वामनराव जोशी विद्यालय, अमरावती –प्रा. डॉ. कै. वा. ग. सिंगणापूरकर स्वर्णपदक	४०–००
शासकीय			
१४. मराठी प्रवीण	श्रीमती सुमित्रा सु. हेगडे	–भा. भा. मंदिर, नागपूर	१५–००
१५. मराठी प्राज्ञ	कु. लक्ष्मी वि. अय्यर	–भा. भा. मंदिर, नागपूर	२५–००
१६. केंद्र पारितोषक	सिंधी हिंदी हायस्कूल, नागपूर	–(सर्वाधिक परीक्षा शुल्क सर्वाधिक परीक्षार्थी)	५०–००

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती, नागपूर

द्वितीय सत्रीय पदवी परीक्षांचे निकाल – उत्तीर्ण परीक्षार्थ्यांची नावे.

१. **साहित्य पारंगत :** उच्च पदवी परीक्षा एम्. ए. समकक्ष

कु. छाया का. देशपांडे सर्वप्रथम प्रा. डॉ. कै. वा. ग. सिंगनापूरकर स्वर्णपदक
कु. जयमाला प्र. कावळे, श्री. हे. ज. वाडबुधे, कु. विजया ग. खोब्रागडे, श्री. चं. तायडे, द. अं. महाजन, कु. शोभा दे. पांडे, कु. सुलभा रा. पितळे, कु. आशा रा. पितळे, र. ना. कांवळे' दा. को. इंगळे, ब. म. सराडकर, श्री. स. महाजन, ना. का. अंजनकर, मो. ता. आगाशे.

---

२. **साहित्य स्नातक :** पदवी परीक्षा : बी. ए. मराठी साहित्य समकक्ष

सौ. मालती मधुकर साठे प्रथम श्रेणीत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार

द्वितीय श्रेणी :– मो. गो. कुरनकर, या. का. निमगडे, कु. स्मिता म. टिकेकर, हे. लो. टेंभरे, ग्या. ल. रामटेके, घ. चिं. बिसेन, कु. ज्योती शा. अेडाखे, कु. पुष्पा रा. पाटील, वनिता व्यं. निर्मळ, शैलजा रा. कळमकर, बेबी म. मेश्राम, सु. रा. गवळी, कु. रजनी अ. ढोले, प्र. रा. वगरकर, कु. मालती आ. वैद्य. प्र. रा. येनगुर्तीवार, कु. कल्पना भा. भांबुरकर, कु. निलीमा दि. धोंड, नलिनी के. झाडे, ता. पां. पिलारे, कु. यमुना ना. वाघमारे, दे. चं. बागुलकर, दा. मा. सेलोकर, अ. कादर शेख अब्दुला, म. श्री. निवाणे, उ. त्र्यं. देशपांडे, ब. रं. खंडार, पटेल सैयद हुसेन, गो. द. शेलवटकर, बि. गु. कडवे, पुं. रा. बारई.

तृतीय श्रेणी :– कु. आशा प. मानेकर, चंचला शं. चेपे, चं. ना. तिमांडे, चं. रा. बाळबुधे, दि. वि. दगडकर, कु. उषा रा. काशीकर, सौ. प्रतिभा म. वैद्य, सु. वि. ढोबळे, कु. कीर्ति वि. गांधी, अचला वि. शंगाले, कल्पना म. डोंगरे, रा. श्रा. सेलोकर, श्री. श्रा. गारोदे, कु. इंदु कों. इंगळे, उ. पुं. खोब्रागडे, भा. भा. वाळके र. श्या. अेडाखे, प्र. वि. प्रांजळे.

उत्तीर्ण श्रेणी :– कु. पुष्पलता वा. अेडलावार, बं. वि. हजारे, म. में. पंधरे, कु. रेखा स. बोरकर, किरण म. मुदाफळे, छाया सां. बावणे, शेवती शं. मेहेर, कल्पना गु. माटोडे, विजया भि. गाडेकर.

---

३. **भाषा स्नातक :** पदवी परीक्षा – बी. ए. आवश्यक मराठी समकक्ष

श्री. अशोक रा. ताकसांडे : प्रथम श्रेणीत सर्वप्रथम १० रु. पुरस्कार

प्रथम श्रेणी :– कु. नलिनी वा. आदमने, प्रतिभा म. गुलाखे.

द्वितीय श्रेणी : कु. माधुरी दा. मशानकर, रमादेवी शां. जोशी, गोदावरी तु. चौवरी, विद्या पु. केळकर, शुभदा श्री. देशमुख, वा. क. मोहर्ले, रेखा प. देशपांडे, श्या. वि. भांदवकर, श्या. तु. कडवे, सौ. प्रभा मेहता, कु. बानो बेगम से. अकबर, र. कृ. तायडे, प्र. म. ताजने, निसार अहमद, मौ. अब्दुल खाँ, जलीर्लर रहमानखाँ मुस्तीफा खाँन.

तृतीय श्रेणी :– श्री ब. या. चांदेकर, कु. उषा प. सावनेरकर, **मौ. मुख्तार इब्राहिम**, अब्दुल रहीम अ. अजीज, नाईम खाँ हाकम खाँ, शफीयोद्दीन खाँ शरीफोद्दीन खाँ, शे. उमर शे. मेहताब, मो. याकूब मो. हनीफ, मोहम्मद शब्बीरुल्ला, अरुण खाँ मुस्तफा खाँ, मो. अशफाक शे. अहमद.

उत्तीर्ण श्रेणी :– प्र. वि. देशमुख, चं. ना. वाजे, मु. शि. वाकोडीकर, कु. देवकी चं. पराते, पां. ना. भांडारकर, मीनाक्षी ज. भट, सुनंदा भा. हंबर्डे, वंदना क. श्रॉफ, पुष्पा वा. यावलकर, आशा पां. इंगोले, कांता चं. मुठाळ, सुनंदा शं. लुटे, छाया टि. सयाम, मो. रियाजुर्रहीम.

शासकीय परीक्षा :

१. **मराठी प्रवीण " निम्नस्तर परीक्षा "**

श्रीमती सुमित्रा सुब्राया हेगडे : प्रथम श्रेणीत सर्वप्रथम पुरस्कार १५ रु.

प्रथम श्रेणी :– श्रीमती विमला न्यूटन, श्रीमती त्रैसीयाम्मा सो. मथाई, श्रीमती पी. एम्. चेलम्मा, श्रीमती साराम्मा के. यु, श्रीमती चिन्नमा वर्गीस, कु. रंजना घी. सरकार.

द्वितीय श्रेणी :– श्रीमती श्रीनिवासन्, श्रीमती अन्नमा चाको, कु. शुभ्रा घी. सरकार, श्री. डी. जोसफ न्यूटन, श्रीमती सरस्वती नायर, डॉ. वसंत म. देसाई.

२. **मराठी प्राज्ञ " उच्चस्तर परीक्षा "**

कु. लक्ष्मी विश्वनाथन् अय्यर : प्रथम श्रेणीत सर्वप्रथम पुरस्कार २५ रु.

प्रथम श्रेणी :– डॉ. श्रीमती शशीकला सिन्हा, डॉ. श्रीमती विजयलक्ष्मी भूतडा, श्री इंद्रनारायण सक्सेना, श्री हिरेन्द्रसिंह वाघेला, श्री उसमानगनी शेख, श्री अल्लाउद्दिन सि. जिनाबडे, श्री किरणकुमार चौरसिया, श्री एस्. हनुमंत नायडू, श्री. रामशेट्टी, श्री राजकूमार झुत्शी, श्री टी. आर. भट्टतिरी, कु. देवी पुनवानी, डी. वासुदेवराव, के. वासुदेवन्, श्री व्ही. के. भास्करन्.


द्वितीय श्रेणी :– श्रीमती ए. एन्. राधा, कु. रत्ना एम्. भाटिया, डॉ. रघुनाथ हरि-साधन मुकर्जी, डॉ. अनिलकुमार बारुआ, डॉ. आबिद तैयबझी बीवीजी, डॉ. असपी बी सर्वेअर, श्री लिंगनरसैय्या, डॉ. ह. ज. कृष्ण अय्यंगार, श्री सोमशेखरन नायर, सौ. श्यामला लक्ष्मीनारायणन्, श्री गुडप्पा एम्. राय.

सुविधा प्राप्त परीक्षार्थी :–

श्री. अर्काचार विश्वामुर्ती – प्र. पत्र ३ सुविधा 'पत्र १ व २ पुन्हा बसणे'

श्री. जे. गडसी गौडा – प्र. पत्र २, ३ सुविधा 'प्र. पत्र १ ला पुन्हा बसणे'


अमेरिकन कवी डॉ. मिलर विल्यम्स् ह्यांची ८–२–७७ ला भेट व काव्यगायन



उभे– श्री. देहाडराय, डॉ. शास्त्री, श्री. लाड, प्रा. कानडे
बसलेले– श्रीमती जोन डिके, डॉ. आष्टीकर, श्रीमती विल्यम्स्, अनिल, डॉ. मिलर विल्यम्स्, या. मु. पाठक




उज्जैनच्या कलाकारांच्या
चित्र–प्रदर्शनाचे उद्घाटन करताना
श्री. भाऊ समर्थ, २३–१२–७७




बेहेरे व्याख्यान माला, १९७७
प्रा. स. शि. भावे २७–१–७७ ला
भाषण देत असताना

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन – १४ जानेवारी १९७७



डॉ. भवानीशंकर नियोगी व डॉ. वा. वि. मिराशी ह्यांचा संघाध्यक्षांच्या हस्ते सत्कार.



रात्री श्री. अरविन्द गजेंद्रगडकर ह्यांचे बासरीवादन. श्री. वाडेगावकर आणि श्री. बबनराव आठवले ह्यांची साथ.

प्रकाशक गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२
मुद्रक श्या. श्री. वनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२

अनुक्रमणिका